सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, ५ मार्च २०२५ । युगाब्द ५१२६ । वर्ष ४१ वे अंक ११७ । पाने १२+८ । किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. | ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com






विराट 'खेळी'
धावा : ८४
चेंडू : ९८
चौकार : ०५

## भारत फायनलमध्ये
### सेमीफायनलमध्ये ऑस्ट्रेलियाचा धुव्वा

**दुबई, दि.४ मार्च**

टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाचा ४ विकेट्सने पराभव करून चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. सेमीफायनलमध्ये चेस मास्टर विराट कोहली सामनावीर ठरला, ज्याने ८४ धावांची एक अतिशय महत्त्वाची खेळी केली.

मंगळवारी दुबई इंटरनॅशनल स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या उपांत्य सामन्यात कोहलीने धावांचा पाठलाग करताना ३ मोठ्या भागीदारी केल्या. त्याने श्रेयस अय्यरसोबत ९१, अक्षर पटेलसोबत ४४ आणि केएल राहुलसोबत ४७ धावा जोडल्या. या भागीदारींमुळे धावांचा पाठलाग सोपा झाला. शेवटी, हार्दिक पंड्याने जलद २८ धावा केल्या आणि केएल राहुलने षटकार मारून विजयावर शिक्कामोर्तब केले. तो ४२ धावा करून नाबाद परतला. ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करत २६५ धावांचे लक्ष्य ठेवले. ऑस्ट्रेलियाकडून कर्णधार स्मिथने ७३ आणि कॅरीने ६१ धावा केल्या. भारतीय गोलंदाजांनी ऑस्ट्रेलियाला सर्वबाद केले. शमीने ३, जडेजा आणि चक्रवर्ती यांनी प्रत्येकी २ विकेट घेतल्या.

# अखेर धनंजय मुंडेंचा राजीनामा
## विरोधकांकडून सहआरोपी करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.४ मार्च**

गेल्या जवळपास तीन महिन्यापासून विरोधकांसह सत्ताधारी आमदारांच्या रडारवर असलेल्या वादग्रस्त मंत्री धनंजय मुंडे यांची अखेर मंगळवारी विकेट पडली. त्यांचा राजीनामा आपण स्वीकारला असून राज्यपालांकडे पाठविला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर ८४ दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनाने मुंडे यांच्या राजीनाम्यामुळे एक लढाई जिंकली असून हत्या प्रकरणात त्यांना सहआरोपी करण्याची मागणी विरोधकांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, सदविवेकबुद्धीला स्मरून वैद्यकीय कारणास्तव राजीनामा दिला असल्याचे ट्विट केले आहे. संतोष देशमुख यांना मारहाण केल्यानंतर ते पाणी मागत असताना नराधमांनी त्यांच्या तोंडावर लघवी केली असल्याचे पोलिसांनी केलेल्या तपासातून फुटेज मिळाली होती. सोशल मीडियावर ती व्हायरल झाल्यानंतर या घृणास्पद कृत्याबाबत सर्वस्तरातून तीव्र संताप व्यक्त होत होता. उन्हाळी अधिवेशनात त्यांच्या तीव्र प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी रात्री उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निवासस्थानी गेले त्या ठिकाणी धनंजय मुंडे यांना आपल्या बोलावून घेतले. यावेळी त्यांनी मुंडेंना राजीनामा देण्याची सूचना केली. त्यानूसार त्यांनी रात्री त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला. आज सकाळी अधिवेशनाच्यास्थळी पोहोचल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेच्या प्रांगणातच त्याबाबत माहिती पत्रकारांना दिली. ते म्हणाले धनंजय मुंडे यांनी आपल्याला कडे दिलेला राजीनामा आपण स्वीकारलेला आहे तो कार्यवाहीसाठी राज्यपालाकडे पाठविलेला आहे. जितेंद्र आव्हाड आज प्रतीकात्मक दगड घेऊन विधानभवनात आले. हे सरकार पाषाणहृदयी आहे म्हणून मी हे घेऊन आलो आहे असेही आव्हाड यांनी म्हटले आहे.

### नैतिकतेला धरून राजीनामा : अजित पवार

धनंजय मुंडे यांच्या राजीनामा बाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी नैतिकतेला धरून त्यांनी राजीनामा दिला आहे, पोलिसांच्या तपासानुसार पुढील कार्यवाही होईल,इतकेच भाष्य केले. त्यांचा राजीनामा झाला आहे हे मला आत्ताच समजले असून यासंदर्भात पुढची जी काही भूमिका पक्षाचे अध्यक्ष अजित पवार लवकरच जाहीर करतील. पक्षाची भूमिका हीच होती की कुठल्याही बेकायदेशीर कृत्याला पाठिशी घालणार नाही. असे छगन भुजबळ यांनी सांगितले.

### सरकार बरखास्त केलं पाहिजे : आदित्य ठाकरे

हे सरकार बरखास्तच केलं पाहिजे. कारण या सरकारला संवेदना उरलेल्या नाहीत. त्यामुळे हे सरकार बरखास्त करायला हवे अशी मागणी ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केली. ते म्हणाले मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यांच्या घरी गेले होते. आणि नंतर आजचा राजीनामा झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवारांना का बोलवून घेतले नाही.

### गोपीनाथ मुंडे असते तर चाबकाने फोडले असते : रोहित पवार

धनंजय मुंडेंचा केवळ राजीनामा घेऊन चालणार नाही तर त्यांनाही सह आरोपी केले पाहिजे जर आज दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे असते तर त्यांनी त्याला चाबकाने फोडून काढले असते, अशी प्रतिक्रिया शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांनी दिली .ते म्हणाले, संतोष देशमुख यांची हत्या केल्यानंतर त्यांच्या शरीरावर लघुशंका केली. हे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले. ते दोन महिन्यांपूर्वी देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याकडे हे फोटो आले असावेत. तरीही धाडसी निर्णय घ्यावा असे तुम्हाला वाटत नसेल तर तुम्हाला मन आहे का? असा प्रश्न आम्हाला पडला.

### मंत्रीपदाची शपथच घ्यावयास नको होती : पंकजा मुंडे

बीड जिल्ह्यातील परिस्थिती बाबत बोलण्यास टाळणाऱ्या भाजपाच्या मंत्री व धनंजय मुंडे यांच्या बहीण पंकजा मुंडे यांनी धनंजय यांचा राजीनामा दिल्यानंतर मात्र आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे वास्तविक खूप आधीच त्यांनी राजीनामा द्यावयास हवा होता किंवा मंत्रीपदाची शपथ घ्यावयास नको होती, असे सांगून त्या म्हणाल्या की, ज्या पद्धतीने हत्या झाली आहे ती निषेधार्थ आहे. मी संतोष देशमुख यांच्या मातोश्री ची माफी मागते'' त्यांच्या राजीनाम्याचे मी स्वागत करते.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली कठोर भूमिका
### एकाच वाक्यात इशारा अन् मुंडेंनी दिला राजीनामा

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला असून राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी देखील तो स्वीकारला आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात गेल्या दोन महिन्यांपासून धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात होती. मात्र, या प्रकरणाशी आपला संबंध नसल्याचे सांगत धनंजय मुंडे यांनी राजीनामा देण्यास तयार नव्हते. तसेच अजित पवार यांनी देखील राजीनामा घेण्यास विलंब दर्शवला होता.

संतोष देशमुख यांच्या हत्येचे भयानक फोटो व व्हिडिओ समोर आल्यानंतर राजीनाम्यासाठी दबाव वाढला होता. त्यानंतर धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजीनाम्याचा आग्रह करत इशारा दिला असल्याचे देखील बोलले जात आहे. देवेंद्र फडणवीस हे पूर्वीपासूनच धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, यासाठी आग्रही होते. त्यांनी अजित पवार यांच्याशी तीन ते चार वेळा यावर चर्चा देखील केली होती. तसेच धनंजय मुंडे यांना देखील राजीनामा देण्यास समजूत काढली होती. मात्र, अखेर देवेंद्र फडणवीस यांनी कठोर भूमिका घेतल्याचे समजते.



देवेंद्र फडणवीस यांनी थेट धनंजय मुंडे यांना इशारा दिला होता. जर तुम्ही राजीनामा देणार नसाल, तर मला राज्यपालांना पत्र लिहून तुम्हाला मंत्रिमंडळातून काढण्याची कारवाई करावी लागेल. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या या इशाऱ्यानंतर संपूर्ण वातावरण बदलले असल्याचे बोलले जात आहे. त्यानंतर मग राजीनामा देण्याच्या हालचालींना वेग आला व अखेर धनंजय मुंडे यांनी राजीनामा देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला व राज्यपालांनी देखील मुंडे यांचा राजीनामा लगेच स्वीकारला.

संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो व्हायरल झाल्यानंतर धनंजय मुंडे यांना उद्याच्या उद्या राजीनामा द्या, असे मुख्यमंत्र्यांनी काल पुन्हा सांगितले आणि आज सकाळी मुंडेंचा राजीनामा मुख्यमंत्र्यांच्या हाती आला. तसेच या प्रकरणाच्या सुरुवातीपासूनच मुख्यमंत्र्यांनी अतिशय कडक आणि ठोस भूमिका घेतली होती, अशी सूत्रांची माहिती आहे.

### पंकजांना ट्रम्प, गाजा पट्टीचे प्रश्न विचारा : सुरेश धस यांचा टोला

धनंजय मुंडे च्या राजीनाम्यासाठी आग्रही असलेल्या भाजपाचे आष्टीचे आमदार सुरेश धस यांनी आज मात्र मुंडेंच्या भगिनी पंकजा यांच्यावर हल्ला चढवला ते म्हणाले त्यांना बीड जिल्ह्याची काही देणंघेणं नाही त्या आंतरराष्ट्रीय नेत्या असून त्यांना ट्रम्प गाजा याबाबत प्रश्न विचारावेत असा उपरोधिक टोला मारला.

### ८६ दिवसांचा संघर्ष

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ या दिवशी हत्या करण्यात आली. या घटनेचे तीव्र पडसाद हिवाळी अधिवेशनातही उमटले. तर आता अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवसाच्या एक दिवस आधी संतोष देशमुख यांची हत्या कशी करण्यात आली.यासंदर्भातले फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. या फोटोंमध्ये क्रौर्यालाही लाज वाटेल असे क्रौर्य आहे. हे फोटो व्हायरल झाल्यानंतर विरोधकांनी आधी धनंजय मुंडेंचा राजीनाम घ्या तोपर्यंत कामकाज चालूच देणार नाही अशी भूमिका घेतली आहे.

In Loving
MEMORY OF



KANTILAL S. SHAH
1937 - 2023

THE HERIYTAGE LAWNS & BANQUET
HERIYTAGE GROUP
HERIYTAGE REALTY

उत्सव पर्यटनाचा... केसरीसोबत जग पाहण्याचा!
जे जे नवीन ते ते दाखवणं... हाच आमचा ध्यास! नव्या टूर्स, नवीन साईटसिईंग्स.




स्नोवाला हॉलीडे, बीचवाला हॉलीडे, क्रुझवाला हॉलीड की अॅडव्हेंचरवाला हॉलीडे...चला तर!
प्रत्येक बजेट आणि पसंतीनुसार टूर्स. फोर-फाईव्ह स्टार हॉटेल्स,** बेस्ट एअरलाईन्स आणि दर्जेदार सेवा.

युरोप टूर्स

| टूर कोड दिवस | टूर | | बीनालढा प्राईस |
|---|---|---|---|
| ET 08 | बेस्ट ऑफ टर्की | ~~1,93,000~~ | 1,79,000* |
| EP 08 | प्राग व्हिएन्ना बुडापेस्ट स्लोव्हेनिया क्रोएशिया | ~~2,46,000~~ | 2,29,000* |
| ER 09 | बेस्ट ऑफ ईस्टर्न युरोप | ~~2,61,000~~ | 2,44,000* |
| EE 07 | फ्रेंच रिव्हीएरा | ~~2,68,000~~ | 2,49,000* |
| EF 09 | फ्लेवर्स ऑफ इटली लेक कोमो | ~~2,84,000~~ | 2,64,000* |
| EL 09 | स्विस पॅरिस | ~~3,01,000~~ | 2,84,000* |
| EM 08 | बेस्ट ऑफ स्वित्झर्लंड | ~~3,03,000~~ | 2,84,000* |
| EW 09 | बेस्ट ऑफ स्कॅंडिनेव्हिया | ~~3,13,000~~ | 2,94,000* |
| EH 15 | स्पेन पोर्तुगाल मोरोक्को | ~~3,61,000~~ | 3,44,000* |
| EO 13 | इंग्लंड स्कॉटलॅंड आयर्लंड वेल्स | ~~3,71,000~~ | 3,49,000* |
| E1 22 | ऑल ऑफ युरोप | ~~5,04,000~~ | 4,74,000* |

इतर इंटरनॅशनल टूर्स

| टूर कोड दिवस | टूर | | बीनालढा प्राईस |
|---|---|---|---|
| UW 07 | युएसए वेस्ट कोस्ट J/L | ~~2,20,000~~ | 1,93,000* |
| PW 06 | बेस्ट ऑफ रशिया | ~~2,08,000~~ | 1,95,000* |
| VS 08 | साऊथ आफ्रिका पिलान्सबर्ग | ~~2,34,000~~ | 2,14,000* |
| JS 08 | क्लासिक साऊथ कोरिया | ~~2,45,000~~ | 2,24,000* |
| A1 17 | ऑस्ट्रेलिया न्यूझीलॅंड | ~~2,56,000~~ | 2,44,000* |
| JF 08 | जपान चेरी ब्लॉसम | ~~3,22,000~~ | 2,84,000* |
| JA 10 | जपान अल्पाईन रूट आशिकागा फ्लॉवर पार्क | ~~3,25,000~~ | 2,94,000* |
| V1 13 | साऊथ आफ्रिका केनिया व्हिक्टोरिया फॉल्स | ~~4,11,000~~ | 3,84,000* |
| J1 15 | जपान चायना | ~~4,60,000~~ | 4,29,000* |
| VM 11 | क्लासिक मादागास्कर केनिया | ~~4,65,000~~ | 4,34,000* |
| VT 07 | टांझानिया वाईल्डलाईफ स्पेशल | ~~5,69,000~~ | 5,35,000* |

ईझी व्हिसा टूर्स

| टूर कोड दिवस | टूर | | बीनालढा प्राईस |
|---|---|---|---|
| FT 06 | थायलॅंड | ~~78,000~~ | 71,000* |
| FY 07 | फुकेत क्राबी बॅंकॉक | ~~1,02,000~~ | 92,000* |
| MS 08 | श्रीलंका | ~~1,03,000~~ | 94,000* |
| WB 05 | बाकू छोटा ब्रेक | ~~1,16,000~~ | 99,000* |
| WS 05 | सिंगापूर | ~~1,25,000~~ | 1,16,000* |
| M1 06 | मॉरिशस | ~~1,30,000~~ | 1,19,000* |
| D1 07 | दुबई अबूधाबी | ~~1,28,000~~ | 1,19,000* |
| FI 08 | बाली जकार्ता | ~~1,48,000~~ | 1,39,000* |
| FH 07 | हॉंगकॉंग शेंगेन मकाओ | ~~1,69,000~~ | 1,62,000* |
| F2 10 | सिंगापूर थायलॅंड मलेशिया | ~~1,74,000~~ | 1,64,000* |
| FV 10 | व्हिएतनाम कंबोडिया | ~~1,83,000~~ | 1,74,000* |

हिमालयन टूर्स

| टूर कोड दिवस | टूर | | बीनालढा प्राईस |
|---|---|---|---|
| H6 08 | पॅनोरॅमिक शिमला मनाली | ~~35,000~~ | 31,000* |
| H7 08 | डलहौसी धरमशाला अमृतसर | ~~38,000~~ | 34,000* |
| NH 07 | लेह लडाख | ~~43,000~~ | 39,000* |
| NS 07 | दार्जिलिंग गॅंगटोक | ~~43,000~~ | 39,000* |
| K6 07 | पॅनोरॅमिक काश्मीर वैष्णोदेवी | ~~44,000~~ | 40,000* |
| N6 08 | नैनिताल मसूरी कॉर्बेट पार्क | ~~47,000~~ | 43,000* |
| ON 06 | अमरनाथ यात्रा | ~~56,000~~ | 52,000* |
| NX 08 | लेह ॲप्रिकॉट ब्लॉसम | ~~78,000~~ | 74,000* |
| NP 08 | नेपाळ | ~~79,000~~ | 75,000* |
| O1 13 | उत्तरांचल चारधाम यात्रा | ~~80,000~~ | 76,000* |
| NZ 10 | भूतान | ~~98,000~~ | 94,000* |

आंतरराष्ट्रीय महिला दिन - महिलांसाठी खास ऑफर! 8 मार्च पर्यंतच. देशविदेशातील टूर बुक करा, हजारो वाचवा*
युरोपसाठी 10 किंवा अधिक जणांचा ग्रुप असल्यास एक्स्पर्टस्शी बोला 91 6783 5005 / 91 6783 5003
*T & C Apply

केसरीच्या स्पेशॅलिटी टूर्स | KESARI SELECT CUSTOMIZED HOLIDAYS 1800 266 9080, 86577 58850 | KESARI CORPORATE TOURS 70300 11444, 914556 1122 | Shop travel-curated products. Visit: www.shop.kesari.in
9167 835 071 | 1800 266 1100 | ऑफिस / कॉल सेंटर: सोमवार ते शनिवार 10 ते 8, रविवार 11 ते 6
पुणे 020-66465555 | पुणे 8657991083 | बाणेर 020-69101234 | मुंबई 022-61744100 | ठाणे 022-69721100 | वाशी 022-69462222 | नाशिक 0253-6914444 | नागपूर 0712-6921717 | कोल्हापूर 0231-2533222 | पुणे 9011948181 | औंध 9922151222 | भोसरी 9569300300 | निगडी 9890941767 | पिंपळे सौदागर 9049989533 | सातारा रोड 7028012434 | सोलापूर 9689913325 | सोलापूर 9890186186 | अहिल्यानगर 9823140901 | अहिल्यानगर 7350553131 | बारामती 9822848988 | सातारा 9922992382 | सांगली 9421128340 | अकलूज, महाबळेश्वर, पंढरपूर, बार्शी
KESARI.in

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त

### संभाजी ब्रिगेडच्या महिला जिल्हाध्यक्षपदी मीनल दास यांची निवड

**सोलापूर, दि. ४ मार्च -**

संभाजी ब्रिगेड सोलापूर जिल्हा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी मीनल दास यांची निवड करण्यात आली असून संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. मीनल दास या उद्धव ठाकरे गटाच्या सेनेचे शहर प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी विविध महिलांच्या योजना चांगल्या प्रकारे राबविले त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, जिल्हा संपर्कप्रमुख छत्रगुण माने, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, गोवर्धन गुंड, दिलीप निंबाळकर, वैभव धुमाळ, प्राजक्ता कुलकर्णी, शोभा आनंदी, शोभा देसाई, जयश्री जाधव, संजीवनी सलबत्ते, राजश्री शिंदे, अन्नपूर्णा पाटील, माधुरी उडाणशिव, सुजाता काशिकर, भारती गुन्नाल उपस्थित होत्या.





### डॉ. पल्लोलु यांना वैद्यकीय अधिकारी पदावर सेवेत घेण्याची मागणी

**सोलापूर, दि. ४ मार्च -**

महापालिकेतील आरोग्य विभागात डॉ. वाय.एच. पल्लोलु यांना पुर्ववत वैद्यकीय अधिकारी पदावर सेवेत घेण्यात यावे या मागणीचे निवेदन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना देण्यात आले. महापालिका आरोग्य विभागात वैद्यकीय अधिकारी पदावर डॉ. वाय. एच. पल्लोलू हे यापूर्वी कार्यरत होते. कोरोना काळात असंबंधित कारणांमुळे दुसऱ्यांदा अन्याय कारक कारवाई केली आहे असा आरोप करत ती कारवाई शिथिल करावी. डॉ. पल्लोलु यांना आरोग्य विभागात पुर्ववत वैद्यकीय अधिकारी पदावर सेवेत सामावुन घेण्यासंदर्भात आ. देवेंद्र कोठे यांनी दिलेले पत्र समाज अध्यक्ष करेपा जंगम व डॉ. पल्लोलु यांनी मनपा आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना दिले. याप्रसंगी सोलापूर काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतन नरोटे, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख मनिष काळजे उपस्थित होते.

### 'म्हणजे वाघाचे पंजे' चित्रपटाची घोषणा

**सोलापूर, दि. ४ मार्च -**

सध्या सिनेसृष्टीत एकामागोमाग एक चित्रपट येत आहेत. मराठी सिनेसृष्टीत आशयघन विषय असलेल्या चित्रपटांची तर लाट आली आहे. अशातच रोमँटिक आणि आशयघन विषयाची जोड असलेला 'म्हणजे वाघाचे पंजे' हा चित्रपट लवकरच रसिक प्रेक्षकांच्या मनावर राज्य करायला सज्ज होत आहे. त्रिशुलीन सिनेव्हिजन प्रस्तुत 'म्हणजे वाघाचे पंजे' या चित्रपटातून नवोदित अभिनेत्री प्रेक्षकांचं मन जिंकण्यास सज्ज झाली आहे. अभिनेत्री तमन्ना बांदेकर हिने या चित्रपटात प्रमुख भूमिका साकारली आहे. दिग्दर्शनाबरोबर स्वरूप सावंत याने चित्रपटाच्या संकलनाची जबाबदारी सांभाळली आहे. तर संगीत हर्षवर्धन वावरे आणि त्रिनीती ब्रोस यांचे आहे. तसेच लेखक म्हणून संजय नवगिरे यांनी बाजू सांभाळली आहे. आणि हा संपूर्ण चित्रपट छायाचित्रकार वीरधवल पाटील यांनी त्यांच्या कॅमेऱ्यात कैद केला आहे. तमन्ना बांदेकर हीच या चित्रपटातून पदार्पण असून सौरभ गोखले, निखिल चव्हाण, संजय नार्वेकर, चिन्मय उदगीरकर, मेघराज भोसले, दिपाली सय्यद, प्राजक्ता हनमगार, अनिल नगरकर, घनश्याम दोरोडे, सिद्धेश्वर झाडबुके ही कलाकार मंडळी भूमिकेत झळकणार आहेत.

# विज्ञान अन् गणित पेपरसाठी मायक्रोप्लॅनिंग

## कॉपी सापडलेल्या केंद्र संचालक आणि पर्यवेक्षकांवर कठोर कारवाई : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

सध्या दहावी व बारावीची बोर्ड परीक्षा सुरू असून, बारावीचा एक तर दहावीचे चार पेपर राहिले आहेत. तरी दहावी व बारावीच्या उर्वरित पेपरसाठी एकाही परीक्षा केंद्रावर मास कॉपी अथवा अन्य कोणताही गैरप्रकार होणार नाही यासाठी सर्व प्रांताधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी, तहसीलदार आणि गटशिक्षण अधिकारी यांनी अत्यंत दक्ष राहून परीक्षा सुरळीत पार पाडावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले आहेत.

दहावी व बारावी बोर्ड परीक्षेच्या उर्वरित पेपर साठी कॉपी होऊ नये यासाठी दूरदृश्य प्रणाली द्वारे आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार, शिक्षणाधिकारी माध्यमिक सचिन जगताप, शिक्षणाधिकारी प्राथमिक कादर शेख, सर्व उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि गट शिक्षण अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की, दहावी



बारावी परीक्षा सुरू झाल्यापासून नागरिक, पत्रकार व मान्यवर व्यक्तीकडून काही परीक्षा केंद्रावर कॉपी व अन्य परीक्षेतील गैरप्रकार सुरू असल्याबाबतच्या तक्रारी येत होत्या; त्या अनुषंगाने त्या तक्रारीचे तपासणी केली असता त्यात तथ्य आढळून आलेले आहे. त्यामुळे सर्व प्रशासकीय यंत्रणेने विशेषत: शिक्षण विभागाने दहावी-बारावीच्या उर्वरित पेपर साठी अत्यंत काटेकोरपणे नियोजन करून संवेदनशील परीक्षा केंद्राबरोबरच अन्य परीक्षा केंद्रावर कॉपी होणार नाही याची दक्षता घ्यावी. तरीही परीक्षा केंद्रावर कॉपी होत असल्याचे आढळल्यास संबंधित परीक्षा केंद्रावरील पर्यवेक्षक यास जागेवरच निलंबित करावे तर संबंधित परीक्षा केंद्र चालकावर गुन्हे दाखल करून ते केंद्र पुढील कोणत्याही परीक्षेसाठीचे बंदी आदेश काढावेत, असे निर्देशही यावेळी त्यांनी दिले. प्रत्येक उपविभागीय अधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी त्या त्या तालुक्यातील संवेदनशील परीक्षा केंद्र तसेच कॉपीच्या तक्रारी आलेल्या परीक्षा केंद्र चालकांना बोलावून त्यांच्या केंद्रावर उर्वरित पेपरसाठी कॉपी होणार नाही, याबाबत अत्यंत कठोरपणे निर्देश द्यावेत, असेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले. उपविभागीय अधिकारी माळशिरस यांनी शिरपूर येथील परीक्षा केंद्रावर भेट देऊन तेथे कॉपी होत असल्याचे संबंधितांच्या निदर्शनास आणून दिले होते, त्या केंद्रावरील पर्यवेक्षक तसेच केंद्र चालकावर त्वरित कारवाई करावी, असेही त्यांनी निर्देशित केले. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी कंट्रोल रूमच्या माध्यमातून कॉपी करणाऱ्या केंद्रावर कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच सांगोला, माळशिरस व पंढरपूर तालुक्यातील काही शाळावर कॉपी होत असल्याच्या तक्रारी आलेल्या असून, त्याबाबत तपासणी करून पुढील कठोर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

**● भरारी पथकांत होणार वाढ : कुंभार**

प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी दहावी बारावीच्या परीक्षेच्या अनुषंगाने प्रत्येक तालुक्यातील संवेदनशील केंद्र तसेच कॉपी होत असल्याच्या आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित तहसीलदार व गटशिक्षणाधिकारी यांना माहिती देऊन संबंधित केंद्रावर अधिक भरारी पथके तसेच बैठे पथकांची नियुक्ती करण्याबाबत सूचित केले. तसेच पोलीस विभागांनी परीक्षा केंद्र परिसरात १००० मीटर पर्यंत जे प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहे त्याचे अत्यंत कठोर अंमलबजावणी करण्याबाबत सूचित केले.

**● कॉपी सापडताच दोघांना केले निलंबित**

सोलापूर जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये १८४ परीक्षा केंद्रावर दहावी व बारावीची परीक्षा सुरळीतपणे सुरू असून, ७६ परीक्षा केंद्र संवेदनशील आहेत. बारावीचा माहिती तंत्रज्ञान पेपर बाकी असून, दहावीचे गणित भाग एक व दोन व विज्ञान भाग एक व दोन असे चार पेपर बाकी असून या सर्व पेपर साठी अत्यंत दक्षपणे कार्यवाही करून परीक्षा सुरळीतपणे पार पाडली जाईल, असे त्यांनी सांगितले. तसेच मास कॉपी करणाऱ्या व परीक्षेतील गैरप्रकार करणाऱ्या परीक्षा केंद्रावर तसेच केंद्र चालकावर कठोर कारवाई करण्यात येईल तर संबंधित पर्यवेक्षक यांना जागेवरच निलंबित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. पंढरपूर तालुक्यातील नांदुरे येथील स्टार इंग्लिश स्कूलमध्ये तहसीलदार यांनी तपासणी केली असता फळ्यावर प्रश्नांची उत्तरे लिहून दिली जात असल्याचे निर्देशनास आल्यानंतर संबंधित पर्यवेक्षक अमोल पवार व श्रीमती निपारे यांना त्याच दिवशी निलंबित करण्यात आल्याची माहिती ही जगताप यांनी यावेळी दिली.

# दरोड्याच्या गुन्ह्यातील तिघा गुन्हेगारांना अटक

## ● ३ लाख ४१ हजारांचा मुद्देमाल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ मार्च -**

दरोड्याच्या गुन्ह्यातील सराईत तिघां गुन्हेगारांना पकडण्यास सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश आले आहे.

पंढरपूर ग्रामीण पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या दरोड्याच्या गुन्ह्यात पोलिसांनी रोशन उर्फ आलिशान अविनाश उर्फ आरश्या भोसले (वय २६, रा. इंदिरा नगर झोपडपट्टी, अकलूज, ता. माळशिरस), लखन पांडुरंग काळे (वय ३५, रा. चांदपूरी, ता. माळशिरस), रसना राजू काळे (वय २६, रा. मोटेवाडी, आरटीओ ऑफीसजवळ, माळशिरस, ता. माळशिरस) यांना अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्यातील अद्यापही दोन आरोपी फरार आहेत.

१७ फेब्रुवारी रोजी पंढरपूर ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दतील पळशी व सुपली या गावात चोरट्यांनी जबरी चोरी करून मारहाण करून सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले होते. या गुन्ह्यांचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे गुन्हा करणाऱ्या रोशन भोसले व रसना काळे या दोघांना ताब्यात



घेऊन त्याच्याकडे मिळालेल्या माहितीवरून लखन काळे यास ताब्यात घेऊन गुन्ह्यांच्या अनुषंगाने चौकशी केली. त्यावेळी त्यांनी आपल्या पाच साथीदारांच्या मदतीने गुन्हे केल्याचे सांगितले. पोलिसांनी त्यांच्याकडून गुन्ह्यातील ३ लाख ४१ हजार १०० रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने हस्तगत केल आहेत. अटक करण्यात आलेल्या व फरार असलेल्या गुन्हेगारांच्या टोळीवर माळशिरस, अकलूज व वेळापूर पोलिस ठाण्यात ७ गुन्हे दाखल असून अनेक गुन्ह्यांमध्ये ते फरार आहेत.

ही कामगिरी पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर अधिक्षक प्रितम यावलकर, पोलिस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक विशाल वायकर, पोलिस उपनिरीक्षक सुरज निंबाळकर, राजेश गायकवाड, पोलिस हवालदार परशुराम शिंदे, प्रकाश कारटकर, सलीम बागवान, विजयकुमार भरले, वीरेश कलशेट्टी, अजय वाघमारे, अन्वर अत्तार, राहुल दोरकर, हरिदास थोरात, बाळराजे घाडगे, यश देवकते, समर्थ गाजरे, योगेश जाधव, अजित मिसाळ, रतन जाधव, दलीप थोरात, सुनील पवार यांनी केली.



### शेतात काम करणाऱ्या महिलेचे दागिने चोरणाऱ्यास अटक

शेटफळ (ता. मोहोळ) येथे शेतात काम करणाऱ्या महिलेस मारहाण करून दागिने चोरणाऱ्यास पोलिसांनी अटक केली. रघु शामराव हेगडे (वय २८, रा. चेंगटा, ता. चिंचोली, कलबुर्गी, कर्नाटक) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी फिर्यादी व साक्षीदार यांच्याकडून मिळालेल्या माहितीवरून सोलापूर ते पुणे महामार्गावरील तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे दोन दिवसात १८०० किमीचा प्रवास करून आरोपीस अटक केली. रघु हेगडे याच्याकडून पोलिसांनल चोरीस गेलेले १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत. ही कामगिरी सहायक पोलिस निरीक्षक नागनाथ खुणे, पोलिस उपनिरीक्षक खाजा मुजावर, सहायक फौजदार नारायण गोलेकर, हवालदार धनाजी गाडे, मोहन मनसावाले, सागर ढोरे-पाटील, पोलिस शिपाई अक्षय डोंगरे यांनी केली.

# गृहप्रकल्पातील फसवणूक प्रकरणी पोलिस आक्रमक

## गुंतवणुकदारांचे संघटन सुरु

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ मार्च -**

स्वस्त घरे देण्याच्या नावाखाली सातारा जिल्ह्यातील २८९ आजी, माजी पोलिस अधिकारी, कर्मचारी यांची तब्बल १०० कोटी रुपयांना चुना लावण्यात आला आहे. महाराष्ट्र पोलिस मेगासिटी, पुणे येथील गृहप्रकल्प (एमपीएमसी बचाओ कृती समिती) प्रकरणातील फसवणूकीचा हा प्रकार असून न्याय न मिळाल्यास आंदोलन करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

याबाबतचे निवेदन एमपीएसी बचाव कृती समितीने यांनी दिले आहे. निवेदनामध्ये म्हटले आहे की, लोहगाव जि.पुणे येथे ११७ एकर जागेत महाराष्ट्रातील पोलिसांना स्वस्तात घरे दिली जाणार असल्याचे परिपत्रक २००९ साली काढण्यात आले होते. यावरुन सातारासह राज्यातील ७ हजारहून अधिक पोलिस अधिकारी, कर्मचारी यांनी सहभाग दाखवत पैसे गुंतवले. २०१० मध्ये महाराष्ट्र पोलिस मेगासिटी सहकारी गृहनिर्माण संस्थेची स्थापना करण्यात आली. मात्र संस्थेमधील



पदाधिकारी यांच्याकडून पारदर्शक कारभार झाला नाही, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. संस्थेचे पदाधिकारी व विकासक यांनी मनमानी कारभार करत ११०० कोटी रुपयांची अफरातफर केली. घरे तयार होतील व मुलांना शिक्षणाची तसेच पोलिसांना स्वत: वास्तव्याची सोय होईल अशी अपेक्षा लागून राहिली. मात्र घोटाळा होत असल्याचे पाहून याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा, महारेरा यांच्याकडे तक्रारी करण्यात आल्या. परंतु याचा कोठेही पोलिसांना फायदा झाला नाही. उलट वर्षानुवर्ष होत गेली आणि कोणताही गृहप्रकल्प उभा राहिली. कोणतीही कारवाई झाली नाही. उलट गुंतवणूक केलेल्या पोलिसांच्या पदरी निराशाच आली. राज्यातील गुंतवणूक केलेल्या आजी, माजी पोलिसांनी आता एकत्रित येवून लढा लढण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये सातारासह राज्यातील पोलिस कुटुंबे एकत्र येवून आंदोलन करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

# साक्षात सरस्वती ने...

साक्षात सरस्वती ने जर का मला प्रत्यक्षात दर्शन दिलं असतं तर ती कशी असती हे मी अनुभवलं आहे कारण मी डॉ. स्वर्णलता भिशीकर यांना पाहिलंय आणि त्यांचा सहवास मला लाभला आहे.

मला १९८९ ते २००२ (प्रत्यक्ष) आणि तद्नंतर आजवर प्रासंगिक असा जो सहवास लाभला माझा शाळेचा भरतीचा दिवस मला स्पष्टपणे आठवतोय १९८९ साली आदरणीय कै. अण्णा ताम्हणकर, आदरणीय लताताई भिशीकर, आदरणीय गायत्रीताई सेवक यांनी माझा प्रशालेच्या भरतीची मुलाखत घेतली होती. ही प्रथम ओळख माझी आदरणीय लताताईंसोबत झाली अवंतिका बाई आणि जनुभाऊ केळकर यांनी लावलेल्या रोपट्याचा वृक्ष झालेल्या बालविकास संस्थेचं हस्तांतरण पुण्याच्या ज्ञान प्रबोधिनी संस्थेस १९८९ साली झाले आणि प्रकल्प संभाळण्यासाठी म्हणून अण्णा, लताताई आणि गायत्रीताई सोलापूरला आले. पुढे ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर प्रशालेला केवळ परीक्षार्थी घडवणे नव्हे तर देश घडणीचे कार्य करणारे उत्तम प्रबोधक घडवण्याचे कार्य यांच्यामार्फत झाले. फटाके विक्री, साखर शाळा, बालकामगार प्रकल्प, भूकंप पीडित पुनर्वसन, असे नानाविध उपक्रम संस्थेने केले.

साक्षात सरस्वती ने जर का मला प्रत्यक्षात दर्शन दिलं असतं तर ती कशी असती हे मी अनुभवलं आहे कारण मी डॉ. स्वर्णलता भिशीकर यांना पाहिलंय आणि त्यांचा सहवास मला लाभला आहे. मला १९८९ ते २००२ (प्रत्यक्ष) आणि तद्नंतर आजवर प्रासंगिक असा जो सहवास लाभला माझा शाळेचा भरतीचा दिवस मला स्पष्टपणे आठवतोय १९८९ साली आदरणीय कै. अण्णा ताम्हणकर, आदरणीय लताताई भिशीकर, आदरणीय गायत्रीताई सेवक यांनी माझा प्रशालेच्या भरतीची मुलाखत घेतली होती. ही प्रथम ओळख माझी आदरणीय लताताईंसोबत झाली अवंतिका बाई आणि जनुभाऊ केळकर यांनी लावलेल्या रोपट्याचा वृक्ष झालेल्या बालविकास संस्थेचं हस्तांतरण पुण्याच्या ज्ञान प्रबोधिनी संस्थेस १९८९ साली झाले आणि प्रकल्प संभाळण्यासाठी म्हणून अण्णा, लताताई आणि गायत्रीताई सोलापूरला आले पुढे ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर प्रशालेला केवळ परीक्षार्थी घडवणे नव्हे तर देश घडणीचे कार्य करणारे उत्तम प्रबोधक घडवण्याचे कार्य यांच्यामार्फत झाले. फटाके विक्री, साखर शाळा, बालकामगार प्रकल्प, भूकंप पीडित पुनर्वसन असे नानाविध उपक्रम संस्थेने केले. जेष्ठ पत्रकार आदरणीय बापूसाहेब भिशीकर यांच्या कन्या आदरणीय स्वर्णलता भिशीकर यांच व्यक्तिमत्त्व मुळात सात्विक अध्यात्माचा विशेष ओढा असणाऱ्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींना आपला आदर्श मानणाऱ्या लताताई यांनी सामाजिक कार्यासोबत अध्यात्मिक कार्यात विशेष उल्लेखनीय कार्य केले आहे.



अभ्यासात विशेष रुची नसणारा १० वि अनुतीर्ण झालेला मी विद्यार्थी पण त्याला विशेष प्राविण्य असणाऱ्या कलाक्षेत्रात जाण्यासाठी म्हणून कोणत्याच शाळेने प्रोत्साहन दिले नसते हे मी आवर्जून सांगू इच्छितो. माझे आई वडील जेंव्हा मी १० वी अनुत्तीर्ण झालो तेव्हा अण्णा आणि लताताई यांना भेटण्यास गेले होते तेंव्हा आदरणीय लताताई आणि अण्णांनी माझ्या आई वडिलांना निक्षून सांगितले होते की तुम्ही त्याला रस आहे त्या क्षेत्रात काम करू द्या शैक्षणिक अभ्यासक्रमाचा अट्टाहास धरू नका. मी जेव्हा २००३ साली पूर्णवेळ व्यावसायिक वादक म्हणून काम करायला लागलो तेव्हा आदरणीय लताताईंचा मला फोन आला आणि म्हणाल्या प्रबोधिनी मध्ये ये मला आणि अण्णांना तुझ्याशी बोलायचं आहे . मी गेलो तेव्हा जवळपास दीड दोन तास मला ते दोघे हे सांगत होते की पूर्णवेळ व्यावसायिक वादक म्हणून काम करत असताना कोठेही आई वडिलांच्या नावाला धक्का लागेल असे कोणतेही काम तुझ्या हातून घडू नये. आणि निघताना एका पाकिटात १०० ची नोट घालून मला शुभेच्छा दिल्या त्यावर लिहिले होते कलाकार म्हणून खूप मोठा हो आई वडील, शाळा आणि देशाचं नाव मोठं कर त्यावेळी त्यांनी हा विश्वास दाखवला नसता तर कदाचित आज मी वादक म्हणून जे काही आहे ते नसतो हे निश्चित. ( ते पाकीट अजूनही मी जपून ठेवलं आहे) १९९६ साली माझ्या वडिलांची नोकरी गेली तेव्हा मी सहावी मध्ये होतो तद्नंतर ४ वर्षांपैकी २ वर्ष शालेय शुल्कामध्ये मला सूट दिली होती आणि २ वर्ष मला प्रशालेने कोणत्याही प्रकारे शालेय शुल्क घेतलं नाही आदरणीय अण्णा आणि लताताई यांच्या द्रष्ट्या नेतृत्वामुळेच हे शक्य झाले हे आवर्जून सांगू इच्छितो. पूर्णवेळ व्यावसायिक म्हणून काम करू लागल्यानंतर मात्र भेटी कमी झाल्या. पण मी सोलापूर ला गेलो ताई तिकडे असल्या तरी आवर्जून भेट घ्यायचो, ताई पुण्यात आल्या तर आवर्जून कळवायच्या मग भेट व्हायची. एक दोनदा हराळी ला ही जाऊन आलो तेव्हाही भेट झाली. २०१६ साली विश्वविनायक वाद्यवृंदाची स्थापना जेव्हा आम्ही सोलापूर मध्ये केली त्याविषयी वर्तमान पत्रात लेख छापून आला तेव्हा आवर्जून ताईंचा फोन आला आणि म्हणाल्या आम्हाला तुझा प्रचंड अभिमान वाटला की आपला विद्यार्थी नेहमीच्या चाकोरीबद्ध वाटेवर न जाता वेगळ्या वाटेवर जाऊन उत्तम कार्य करत आहे हे पाहून आनंद झाला असंच कार्य तुझ्या हातून घडो. आज सत्तरी पूर्ती निमित्त ताईंनी लिहिलेल्या अनेक काव्य, स्फूर्तिगीते यापैकी निवडक गीते ध्वनिमुद्रित करण्याचा मानस होता पण कोविड मुळे लागू असलेल्या निर्बंधांमुळे ते शक्य झाले नाही.

आदरणीय लताताई गेल्या दीड वर्षांपासून कर्करोगाने ग्रासल्या होत्या मुळातच चं. प. भिशीकर, बापूसाहेब भिशीकर अश्या देशकार्यात झोकून देणाऱ्या सेवाव्रती घरात जन्मल्यामुळे त्यांना संघर्ष हा काही नवीन नव्हता त्या ठामपणे उभ्या होत्या अगदी परवा गायत्री ताईंचा मेसेज आला ताईंचा व्हिडिओ आला मी बरी आहे जरा अशक्तपणा आहे लवकरच भेटू पण नियती क्रूर आहे म्हणतात ते योग्य ताईंची भेट राहिली असो पण १९८९ ते अगदी २०२४ साधारण ३४ वर्ष आम्हाला तुमचा सहवास मार्गदर्शन लाभल असंख्य संस्कार आमच्यावर केलेत तुम्ही दाखवलेल्या राष्ट्र घडणीच्या मार्गावरून आम्ही सदैव चालत राहू हीच आमची आदरांजली.

**- नागेश भोसेकर**

# मातृहृदयी

लताताई गेल्याची दुःखद बातमी मंगळवारी सकाळी झोपेतून उठल्या उठल्याच डोळ्यांसमोर आली. पहाटे दोन-अडीचच्या सुमाराला सुखमणी रॉय ताईंचा मेसेज येऊन पडलेला दिसत होता. सकाळी साडेसातच्या सुमाराला उमाकांतजी मिटकर यांचा मेसेज आलेला आणि फेसबुकवर काही मित्रांच्या पोस्ट्स... आजच्या दिवसाची सुरुवात अशी दुःखभरली झाली... एका मातृहृदयी साध्वीच्या निर्वाणाची टोचणी मनात एक रितेपणाची भावना निर्माण करणारी ठरली. अशा वेळी मन भूतकाळात जातं. त्या व्यक्तीशी असलेलं नातं हळवेपणानं शोधायला लागतं... 'स्वर्णलता भिशीकर' असे नाव छापलेले 'हिंदुतेजा जाग रे' हे ताईंचे पहिले पुस्तक माझ्या संग्रहात आले. २ नोव्हेंबर १९८९ रोजी. विचारांचे हे मूळ संकलन एकनाथजी रानडे यांचे आणि मराठी रूपांतर ताईंचे, असे श्रेयनामावलीत लिहिलेले असले तरी लताताईंचे शब्दलाघव आणि शब्दसामर्थ्य यांचा प्रत्यय त्यात जागोजागी येत होता.

कॉलेज जीवनात माझ्या लेखनावर झालेले हे शब्दसंस्कार मला आयुष्यभर पुरत आहेत. पुढे अनेक वेळा त्यांचे लेखन वाचण्याचा योग येत गेला. 'पोलादी माणसे' पुस्तक मालिकेत सोलापूर जिल्ह्याच्या पुस्तकात त्यांच्यावर, त्यांच्या कामावर लिहिण्याचा योग आला. त्या निमित्ताने ज्ञान प्रबोधिनीच्या हराळी येथील प्रकल्पात दिवसभर त्यांच्यासमवेत राहण्याचा योग आला. तो लेख लिहून प्रकाशनापूर्वी त्यांच्याकडे तपासण्यासाठी पाठवला. त्यावेळी काही जुजबी दुरुस्ती सांगत त्यांनी लेखनाचे कौतुक केले. ते मी मनाच्या कुपीत जपून ठेवले. पुढे बऱ्यापैकी संवाद घडला तो उमाकांत मिटकर यांचे आत्मवृत्त असलेल्या 'डिव्हाईन जस्टिस' पुस्तकाच्या निमित्ताने. याची प्रस्तावना त्यांनी लिहावी, अशी आमची इच्छा होती. त्यांनी पुस्तक बारकाईने वाचले. अत्यंत आत्मीयतेने प्रस्तावना लिहिली. त्यातही अत्यंत प्रेमाने माझ्या लेखनाचे कौतुक केले. त्यांनी कौतुक करावे, एवढी माझी योग्यता नाही. पण मातृहृदयी लताताईंना आपल्या सगळ्याच लेकरांचे मोठे कौतुक... त्या कौतुकाचा मी धनी ठरलो. याच पुस्तकाचे हिंदी आणि इंग्रजीत रुपांतर करावे असे ठरले, तेव्हा इंग्रजीसाठी सुखमणी रॉय यांचे नाव त्यांनीच सुचविले. महत्वाचे म्हणजे, या दोन्ही भाषांची रुपांतरीत संहिता त्यांनी आमच्याकडून मागवून घेतली, वेळात वेळ काढून ती तपासली. त्यात आवश्यक असलेले बदल सुचविले. ते सुचवतानाही 'बघा हं, योग्य वाटले तर करा', असा भाव! आम्ही ते सर्व बदल स्वीकारले. लताताईंनी गाजविलेले कर्तृत्त्व अनमोल आहे. 'बांगड्या फोडून आणि कुंकू पुसून स्त्री-मुक्तीचा बाजार' मांडण्याच्या त्या काळात ताईंनी ठसठशीतपणे 'स्त्री-शक्ती'ची भूमिका मांडली. केवळ वृत्तपत्रीय लेखनातून नाव कमावण्याचा तो मार्ग नव्हता. त्या कर्त्या सुधारक होत्या. पंजाबच्या होरपळात त्यांनी १९८० च्या दशकात थेट सुवर्ण मंदिरापर्यंत यात्रा काढली. त्यासाठी खूप मोठे आत्मबळ लागते. चं. प. भिशिकर यांचा समर्थ वारसा त्यांनी अशा तेजस्वी पद्धतीने जपला. आपले सारे आयुष्य राष्ट्रसमर्पित केले. सोलापूरच्या कार्यक्रमातील तो क्षण मला अजूनही आठवतो. या पुस्तकातील एक एक मानकरी व्यासपीठावर निमंत्रित करून त्यांचा सभागृहाला परिचय करुन देणे, प्रातिनिधिक स्वरुपात त्यांचा गौरव करणे, या क्रमात लताताईंना व्यासपीठावर पाचारण करण्यात आले. वास्तविक त्या व्यासपीठावर आणि मी सभागृहात असेच योग्य ठरायला हवे. पण लेखक या नात्याने मी व्यासपीठावर. त्या पायर्या चढून वर आल्या. मी पुढे येत त्यांना चरणस्पर्श केला. पाठीवर खंबीर थाप देत, त्यांनी भरभरून आशीर्वाद दिले. म्हणाल्या, 'सगळं छान जुळलं आहे.' पाठीवरचा त्यांच्या हाताचा तो स्पर्श आजही तसाच्या तसा जाणवतोय. लताताई गेल्या. प्रत्येकालाच जायचं आहे. पोकळी कधी राहात नसते, ती भरून निघत असतेच. पण काही पोकळीच्या जाणीवा आयुष्यभरासाठी राहून जातात. जशी माझ्या आईच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी तीन वर्षांनंतरही तशीच जाणवते, तशीच काहीशी ही पोकळी आता जाणवते आहे...

**- दत्ता जोशी**

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित



| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# ट्रम्प यांनी युक्रेनची लष्करी मदत थांबवली



◆ **वॉशिंग्टन, ४ मार्च**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युक्रेनला देण्यात येणारी सर्व अमेरिकन लष्करी मदत तात्पुरती थांबवली आहे. ट्रम्प यांच्या ओव्हल ऑफिसमध्ये युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांच्याशी झालेल्या अभूतपूर्व संघर्षानंतर ट्रम्प यांचा हा निर्णय आला आहे.

एका वृत्तानुसार, वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्याने म्हटले आहे की, ट्रम्प यांनी युक्रेनला देण्यात येणारी सर्व अमेरिकन लष्करी मदत तात्पुरती स्थगित केली आहे, हा आदेश तत्काळ लागू करण्यात आला आहे, ज्यामुळे युक्रेनला मिळणाऱ्या सुमारे एक अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त किमतीची शस्त्रे आणि दारूगोळा पुरवठ्यावर परिणाम होईल.

अहवालात म्हटले आहे की, लष्करी मदत थांबवण्याचा निर्णय ट्रम्प यांनी व्हाईट हाऊस येथे वरिष्ठ नेते आणि राष्ट्रीय सुरक्षा सहायकांमधील अनेक बैठकींनंतर घेण्यात आला. अधिकाऱ्याने सांगितले की, युक्रेनने रशियासोबत शांतता चर्चेसाठी वचनबद्धता दाखवली आहे, हे ट्रम्प जोपर्यंत ठरवत नाही, तोपर्यंत हा आदेश लागू राहील.

या आदेशामुळे युक्रेनला सुरक्षा सहाय्य उपक्रमाद्वारे मिळणारी लाखो डॉलर्सची मदत देखील रोखली जाते. या उपक्रमाद्वारे निधी उपलब्ध करून दिला जातो आणि युक्रेन फक्त अमेरिकन संरक्षण कंपन्यांकडून थेट नवीन लष्करी हार्डवेअर खरेदी करण्यासाठी त्याचा वापर करू शकतो.

अमेरिकन परराष्ट्र व्यवहार विभागाच्या मते, २४ फेब्रुवारी २०२२ रोजी रशियाने युक्रेनवर आक्रमण सुरू केल्यापासून अमेरिकेने ६५.९ अब्ज अमेरिकन डॉलर्सची लष्करी मदत दिली आहे. रशियासोबतच्या युद्धाला तीन वर्षे पूर्ण होत असताना अमेरिकेने घेतलेल्या निर्णयामुळे युक्रेनला मोठा धक्का बसला आहे.

गेल्या शुक्रवारी झेलेन्स्की यांनी व्हाईट हाऊसला भेट दिली. या भेटीत दोन्ही देश दुर्मिळ खनिज करारावर स्वाक्षरी करणार होते. पण, ट्रम्प आणि झेलेन्स्की यांच्यात या द्विपक्षीय बैठकीत जोरदार वाद झाला आणि ट्रम्प यांनी झेलेन्स्की यांना थेट बाहेरचा रस्ता दाखविला होता. ◀ *(वृत्तसंस्था)*

# कोरफळे येथे वडिलाने केला मुलाचा खून

## सोन्याच्या दागिन्यावरून वाद गेला विकोपाला

## जन्मदात्या बापाने मुलाच्या डोक्यात घातला दगड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ मार्च-**

कोरफळे (ता. बार्शी) येथे वडिलांनी मुलाचा निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. दि. ३ मार्च रोजी रात्रीच्या सुमाराला घडली. या भांडणात मुलगा सोमनाथ किरण ठाकरे (वय २३ वर्षे) याचा त्यांच्याच वडिलांच्या, किरण गोविंद ठाकरे यांच्या हातून खून झाल्याची घटना घडली.



मयत - सोमनाथ ठाकरे

यावावत सुन स्वाती सोमनाथ ठाकरे (वय १९) हिने तालुका पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, फिर्यादी पती व मुलासह गावातील घरात तर सासू, सासरे, दीर हे परसातल्या घरी राहत होते. पती सोमनाथ हे मिस्त्री काम करत होता. पती सोमनाथ व सासरे किरण दोघांनाही दारुचे व्यसन होते. दोघे दारु पिण्यास पैसे देण्याचे कारणांवरुन देखील ते दोघे नेहमी भांडण करत असत. दि. ३ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता पती सोमनाथ याने गाडीचा हप्ता भरण्यासाठी पैसे नसल्याने मुलगा आर्यनच्या गळ्यातील सोन्याच्या बदाम मोडून हप्ता भरण्यासाठी पत्नी स्वाती हिच्याकडे मांगितला होता. त्यामुळे स्वाती हिने मुलगा आर्यनच्या गळयातील सोन्याचा बदाम काढुन सासरे किरण यांच्याजवळ दिला होता. त्यांनतर पती सोमनाथ घरी येऊन पत्नी स्वातीला बदाम मागु लागला. बदाम घेऊन बार्शीला चल असे म्हणत होता. त्यावेळी सोन्याचा बदाम सासरे किरण यांच्याकडे दिल्याचे स्वाती हिने पती सोमनाथला सांगितले. त्यानंतर सायंकाळी पती सोमनाथ मोटार सायकल घेऊन बाहेर गेले होते. सोमनाथ याने परसातल्या घरी जावून बापाला बदाम का आणला म्हणुन बाप-लेकामध्ये वाद सुरु केला. दरम्यान दोघामध्ये हाणामारी सुरु झाली. दरम्यान मुलाने बापाला उचलून खाली आपटले. बापाला राग अनावर झाला संतापलेल्या बाप किरण ठाकरे यांनी रागाच्या भरात दगड मुलाला फेकुन मारला. दगड लागल्याने मुलगा सोमनाथ खाली पडल्यानंतर वडिलांनी मोठा दगड उचलून सोमनाथ यांच्या चेहऱ्यावर व डोक्यात मारला. यात मुलगा सोमनाथ याचा चेहरा चेदामेंदा झाला, यातच मुलगा सोमनाथ ठाकरे याचा जागीच मृत्यू झाला. यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेहाचा पंचनामा केला. आरोपी किरण गोविंद ठाकरे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मुलाच्या निर्घुण हत्येच्या आरोपाखाली पोलिसांनी बापाला ताब्यात घेतले असून पुढील तपास तालुका पोलीस करीत आहेत.

### स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका

# सुप्रीम कोर्टातील सुनावणी लांबणीवर

**नवी दिल्ली :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था प्रकरणाची सुनावणी मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात काही मिनिटे पार पडली. मात्र, दोन्ही बाजूंना आपले म्हणणे स्पष्टपणे मांडता न आल्याने न्यायालयाने संताप व्यक्त केला आणि पुन्हा एकदा सुनावणी लांबणीवर पडली. या प्रकरणाची सुनावणी कधी होणार, हे अस्पष्ट आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पावसाळ्यापूर्वी होण्याची शक्यता कमी असल्याचे जाणकारांचे मत आहे.

सुनावणीत सुरुवातीलाच महान्यायाभिकर्ता तुषार मेहता यांनी राज्य सरकारच्या वतीने न्यायालयाला दोन दिवसांचा वेळ मागितला होता. याचिकाकर्त्यांनी या गोष्टीचा विरोध केला. यावर न्यायालयाने दोन्ही बाजूंना विचारणा केली. यावर दोन्ही बाजू समाधानकारक उत्तर देऊ शकल्या नाहीत. दोन्ही बाजूंची भूमिका होती की, आम्हाला निवडणुका पाहिजे. मात्र, त्यात काहीसा गोंधळ होता. त्यावर न्यायालयाने संताप व्यक्त केला आणि या संदर्भातील सर्व कागदपत्रे मागवली. हे प्रकरण आता पुढच्या सुनावणीत ऐकले जाईल. दरम्यान, न्यायालयाला होळीच्या निमित्ताने ९ ते १६ मार्च दरम्यान सुट्या आहेत.

# एखाद्याला पाकिस्तानी म्हणणे गुन्हा ठरत नाही

## सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

◆ **नवी दिल्ली, ४ मार्च**

एखाद्याला 'मियाँ-तियाँ' किंवा 'पाकिस्तानी' म्हणणे चुकीचे असले, तरी भादंविच्या कलम २९८ अंतर्गत धार्मिक भावना दुखावण्याच्या गुन्ह्यात मोडत नाही, असे स्पष्ट करीत सर्वोच्च न्यायालयाने धार्मिक भावना दुखावल्या प्रकरणातील ८० वर्षीय आरोपी हरी नारायण सिंह यांची निर्दोष मुक्तता केली.

झारखंडच्या बोकारो येथील उपविभागीय कार्यालयात उर्दू भाषांतरकार आणि कार्यवाहक लिपिक मोहम्मद शमीमुद्दीन यांनी या प्रकरणी फिर्याद दिली होती. त्यांनी आरोप केला होता की, माहिती अधिकार अर्जासंदर्भात माहिती देण्यासाठी ते अपिलकर्ते ८० वर्षीय हरी नारायण सिंह यांच्याकडे गेले होते. यावेळी हरी नारायण सिंह यांनी त्यांना 'मियाँ-तियाँ' आणि पाकिस्तानी असे संबोधले. शमीमुद्दीन यांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे हरी नारायण सिंह यांच्याविरुद्ध कलम २९८ (धार्मिक भावना दुखावणे), ५०४ (जाणीवपूर्वक अपमान आणि शांतता भंग), ५०६ (गुन्हेगारी कट रचणे), ३५३ (सरकारी सेवकाशी गैरवर्तन) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी हरी नारायण सिंह यांच्यावर आरोपपत्र दाखल केले. जुलै २०२१ मध्ये दंडाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची दखल घेत संशयित आरोपीवर समन्स जारी केला. हरी नारायण सिंह यांनी अतिरिक्त सत्र न्यायाधीश आणि त्यानंतर उच्च न्यायालयात अपिल दाखल केले. मात्र, दिलासा न मिळाल्याने त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. याचिकेवर न्या. बी. व्ही. नागरत्न आणि न्या. सतीश चंद्र शर्मा यांच्या न्यायासनात सुनावणी झाली. ११ फेब्रुवारी दिलेल्या निकालात न्यायालयाने म्हटले की, एखाद्याला 'मियाँ-तियाँ' किंवा 'पाकिस्तानी' म्हणणे निःसंशयपणे चुकीचे आहे; पण या प्रकरणात याचा चुकीचा अर्थ लावला गेला ◀ *(वृत्तसंस्था)*

# मंडई विभागातील कनिष्ठ लिपिक बाबरे निलंबीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

महापालिकेतील मंडई विभागातील कनिष्ठ श्रेणी लिपिक राजेंद्र बाबरे यांच्यावर कार्यालयीन शिस्तीचा भंग केल्याप्रकरणी निलंबनाची कारवाई करण्यात आले आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी तसे आदेश काढले आहेत.

महापालिकेतील मंडई, कोंडवाडा व लायसन विभाग या कार्यालया कडून जप्त करण्यात आलेली मोकाट जनावरे कोंडवाड्यात दाखल करुन त्या जनावरावर दंडात्मक रक्कम आकारुन जनावराच्या म ालकाची योग्यरित्या खात्री करुन मगच जनावर संबधित मालकाच्या ताब्यात देण्याची जबाबदारी कनिष्ठ श्रेणी लिपिक राजेंद्र सोपान बाबरे यांच्यावर सोपविण्यात आली होती. दरम्यान, दि.३१ डिसेंबर २०२४ रोजी कंकरेज जातीचे गोवंश जुना विडी घरकूल, सागर चौक सोलापूर येथून गुरेवाहक वाहन यांच्याकडून पकडण्यात आले होते. ते कोंडवाडा विभागामार्फत परस्पर अवैधरित्या विकण्यात आले आहे, अशी तक्रार विश्व हिंदू परिषद, बजरंग दल सोलापूर यांच्याकडून दि. ३ जानेवारी २०२५ रोजी पत्राव्दारे प्राप्त झाली होती.

# बजाज ऑटोने लाँच केली बजाज गोगो

इलेक्ट्रिक ऑटोजमधील नवाकोरा ब्रँड या सेगमेंटमधील सर्वाधिक रेंज असलेली सर्वात मोठी ई-ऑटो बजाज गोगो हा इलेक्ट्रिक ऑटोंसाठी एक अंब्रेला बँड असेल आणि या बॅडअंतर्गत प्रवासी व मालवाहतूक सेगमेंटमधील विविध प्रकारची उत्पादने उपलब्ध करून देण्यात येतील.

एका चार्जमध्ये हे वाहन 251 किमी अंतर जाते आणि ही या सेगमेंटमधील सर्वाधिक रेंज आहे. यात या इंडस्ट्रीमधील पहिलेच टू-स्पीट ऑटोमेटेड ट्रान्समिशन आहे. या तंत्रज्ञानामुळे रेंज आणि चढ चढण्याची क्षमता यात वाढ होते. ऑटो हझार्ड, ॲंटि रोल डिटेक्शन, शक्तिशाली एलईडी लाइट्स आणि हिल होल्ड असिस्ट यासारख्या या विभागात प्रथमच देण्यात आलेल्या फीचर्समुळे हे वाहन या सेगमेंटमधील सर्वोत्तम पर्याय ठरते. P5009 आणि P7012 ही पहिली दोन प्रवासी वाहने लाँच करण्यात आली असून, त्यांची किंमत अनुक्रमे रु. ३,२६,७९७ आणि रु. ३,८३,००४/- (एक्स-शोरूम दिल्ली) आहे; देशभरातील सर्व बजाज ऑटो डीलरशिपमध्ये बुकिंग सुरू झाले आहे. पुणे, भारत २७ फेब्रुवारी २०२५: जगातील सर्वात व्हॅल्यूएबल २-व्हीलर आणि ३-व्हीलर कंपनी असलेल्या बजाज ऑटो लिमिटेडतर्फे 'बजाज गोगो' हा नवाकोरा इलेक्ट्रिक ऑटो बँड सादर करण्यात आला आहे. बजाज गोगो P5009, P5012 आणि P7012 या तीन व्हेरियंट्सम ध्ये उपलब्ध आहे. या व्हेरियंट्सच्या नावांमध्ये 'झ' म्हणजे पॅसेंजर, '50' आणि '70' हे साइझ निदर्शक असून, '09' आणि '12' अनुक्रमे 9 kWh आणि 12 kWh क्षमतेची बॅटरी दर्शवतात. बजाज ऑटोने गेल्या 20 हून अधिक वर्षापासून विश्वासार्ह, ग्राहकास्नेही उत्पादने आणि भक्कम नेटवर्कच्या बळावर 3-व्हीलर उद्योगातील पर्यावरणपूरक इंधन क्रांतीचे नेतृत्व केले आहे. 'बजाज गोगो'च्या लॉन्चच्या निमिताने इलेक्ट्रिक 3-व्हीलर क्षेत्रातील आपले स्थान अधिक मजबूत करण्याचे कंपनी उद्दिष्ट आहे.

**शाश्वत वाहतुकीचा वेग वाढविणे:**

भारतातील इलेक्ट्रिक 3-व्हीलर क्षेत्राची मागील तीन वर्षांत 30% सीएजीआर या दराने वाढ झाली आहे. इलेक्ट्रिक 3-व्हीलर्सचा हा वेगवान वाढीचा प्रवास पुढेही सुरू राहण्याची अपेक्षा असून, याला भारत सरकारच्या विविध उपक्रमांबरोबरच इलेक्ट्रिक वाहनांच्या किफायतशीर ऑपरेटिंग कॉस्टचा मोठा आधार मिळत आहे. बजाज ऑटोने आपल्या विद्यम ान ई-ऑटो श्रेणीच्या माध्यमातून लॉन्चच्या पहिल्याच वर्षात इलेक्ट्रिक 3-व्हीलर क्षेत्रातील आघाडीच्या दोन कंपन्यांमध्ये आपले स्थान निश्चित केले आहे. यातून ग्राहकांचा बजाज ऑटोवरील विश्वास, कंपनीची विश्वासार्हता आणि व्यापक नेटवर्क दिसून येते.

**बजाज गोगो - ऑल्वेज ऑन द मूव्ह।**

बजाज गोगो हा भारतातील वेगाने बदलत्या ३-व्हीलर उद्द्योगाचे प्रतीक असून, सतत पुढे जाण्याच्या ब्रँडच्या ध्येयाचा प्रत्यय देतो. भारतीय संस्कृतीशी नाळ जोडलेला या ब्रँडमध्ये नव्या पिढीची ऊर्जा, तांत्रिक प्रगल्भता आणि बजाज ऑटोच्या विश्वासार्हतेसह दीर्घकालीन विश्वासार्हतेच्या मूल्यांचा मिलाफ आहे. बजाज गोगोचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे जलद आणि अखंड वाहतूक, ज्यामुळे प्रवास अधिक सोयीस्कर आणि सुरळीत होतो. विद्यमान ई-ऑटो श्रेणीच्या जागी आता बजाज गोगो सादर करण्यात येत असून, बजाज गोगोची उत्कृष्ट रेंज आणि श्रेणीतील सर्वोत्तम फीचर्समुळे ग्राहक आणि फ्लीट ऑपरेटर्सना या नवीन पर्यायाकडे वळण्यास आकर्षित होतील.

3-व्हीलर चालवणाऱ्या चालकांचे आपल्या वाहनाशी असलेले जिव्हाळ्याचे नाते आणि जगभरातील ग्राहक 3-व्हीलर्सना अनौपचारिकरित्या कशा प्रकारे संबोधतात, यावरून 'गोगो' हे नाव प्रेरित आहे. पुढच्या वेळी ग्राहकाला ई-ऑटो हवी असेल, तर तो 'गोगो' बोलावू शकतो! बजाज गोगो लवकरच आपल्या कार्गो व्हेरियंटही लाँच करणार आहे.

**टेक ऑन द गो:**

- नवीन श्रेणी ही विश्वासार्ह आणि पर्यावरणपूरक प्रवासाचा उतम पर्याय असून, यामध्ये पुढील फीचर्स आहेत
- या श्रेणीतील सर्वाधिक रेंज एकदा चार्ज केल्यावर 251 किमी प्रवास करण्याची क्षमता.
- संपूर्ण मेटल बॉडीसह आकर्षक डिझाइन.
- टू-स्पीड ऑटोमेटेड ट्रान्समिशन, ज्यामुळे अतिरिक्त रेंज आणि अधिक चांगल्या प्रकारे चढ चढते.
- ऑटो हॅझर्ड आणि ॲंटि-रोल डिटेक्शन स्टैंडर्ड म्हणून ही फीचर्स रागाविष्ट असलेली पहिली ई-ऑटो.
- एलईडी लाइट्स आणि हिल होल्ड असिस्ट.
- बॅटरी 5 वर्षांची वॉरंटी.

ज्या ग्राहकांना स्टैंडर्ड फीचर्सपेक्षा अधिक सुविधा हव्या आहेत, त्यांच्यासाठी 'प्रीमियम टेकपॅक मध्ये रिमोट इम्मोबिलायझेशन, रिव्हर्स असिस्ट आणि आणखी अनेक ॲडव्हान्स्ड फीचर्स उपलब्ध आहेत. बजाज गोगोच्या लॉन्चबाबत बोलताना बजाज ऑटो लिमिटेडच्या इंट्रा सिटी बिझनेस युनिटचे अध्यक्ष समरदीप सुबंध म्हणाले, संपूर्णतः इलेक्ट्रिक असलेल्या बजाज गोगो 3 व्हीलर श्रेणीच्या लॉन्चच्या निमित्ताने या क्षेत्रात नवे मापदंड निर्माण होतील. 251 किमीपर्यतची प्रमाणित रेंज, या श्रेणीत प्रथमच सादर करण्यात आलेली फीचर्स आणि बजाजची विश्वासार्ह सेवा यामुळे बजाज गोगो ग्राहकांसाठी कमाई वाढवण्याचा आणि डाऊनटाइम व देखभाल याचा त्रास कमी करण्याचा सर्वोतम पर्याय ठरेल. 75 हून अधिक वर्षाच्या विश्वासाचा वारसा आणि उ-व्हीलरसाठी खास विकसित करण्यात आलेल्या तंत्रज्ञानावर आधारलेल्या बजाज गोगोमुळे मालक आणि प्रवासी दोघांसाठीही हा सर्वोतम पर्याय ठरेल. पुढच्या वेळी तुम्हाला राइड हवी असल्यास, बजाज गोगो बोलवा। बजाज गोगो आता संपूर्ण भारतातील सर्व बजाज 3-व्हीलर डीलरशिपमध्ये बुकिंगसाठी उपलब्ध आहे.

# अमेरिकेतून हद्दपार केलेल्या व्यक्तीला गुजरातमध्ये अटक

◆ **अहमदाबाद, ४ मार्च**

गुजरातमधील एका व्यक्तीला अलिकडेच अमेरिकेतून हद्दपार करण्यात आले होते. त्याला अहमदाबादमध्ये दुसऱ्या नावाने जारी केलेल्या भारतीय पासपोर्टचा वापर करून बनावट ओळखीसह प्रवास केल्याप्रकरणी अटक करण्यात आली.

आरोपी जिग्नेश पटेल हा मूळचा गुजरातच्या गांधीनगर जिल्ह्यातील कलोलचा रहिवासी असून, त्याला अमेरिकेतून पनामामार्गे हद्दपार करण्यात आले होते. तो नवी दिल्लीत पोहोचला. तेथून रविवारी सायंकाळी अहमदाबादला आला. अहमदाबाद विमानतळ पोलिस ठाण्यात रविवारी त्याच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या एफआयआरनुसार, त्याने यापूर्वी वसीम खलीलच्या नावाने जारी केलेल्या पासपोर्टचा वापर करून दिल्लीहून कॅनडाला प्रवास केला होता.

त्याच्या प्रवासाच्या कागदपत्रांची तपासणी केली असता, त्याचा भारतीय पासपोर्ट हरवल्याचे कारण देत त्याने परतीच्या वेळी पनामा येथे आणिबाणीचे प्रमाणपत्र मिळवले होते. दरम्यान, सिस्टममधून प्रवाशांचे प्रस्थान तपशील तपासल्यावर हरवलेल्या पासपोर्टमध्ये काहीही आढळले नसल्याचे एफआयआरमध्ये म्हटले आहे. ◀ *(वृत्तसंस्था)*

## इम्रान खान यांच्या जीवाला धोका

**इस्लामाबाद,:** पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या जीवाला धोका आहे. तुरुंगात इम्रान खान यांची प्रकृती बिघडत आहे, परंतु त्यांना योग्य उपचार दिले जात नाहीत, असा आरोप त्यांचा पक्ष पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफने (पीटीआय) केला आहे. पीटीआयच्या आरोपानंतर डॉक्टरांचे एक पथक आदियाला तुरुंगात पोहोचले आणि इम्रान खानची वैद्यकीय तपासणी केली. माध्यमांमध्ये माहिती देण्यात आली आहे.



# पतंजली फूड पार्कचे रविवारी उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**नागपूर, दि. ४ मार्च-**

विदर्भातील शेतकर्यांच्या आत्म हत्या थांबवण्यासाठी आणि त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी पतंजली योगपीठाने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. तब्बल १००० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून नागपूरमध्ये 'पतंजली फ ूड आणि हर्बल पार्क' स्थापन केला जात असून त्याचा भव्य उद्घाटन सम ारंभ ९ मार्च २०२५ रोजी पार पडणार आहे. या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह पतंजली योगपीठाचे संस्थापक बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण देखील उपस्थित राहणार आहेत.

विदर्भातील अनेक जिल्ह्यांत गेल्या अनेक वर्षांपासून शेतकर्यांच्या आत्महत्या सातत्याने वाढत आहेत. कर्जबाजारीपणा, नैसर्गिक संकटे आणि हमीभावाच्या अभावामुळे हजारो शेतकरी संकटात सापडले आहेत. याच पार्श्वभूमीवर, पतंजली योगपीठाने 'शेतकऱ्यांच्या अर्थसक्षमीकरणासाठी आणि आत्मनिर्भरतेसाठी' हा मोठा निर्णय घेतला आहे. हा प्रकल्प म्हणजे कृषी आधारीत उद्योगांचा विशाल संकुल आहे. येथे शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात कच्चा माल खरेदी केला जाणार असून त्यावर प्रक्रिया करून निर्यातही केली जाईल.यामुळे शेतकर्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य दर मिळेल आणि त्यांचे उत्पन्न वाढेल. या प्रकल्पामुळे अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली आणि भंडारा जिल्ह्यांतील शेतकर्यांना मोठा फायदा होणार आहे.येथे जवळपास ५०,००० लोकांना थेट व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होईल. कारण हा प्रकल्प म्हणजे केवळ उद्योग नाही, तर हजारो कुटुंबांच्या उज्ज्वल भविष्याची हमी ठरणार आहे.

२०१६ मध्ये पतंजली योगपीठाने महाराष्ट्रात शेतकर्यांसाठी विशेष धोरण आखले होते. आता नागपुरातील हा प्रकल्प त्या धोरणाचा पुढील टप्पा आहे. स्वदेशी संकल्पनेला प्रोत्साहन देत बाबा रामदेव यांनी नेहमीच भारतीय शेतकर्यांच्या हितासाठी काम करण्याची ग्वाही दिली आहे.सध्या शेतकर्यांना त्यांच्या पिकाला योग्य हमीभाव मिळत नाही, यामुळे त्यांना नुकसान सहन करावे लागते. परंतु या प्रकल्पामुळे 'शेतकर्यांच्या कष्टाला आता थेट पतंजलीचा मजबूत आधार मिळणार, त्यामुळे दलालांची साखळी तोडली जाईल आणि शेतकर्यांचे उत्पन्न वाढेल. ९ मार्च रोजी होणाऱ्या उद्घाटन सोहळ्यास देशभरातील शेतकरी, पतंजली योगपीठाचे प्रमुख नेते आणि उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात नितीनजी गडकरी,देवेंद्र फडणवीस,बाबा रामदेव, आचार्य बाळकृष्ण, हे शेतकर्यांना मार्गदर्शन करतील. या प्रकल्पामुळे सेंद्रिय शेतीला चालना मिळेल, रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी होईल आणि पर्यावरणपूरक शेतीला प्रोत्साहन मिळेल. पतंजली योगपीठाने विदर्भातील शेतकर्यांना नवा आत्म विश्वास देण्याचे ध्येय ठेवले आहे. 'पतंजली फूड आणि हर्बल पार्क' हा विदर्भातील 'विदर्भाच्या कृषी क्रांतीस नवी दिशा देणारा हा प्रकल्प' ठरणार आहे. भारतीय शेतीच्या उज्ज्वल भविष्यासाठी पतंजलीचे हे धाडसी पाऊल विदर्भातील शेतकर्यांना एक नवी उमेद देईल. नागपूरसारख्या महत्त्वाच्या केंद्रातून हा प्रकल्प सुरू होत असल्याने संपूर्ण महाराष्ट्राला त्याचा फायदा होईल.निराशेच्या गर्तेत अडकलेल्या विदर्भातील शेतकऱ्यांसाठी हा प्रकल्प नवसंजीवनी ठरेल.

# देशातील ४५ कोटी लोकांवर जीवनशैलीशी संबंधित आजारांचा धोका

## अमेरिका आणि चीनचा यादीत समावेश

◆ **नवी दिल्ली, ४ मार्च**



गेल्या १०-१५ वर्षांत जीवनशैलीशी संबंधित आजारांचा धोका झपाट्याने वाढला आहे. मनात येईल ते खाणे आणि फास्ट फूडच्या वाढत्या प्रवृत्तीमुळे हृदय, मधुमेह, रक्तदाब, कोलेस्टेरॉल आणि लठ्ठपणाच्या समस्या झपाट्याने वाढत आहेत. आता द लॅन्सेटच्या एका नवीन अहवालात चिंताजनक चित्र सादर केले आहे, ज्यात असे म्हटले आहे की, २०५० पर्यंत भारतात २५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लठ्ठ किंवा जास्त वजन असलेल्या लोकांची संख्या ४५० दशलक्ष म्हणजेच सुमारे ४५ कोटींपर्यंत पोहोचू शकते. या यादीत चीन अव्वल स्थानावर आहे, जिथे २०५० पर्यंत ६२७ दशलक्षाहून अधिक लोक लठ्ठ असतील, तर अमेरिकेत लठ्ठपणाने ग्रस्त लोकांची संख्या २१४ दशलक्षांपर्यंत पोहोचेल.

संशोधनात असे म्हटले आहे की, जर सर्व काही असेच चालू राहिले, तर जगभरात २५ वर्षांपेक्षा जास्त वयाचे सुमारे ३.८ अब्ज लोक लठ्ठ होऊ शकतात, जी एका अंदाजानुसार, त्यावेळच्या जगातील तरुण लोकसंख्येच्या निम्म्याहून अधिक असेल. या आकडेवारीपैकी १.९५ अब्ज लोक लठ्ठ असल्याचा अंदाज आहे. त्याच वेळी उप-सहारा आफ्रिकेच्या अतिउष्ण भागात राहणाऱ्या लोकांमध्ये लठ्ठपणाने ग्रस्त असलेल्या लोकांची संख्या २५४.८ टयांनी वाढण्याचा अंदाज आहे.

**कोण जास्त लठ्ठ आहे, पुरुष की महिला?**

जर आपण २०२१ पर्यंतच्या आकडेवारीवर नजर टाकली, तर जगभरात एकूण २.११ अब्ज तरुण लठ्ठ किंवा जास्त वजनाचे असल्याचे आढळून आले. त्यापैकी १ अब्ज पुरुष आणि १.११ अब्ज महिला होत्या. यात चीनमध्ये सुमारे ४०२ दशलक्ष लोक लठ्ठ आढळले. भारतात १८० दशलक्ष लोक लठ्ठ असल्याचे आढळून आले आणि अमेरिकेत १७२ दशलक्ष लोक लठ्ठपणाने ग्रस्त असल्याचे आढळून आले.

**चीन, भारत, अमेरिकेत वेगाने वाढतोय् लठ्ठपणा**

या अभ्यासात असे म्हटले आहे की, चीन, भारत आणि अमेरिकेत लठ्ठ किंवा जास्त वजन असलेल्या लोकांची संख्या सर्वाधिक आहे. पण, असे अनेक देश आहेत, जिथे लठ्ठ लोकांची संख्या झपाट्याने वाढत आहे. भारतासोबतच चीन, अमेरिका, ब्राझील, रशिया, मेक्सिको, इंडोनेशिया आणि इजिप्त यासारख्या देशांची निम्मी लोकसंख्या लठ्ठपणाकडे वाटचाल करीत आहे. फास्ट फूड हे याचे प्रमुख कारण असल्याचे मानले जाते.

**फास्ट फूड प्रमुख कारण**

फास्ट फूडबाबत २००९ ते २०१९ दरम्यान अल्ट्रा-प्रोसेस्ड अन्न आणि पेयांच्या दरडोई विक्रीत सर्वाधिक वार्षिक वाढ नोंदवणारे देश म्हणजे कॅमेरून आणि व्हिएतनाम. या गोष्टी लठ्ठपणाचे सर्वांत मोठे कारण बनत आहे. वेळीच याकडे लक्ष दिले नाही, तर मोठी लोकसंख्या गंभीर आजारांच्या विळख्यात सापडेल. ◀ *(वृत्तसंस्था)*

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# महापालिका राबविणार उष्माघात कृती आराखडा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

उन्हाळा सुरू झाला आहे. यामुळे सोलापूर शहरातील तापमानात वाढ होत आहे. शहरात उन्हाळी झळा वाढल्या असून कमाल तापमान ३८ अंशावर जात आहे. तप्त उन्हात नागरिक उष्माघाताला बळी पडू नयेत. त्यांचे आरोग्य जपले जावे यासाठी सोलापूर महापालिका आरोग्य विभाग उष्माघात कृती आराखडा राबविणार आहे, अशी माहिती महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी दिली आहे.

### ही आहेत उष्माघाताची कारणे, लक्षणे

उन्हाळ्यात हमाल, शेत मजूर, विट भटटी कामगार फार वेळ कामे करणे, कारखान्याच्या बॉयलर रूम मध्ये काम करणारे, अधिक तापमानाच्या खोलीत काम करणे, घट कपडयांचा वापर आदी. तर उष्माघाताची लक्षणे म्हणजे थकवा येणे, ताप येणे, त्वचा कोरडी पडणे, भूक न लागणे, पोट-यात वेदना किंवा गोळे येणे, डोके दुखणे, रक्तदाब वाढणे, मानसिक बेचैनी अस्वस्थता, बेशुध्द अवस्था ही लक्षणे आहेत.

### हे आहेत प्रतिबंधात्मक उपाय

सकाळी किंवा सायंकाळी शक्यतो कमी तापमापान असताना कामे करावीत. सैल पांढऱ्या रंगाचे कपडे वापरावे. सरबत, पन्हे किंवा साधे पाणी अधून मधून घेत राहावे. उन्हात बाहेर जाताना डोक्यावर टोपी, टॉवेल किंवा उपरणे वापरणे. उन्हात बाहेर पडताना गॉगल किंवा चष्माच्या वापर करावा. लहान मुलं किंवा प्राण्यांना कार मध्ये बंद करून जाऊ नये. विशेषतः लहान मुले, गरोदर स्त्रिया आणि ज्येष्ठ नागरिक यांनी शक्यतो सकाळी किंवा सायंकाळीच कामानिमित्ताने घराबाहेर पडावे. बाहेरील ज्युस, पाणी व खाद्यपदार्थांचा वापर टाळावा. शक्यतो फिल्टरचे पाणी, ताक, लिंबू शरबत, नारळ पाणी याचा वापर करावा, असे आवाहन महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी केले आहे.



वाढत्या उन्हामुळे नागरिकांनी आवश्यक ती काळजी घेणे गरजेचे आहे. नागरिकांनी कुलरसह, उष्णतारोधक पेंट घराच्या छतावर मारल्यास २ ते ३ डिग्री तापमान कमी होण्यास मदत होईल. शहरात विविध जागी सेवा भावी संस्था तर्फे पाणपोईची व्यवस्था केल्यास नागरिकांची सोय होईल. बेघर लोकांसाठी व उन्हाळयात नागरिकांसाठी पोलिस प्रशासन, स्वयंसेवी संस्थासह इतरानी सहकार्य करण्याचे आवाहन या निमित्ताने करण्यात डॉ. राखी माने यांनी केले आहे.

ट्राफिक सिंगनल दुपारी बंद ठेवणे, सार्वजनिक खेळांचे आयोजन दुपारी न करणे, सार्वजनिक बगीचे सुरू राहण्याचे वेळेत वाढ करणे, बांधकाम कंत्राटदाराद्वारे मजुरांच्या कामाचे वेळेत बदल व जनजागृती करण्याचे सुचना नागरी आरोग्य केंद्राद्वारे दिल्या आहेत. रूग्णवाहिकेचा यात सहभाग करण्याच्या सुचना दिल्या आहेत,असे आरोग्य अधिकारी डॉ. माने यांनी स्पष्ट केले.



# शिवरायांच्या जनकल्याणाचा वसा अहिल्यादेवींनी चालवला

## प्रा. डॉ. प्रभाकर कोळेकर; वालचंद महाविद्यालयात व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

सोलापूर विद्यापीठाच्या नामविस्तार दिन सप्ताह निमित्त वालचंद महाविद्यालयात पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर जीवन व कार्य या विषयावर आयोजित केलेल्या व्याख्यानात प्रा. डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी अहिल्यादेवी या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जनकल्याणकारी शासनाचा वसा चालविणाऱ्या राज्यकर्त्या होत्या असे मत व्यक्त केले. याप्रसंगी बोलताना प्रा.डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी अहिल्यादेवी यांच्याकडे असलेल्या अध्यात्मिक वृत्तीचा वापर त्यांनी आपल्या राज्यातील जनतेच्या कल्याणाकरता केला व त्यांच्या या वृत्तीमुळे शेजारील सर्व राज्यांशी त्यांचे संबंध सलोख्याचे राहिल्याचे सांगून त्यामुळेच राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण होऊ शकली, असे मत व्यक्त केले.

अहिल्यादेवींनी कौशल्य विकासास प्राधान्य देऊन महेश्वर येथे विविध विणकरांना बोलावून तेथे कापड उद्योग भरभराटीस आणला.आजही महेश्वर साडी प्रसिद्ध आहे असे ते म्हणाले. अहिल्यादेवी यांनी वैराग्य वृत्ती बरोबरच जनसेवा हे आयुष्याचे ब्रीद मानले. आपण करीत असलेल्या सेवाकार्यात त्यांनी भूतदयेलाही प्राधान्य दिले. त्यामुळेच जनावरांच्या करता पाण्याची सोय करतानाच, पाण्यामध्ये असलेल्या माशांच्या उदरभरणाची ही सोय त्यांनी केली. प्रशिक्षित कवायती महिलांचे लष्कर उभे करून लष्कराप्रती असलेली आपली सजगता त्यांनी दाखवून दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांनी अहिल्यादेवी यांनी नद्यांना बांधलेले घाट, मंदिरांचा केलेला जिर्णोद्धार व जनसेवेची केलेली कामे यामुळे त्या पुण्यश्लोक या पदास पोहोचल्या. असे मत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्राध्यापक हनुमंत मते यांनी करून दिला. कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. रामचंद्र गोरे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. अंजना सोनवणे यांनी केले.

मनोरमा परिवार अंतर्गत

**अंकुर सर्व व्यावसायिक नागरी सह. पतसंस्था मर्या., सोलापूर**

विमल कॉम्प्लेक्स, माशाळ वस्ती, विजापूर रोड, सोलापूर

**ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना**

९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर

६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर

९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क

श्री. राचण्णा माळसिध्दप्पा कटारे — व्हा. चेअरमन (मो. ९४२१०७५४९८)

प्राची अनिल गोसावी — व्यवस्थापिका (मो. ७०५८९५५९८०)

# आरटीई प्रवेश प्रक्रिया १० मार्चपर्यंत मुदतवाढ

### पहिल्या टप्प्यातील प्रवेशप्रक्रीया सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

सोलापूर जिल्ह्यात २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांकरिता १४ फेब्रुवारीपासून आरटीई प्रवेशाला सुरूवात करण्यात आली असुन २७ फेब्रुवारीपर्यंत जिल्ह्यात ६ हजार १७७ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी २६८२ विद्यार्थी प्रवेशास पात्र ठरले आहेत.

जिल्ह्यात २८६ शाळांमध्ये २ हजार ६८२ जागांसाठी आरटीईअंतर्गत प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. पहील्या टप्यात २ हजार ६८२ नशिबवान विद्यार्थ्यांची यादी घोषित करण्यात आली आहे. या पालकांना त्यांच्या मोबाइलवर प्रवेश निश्चित करण्याबाबत संदेश देखील देण्यात आले आहेत. समितीकडून तालुकास्तरीय कागदपत्रांची पडताळणी करण्यात येत आहे. त्यांच्या शिफारशीनंतर संबधित शाळेमध्ये जाऊन पाल्यांचा प्रवेश निश्चित होणार आहे. पसिल्या टप्यात आरटीई प्रवेशासाठी १० मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून पालकांचे अर्ज भरण्यासाठी धावफळ दिसुन येत आहे. आरटीईसाठी जिल्ह्यातील एक हजार १७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. अद्यापही एक हजार ४२४ विद्यार्थी प्रवेशापासून वंचित आहेत. शासनाने मुदतवाढ दिल्याने विद्यार्थ्यांना आता १० मार्चपर्यंत प्रवेश घेता येणार आहे. एक हजार १७ जणांनी प्रवेश घेतला आहे. अद्यापही एक हजार ४२४ जणांचा प्रवेश बाकी आहे. आरटीई प्रवेशासाठी २८ फेब्रुवारी प्रवेशासाठी शेवटची संधी होती. शासनाने दिलेल्या मुदतीमध्ये फक्त चाळीस टक्के विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. त्यामुळे शासनाकडून प्रवेशासाठी मुदतवाढ दिली आहे.

### प्रवेश घेतलेले तालुकानिहाय विद्यार्थी

सोलापूर शहर १९०, माळशिरस १६२, बार्शी १४४, पंढरपुर १२७, करमाळा ८६,माढा ८३, मोहोळ ८०, दक्षिण सोलापूर ७२, अक्कलकोट - ३४, मंगळवेढा - ३१, उत्तर सोलापूर - ८ , सांगोला ०० असे एकूण १०१७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत.

### आरटीईच्या शिल्लक जागा

पंढरपूर - २०२, सांगोला १९२, माळशिरस १६६ , बार्शी १५४, उत्तर सोलापूर १५१, सोलापूर शहर - १४१ , माढा ११६, करमाळा ११६ , मोहोळ ७०, दक्षिण सोलापूर ६२, अक्कलकोट ५४, मंगळवेढा ४६,अशा एकूण १ हजार ४२४ जागा शिल्लक आहेत.

# पैशाच्या कारणावरून तरूणास टॉमीने मारहाण

**सोलापूर, दि. ४ मार्च -**

पैशाच्या कारणावरून तरूणास टॉमीने मारहाण करण्यात आली. लक्ष्मण अमोगसिध्द देशमुख (वय ३६, रा. कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. ३ मार्च रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास कुंभारी टोल नाक्याजवळ पैशाच्या कारणावरून चंदू बंडे व तीन जणांनी मिळून लक्ष्मण देशमुख यांस टॉमी व व्हिल पानाने मारहाण केली. यामध्ये देशमुख यांच्या डोक्यास मार लागल्याने त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

**बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal sol@mahabank.co.in

**नियम - 8 (1)**
**ताबा सूचना**

तर, अधोस्वाक्षरी केलेले हे बँक ऑफ महाराष्ट्रचे सिक्युरिटायझेशन आणि फायनान्शिअल रिकन्ट्रक्शन अंतर्गत अधिकृत अधिकारी आहेत. मालमत्ता आणि सुरक्षा व्याजाची अंमलबजावणी कायदा, 2002 आणि कलमाच्या उप-कलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 3 सह 13 वाचले, 28/04/2024 रोजी मागणी सूचना जारी करून खालील गोष्टींना आवाहन केले. नोटीस मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्याचा उल्लेख कर्जदार आणि जामीनदारांनी केला आहे.

कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यास, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सामान्य जनतेला नोटीस दिली जाते की खाली स्वाक्षरीने त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे 28/02/2025 रोजी सुरक्षा व्याज अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचलेल्या अधिनियमाच्या कलम 13 च्या उप कलम (4) अंतर्गत.

विशेषत: कर्जदाराला आणि सामान्यत: जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्ता आणि त्यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये. वर नमूद केलेल्या रकमेसाठी मालमत्ता बँक ऑफ महाराष्ट्रच्या शुल्काच्या अधीन असतील.

कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, पूर्तता करण्यासाठी आमंत्रित केले आहे. सुरक्षित मालमत्ता.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | मागणी सूचना तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | शाखा- बार्शी<br>कर्जदार -<br>१. श्री. अमोल रमेश पाटील<br>आदित्य केमिकल्स गोटेमाळ सासवड, जेजुरी रोड, खराडी पुणे-412301<br>हमीदार -<br>श्री.अतुल पुरषोत्तम शेटे<br>S/O- पुरुषोत्तम राजाराम शेटे, BTM कॉलनी, लातूर रोड बार्शी, सोलापूर | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन<br>१ नोंदणीकृत गहाणखत प्लॉट क्रमांक 14, गट क्रमांक 801/2, अलीपूर रोड, गुंड प्लॉटजवळ, बार्शी सोलापूर.<br>सीमा खालीलप्रमाणे:-<br>उत्तर- त्याच गट क्रमांकाच्या प्लॉट क्रमांक 15<br>पूर्व- त्याच गट क्रमांकाच्या बाहेर मालमत्ता<br>पश्चिम- रस्ता 9 मीटर<br>दक्षिण- त्याच गट क्रमांकाच्या प्लॉट क्रमांक 13 | मागणी सूचना दिनांक<br>30.01.2021<br>रु. 24,55,457.00/- अधिक लागू न केलेले व्याज (रु. चोवीस लाख पंचावन्न हजार चारशे सत्तावन्न रुपये) दिनांक 30.01.2021 पासून कर्जाची वसुली होईपर्यंत<br>प्रत्यक्ष ताबा तारीख:<br>03.03.2025 |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - ०३/०३/२०२५

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**

विभागीय स्टोअर ऑफिस सेंट्रल रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्यावतीने आणि त्यांच्या वतीने, खालील कामांसाठी सक्षम, नामांकित फर्म / कंत्राटदारांकडून Rallway च्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवतात. निविदा क्रमांक: TDK-SOLPUR-2025 कामाचे नाव: सोलापूर विभागात 36 महिन्यांच्या कालावधीसाठी रेल्वे TDK च्या बदल्यात परिचरांची नियुक्ती. निविदेसोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नुसार कामाची व्याप्ती. निविदा अटींनुसार किंमत तफावत क्लॉज लागू आहे. फर्म 08 मनुष्यबळासाठी एकरकमी खर्च देऊ करेल, 36 महिन्यांसाठी दिवसाचे 12 तास (फर्मने बोली सुरक्षा दाखल करण्यापूर्वी संलग्न परिशिष्ट काळजीपूर्वक वाचावे.) बयाणा रक्कम (INR): रु. 202040.00 www.ireps.gov.in वर टेंडर बंद करण्याची तारीख आणि वेळ: 20/03/2025 रोजी 11.00 नंतर निविदाकारांना सूचित केले जाते की त्यांनी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटवर वारंवार भेट द्यावी आणि यासाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुध्दीकरण लक्षात घ्या.

निविदा वेबसाइट: www.ireps.gov.in

वरिष्ठ विभागीय साहित्य व्यवस्थापक
मध्य रेल्वे, सोलापूर

Apex-055

असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है

## जाहीर प्रसिध्दीकरण

ॲड. एस. एस. बळे रा. माढा, ता. माढा,
निशान नंबर ६
दि.कि. अर्ज क्र.२९/२०२५

**बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात**

१) **करण लक्ष्मन काळुखे तर्फे अ.पा.क. आई**
पुनम लक्ष्मण काळुखे वगैरे -- **अर्जदार**
**विरुध्द**
**महाराष्ट्र शासन वगैरे** -- **सामनेवाला**

तमाम लोकांना विशेषतः मौजे ढवळस, ता. माढा, जि. सोलापूर येथील व परिसरातील लोकांना कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार यांनी बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात दि. कि. अर्ज क्रमांक २९/२०२५ हा मौजे ढवळस, ता. माढा, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नंबर १६१ पैकी अर्जदार नंबर १ चे हिश्याचे क्षेत्रातील दक्षिण बाजूची मिळकत क्षेत्र ०१ हे. ०० आर, आकार ०१ रु. ३७ पैसे हे विक्रीस काढलेले असून त्याची विक्री परवानगी मिळणेसाठीचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने कळविण्यात येते की, वरील अज्ञान अर्जदार नंबर १ याचे नावे असलेल्या वरील नमूद मिळकतीबाबत विक्री परवानगी मिळणेबाबतचा आदेश पारीत होणेबाबत कोणाची काही तक्रार असलेस अथवा कोणाचा काही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हितसंबंध असल्यास हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून १ महिन्याचे आत किंवा पुढील नेमलेली तारीख ९/४/२०२५ रोजी स्वतः अथवा विधीज्ञामार्फत या न्यायालयात हजर राहून हरकत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाची हरकत न आलेस अर्जदाराने मागणी केलेप्रमाणे अर्जदाराचा पुरावा घेवून पुढील योग्य ते आदेश पारीत केले जातील. तदनंतर कोणाची काही एक तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. हे जाहीर प्रसिध्दीकरण आज दि. ४/३/२०२५ रोजी माझी सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही/-
लिपीक

शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक,
अति. जिल्हा न्यायालय,
बार्शी, ता. बार्शी

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि. कि. अर्ज नं. ०२/२०२५

**बार्शी येथिल मे. सिव्हील जज्ञ ज्युनिअर डिक्रीजन सो. यांचे कोर्टात**

१) **शकिला साहेबलाल शेख,** वय- ६१ वर्षे,
धंदा - घरकाम, रा. ई, ५०४ ए, न्यू आकृती बिल्डींग,
गंगा कॉम्प्लेक्स, मीरा रोड, ठाणे, ४०१ १०७
२) **सदफ साहेबलाल शेख,** वय- २४ वर्षे,
धंदा - शिक्षण, रा. ई, ५०४ ए, न्यू आकृती बिल्डींग, -- **अर्जदार**
गंगा कॉम्प्लेक्स, मीरा रोड, ठाणे, ४०१ १०७
३) **अयमन साहेबलाल शेख,** वय- २३ वर्षे,
धंदा - शिक्षण, रा. ई, ५०४ ए, न्यू आकृती बिल्डींग,
गंगा कॉम्प्लेक्स, मीरा रोड, ठाणे, ४०१ १०७
**विरुध्द**
**कोणी नाही** -- **सा.वाला**

**ज्याअर्थी,** यातील अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २,३ यांचे वडिल साहेबलाल अ. रहेमान शेख हे दि. १२/०६/२०२४ रोजी मयत झालेले असून त्यांचे पश्चात अर्जदार हेच जवळचे, कायदेशीर वारस होते व आहेत. त्यासाठी अर्जदार यांचे नावे सदरचा वारस दाखला (heirship certificate) मिळणेकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**त्या अर्थी,** सदर मयत साहेबलाल अ. रहेमान शेख यांना यातील अर्जदार यांचे व्यतिरिक्त इतर कोणाचे वारसा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी सदर प्रसिध्दीकरणापासून ३० दिवसाचे आत अगर नेमली तारीख ०५/०४/२०२५ रोजी सदर अर्जाचे कामी हजर राहून कागदपत्रानिशी आपली हरकत वा म्हणणे दाखल करावे. मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे न आलेस कोणाचे काहीही म्हणणे नाही असे समजून अर्जदार यांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल कळावे.

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले. ता, २८/०२/२०२५.

शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
मे. दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी

**Classifieds**

**पाहिजे**

सोलापूर तसेच आसपासच्या जिल्ह्यात कॉम्प्रेसरच्या सेल्स, सर्व्हिससाठी, प्रतिनिधी हवा आहे. स्वराज न्युमॅटीक्स, सोलापूर
फोन : ८३८००५०४८३

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

## जाहीर प्रसिध्दीकरण

ॲड. एस. एस. बळे रा. माढा, ता. माढा,
निशान नंबर ६
दि.कि. अर्ज क्र.२८/२०२५

**बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात**

१) **करण लक्ष्मन काळुखे तर्फे अ.पा.क. आई**
पुनम लक्ष्मण काळुखे वगैरे -- **अर्जदार**
**विरुध्द**
**महाराष्ट्र शासन वगैरे** -- **सामनेवाला**

तमाम लोकांना विशेषतः मौजे ढवळस, ता. माढा, जि. सोलापूर येथील व परिसरातील लोकांना कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार यांनी बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात दि. कि. अर्ज क्रमांक २८/२०२५ हा मौजे ढवळस, ता. माढा, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नंबर १६१ पैकी अर्जदार नंबर १ चे हिश्याचे क्षेत्रातील दक्षिण बाजूची मिळकत क्षेत्र ०१ हे. ०० आर, आकार ०१ रु. ३८ पैसे हे विक्रीस काढलेले असून त्याची विक्री परवानगी मिळणेसाठीचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने कळविण्यात येते की, वरील अज्ञान अर्जदार नंबर १ याचे नावे असलेल्या वरील नमूद मिळकतीबाबत विक्री परवानगी मिळणेबाबतचा आदेश पारीत होणेबाबत कोणाची काही तक्रार असलेस अथवा कोणाचा काही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हितसंबंध असल्यास हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून १ महिन्याचे आत किंवा पुढील नेमलेली तारीख ९/४/२०२५ रोजी स्वतः अथवा विधीज्ञामार्फत या न्यायालयात हजर राहून हरकत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाची हरकत न आलेस अर्जदाराने मागणी केलेप्रमाणे अर्जदाराचा पुरावा घेवून पुढील योग्य ते आदेश पारीत केले जातील. तदनंतर कोणाची काही एक तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. हे जाहीर प्रसिध्दीकरण आज दि. ४/३/२०२५ रोजी माझी सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही/-
लिपीक

शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक,
अति. जिल्हा न्यायालय,
बार्शी, ता. बार्शी

## जाहीर प्रसिध्दीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम १९ अनुसार तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांच्या कार्यक्षेत्रातील क प्रकारातील खालील सहकारी संस्थांचे प्रसिध्दीकरणाचे निवडणूक कार्यक्रमातील विविध टप्पे खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नाव | नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी तारीख व वेळ | नामनिर्देशन प्रत्र छाननी दिनांक व वेळ | नामनिर्देशन प्रत्र माघार घेण्याचा दिनांक व वेळ | उमेदवारांना निशानी वाटण्याची तारीख व वेळ | मतदान, मतमोजणी व निकाल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | विष्णुपंत कुलकर्णी ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था मर्या., माळशिरस | श्री. एस.ए. पाटील सहा. सह. अधिकारी | दि.०५/०३/२०२५ ते ११/०३/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.१२/०३/२०२५ सकाळी ११.०० वा | दि.१३/०३/२०२५ ते २७/०३/२०२५ सकाळी ११.०० ते. दुपारी ०३.०० | दि.२८/०३/२०२५ सकाळी ११.०० | दि.०५/०४/२०२५ मतदान स.०८ ते दु.०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| २ | महात्मा फुले ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., माळीनगर | श्री. डी.पी. राऊत लेखापरिक्षक | दि.०५/०३/२०२५ ते ११/०३/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.१२/०३/२०२५ सकाळी ११.०० वा | दि.१३/०३/२०२५ ते २७/०३/२०२५ सकाळी ११.०० ते. दुपारी ०३.०० | दि.२८/०३/२०२५ सकाळी ११.०० | दि.०५/०४/२०२५ मतदान स.०८ ते दु.०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| ३ | जयशंकर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., शिंदेवाडी | श्री. एस.के. यादव सहा. सह. अधिकारी | दि.०५/०३/२०२५ ते ११/०३/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.१२/०३/२०२५ दुपारी ०१.०० वा | दि.१३/०३/२०२५ ते २७/०३/२०२५ सकाळी ११.०० ते. दुपारी ०३.०० | दि.२८/०३/२०२५ सकाळी ११.०० | दि.०६/०४/२०२५ मतदान स.०८ ते दु.०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| ४ | अकलूज कृषी उत्पन्न बाजार समिती सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या. अकलूज | श्री. बी.एच. बंडगर मुख्यलिपिक | दि.०५/०३/२०२५ ते ११/०३/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.१२/०३/२०२५ सकाळी ११.०० वा | दि.१३/०३/२०२५ ते २७/०३/२०२५ सकाळी ११.०० ते. दुपारी ०३.०० | दि.२८/०३/२०२५ सकाळी ११.०० | दि.०५/०४/२०२५ मतदान स. ०८ ते दु.०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| ५ | श्रीराम ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., पिलिव (लक्ष्मीनगर) | श्री. डी.पी. राऊत लेखापरिक्षक | दि.०५/०३/२०२५ ते ११/०३/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.१२/०३/२०२५ दुपारी ०१.०० वा | दि.१३/०३/२०२५ ते २७/०३/२०२५ सकाळी ११.०० ते. दुपारी ०३.०० | दि.२८/०३/२०२५ सकाळी ११.०० | दि.०६/०४/२०२५ मतदान स.०८ ते दु.०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| ६ | सयाजीराजे पार्क पगारदार नोकरांची सहकारी पतसंस्था मर्या. आनंद नगर | श्री. ए.जी. जाधव सह. अधी.श्रे.१ | दि.०५/०३/२०२५ ते ११/०३/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.१२/०३/२०२५ दुपारी ०१.०० वा | दि.१३/०३/२०२५ ते २७/०३/२०२५ सकाळी ११.०० ते. दुपारी ०३.०० | दि.२८/०३/२०२५ सकाळी ११.०० | दि.०६/०४/२०२५ मतदान स.०८ ते दु.०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| ७ | शिवप्रसाद अर्बन वुमन क्रेडीट को-ऑपरेटीव्ह सोसायटी लि., नातेपुते | श्री. एस.ए. पाटील सहा. सह. अधिकारी | दि.०५/०३/२०२५ ते ११/०३/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.१२/०३/२०२५ दुपारी ०१.०० वा | दि.१३/०३/२०२५ ते २७/०३/२०२५ सकाळी ११.०० ते. दुपारी ०३.०० | दि.२८/०३/२०२५ सकाळी ११.०० | दि.०६/०४/२०२५ मतदान स.०८ ते दु.०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| ८ | शिवप्रसन्न वुमन रुरल क्रेडीट को-ऑपरेटीव्ह सोसायटी लि., संगम | श्री. ए.जी. जाधव सह. अधी. श्रे.१ | दि.०५/०३/२०२५ ते ११/०३/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.१२/०३/२०२५ सकाळी ११.०० वा | दि.१३/०३/२०२५ ते २७/०३/२०२५ सकाळी ११.०० ते. दुपारी ०३.०० | दि.२८/०३/२०२५ सकाळी ११.०० | दि.०५/०४/२०२५ मतदान स.०८ ते दु.०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| ९ | महालिंगेश्वर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. खुडूस | श्री. बी.एच. बंडगर मुख्यलिपिक | दि.०५/०३/२०२५ ते ११/०३/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.१२/०३/२०२५ दुपारी ०१.०० वा | दि.१३/०३/२०२५ ते २७/०३/२०२५ सकाळी ११.०० ते. दुपारी ०३.०० | दि.२८/०३/२०२५ सकाळी ११.०० | दि.०६/०४/२०२५ मतदान स.०८ ते दु.०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| १० | समता ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., नातेपुते | श्री. एस.के. यादव सहा. सह. अधिकारी | दि.०५/०३/२०२५ ते ११/०३/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.१२/०३/२०२५ सकाळी ११.०० वा | दि.१३/०३/२०२५ ते २७/०३/२०२५ सकाळी ११.०० ते. दुपारी ०३.०० | दि.२८/०३/२०२५ सकाळी ११.०० | दि.०५/०४/२०२५ मतदान स.०८ ते दु.०४ नंतर मतमोजणी व निकाल |

सही/-
तालुका सहकारी निवडणूक अधिकारी,
तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था.
अकलूज, ता. माळशिरस, जि.सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# विजयाच्या ईर्ष्येने खेळणार न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका

## अंतिम सामन्यासाठी आज होणार कडवी झुंज

◆ **लाहोर, ४ मार्च**

जागतिक दर्जाच्या प्रतिभेने समृद्ध न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका बुधवारी येथे चॅम्पियन्स ट्रॉफीच्या दुसऱ्या उपांत्य फेरीत एकमेकांसमोर येतील तेव्हा जागतिक स्पर्धांच्या महत्त्वाच्या सामन्यांमध्ये खेळाडूंच्या खराब कामगिरीचा कलंक धुवून टाकण्याचा प्रयत्न करतील.

कागदावर, दोन्ही संघ समान वाटतात. दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंडने अनुक्रमे १९९८ आणि २००० मध्ये प्रत्येकी एकदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली आहे, परंतु त्यावेळी या स्पर्धेला आयसीसी नॉकआउट ट्रॉफी म्हटले जात होते आणि आताचे महत्त्व त्याला नव्हते. दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड देखील जेतेपद मिळविण्यासाठी उत्सुक असतील.

एकदिवसीय विश्वचषकात (२०१५ आणि २०१९) दोनदा आणि टी२० विश्वचषकात (२०२१) एकदा अंतिम फेरीत पोहोचल्यानंतर न्यूझीलंडला जेतेपद पटकावता आले नाही. मिशेल सँटनरच्या नेतृत्वाखालील न्यूझीलंडने गट अ मध्ये भारताच्या मागे दुसरे स्थान पटकावले, तर दक्षिण आफ्रिकेने गट ब मध्ये ऑस्ट्रेलियाला मागे टाकत अव्वल स्थान पटकावले. दोन्ही संघांमध्ये फारसा फरक नाही आणि बहुतेक विभागांमध्ये ते समान आहेत.





**न्यूझीलंड वि. दक्षिण आफ्रिका उपांत्य सामना**
**स्थळ :** गडाफी स्टेडियम, लाहोर
**वेळ :** दुपारी २:३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

तथापि, गोलंदाजीतील विविधतेमुळे दक्षिण आफ्रिकेला थोडीशी आघाडी असल्याचे दिसून येते. दोन्ही संघांकडे त्यांच्या फलंदाजी क्रमात पुरेशी ताकद आहे आणि त्यांच्याकडे उत्कृष्ट क्षेत्ररक्षक देखील आहेत. सामन्याच्या निकालात फिरकीपटूंची भूमिका महत्त्वाची असण्याची अपेक्षा आहे. गडाफी स्टेडियममधील खेळपट्ट्या थोड्या हळू आहेत, पण त्या दुबईतील खेळपट्ट्यांइतक्या फिरत नाहीत. अशा परिस्थितीत दोन्ही संघांचे फिरकी गोलंदाज कशी कामगिरी करतात हे पाहणे मनोरंजक असेल.

टॉम लॅथम म्हणाला, आम्ही ज्या (दक्षिण आफ्रिकेच्या) संघाविरुद्ध खेळलो तो थोडा वेगळा होता. त्या संघात असे अनेक खेळाडू होते जे या संघात नव्हते. त्यांचे काही प्रमुख खेळाडू त्यावेळी टी-२० मध्ये खेळत होते, त्यामुळे परिस्थिती थोडी वेगळी असेल. तथापि, मला वाटते की दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळताना लाहोरच्या त्या अनुभवाचा आम्हाला फायदा होईल.

लॅथम हा आतापर्यंत स्पर्धेत न्यूझीलंडचा सर्वांत यशस्वी फलंदाज आहे, त्याने १८७ धावा केल्या आहेत. केन विल्यमसननेही भारताविरुद्ध ८१ धावांची खेळी करून फॉर्ममध्ये परत येण्यात यश मिळवले. गोलंदाजीत, मॅट हेन्रीने भारताविरुद्ध संथ खेळपट्टीवरही उत्कृष्ट कामगिरी केली आणि आठ गड्यांसह सर्वाधिक गडी बाद करणारा गोलंदाज आहे.

न्यूझीलंडकडे कर्णधार मिशेल सँटनर, मायकेल ब्रेसवेल, रचिन रवींद्र, ग्लेन फिलिप्स आणि मार्क चॅपमन यांच्या रूपात चांगले फिरकी गोलंदाज आहे. दक्षिण आफ्रिकाही उत्तम फॉर्ममध्ये आहे. प्रोटीय संघाने या स्पर्धेत त्यांच्या सर्वोत्तम संघांपैकी एकाला मैदानात उतरवले आहे.

◀ *(वृत्तसंस्था)*

# ताईके ताकेमा भारतीय महिला संघाशी करारबद्ध

◆ **नवी दिल्ली, ४ मार्च**

भारताने २०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकपर्यंत राष्ट्रीय महिला हॉकी संघाच्या ड्रॅग-फ्लिकर्ससोबत काम करण्यासाठी डच दिग्गज ताईके ताकेमाशी करार केला आहे.





भारताच्या एफआयएच प्रो लीग मोहिमेपूर्वी गेल्या महिन्यात भुवनेश्वर येथे १० ते १६ फेब्रुवारी दरम्यान झालेल्या सात दिवसांच्या शिबिरात ताईके यांनी भारतीय खेळाडूंना प्रशिक्षण दिले होते. प्रो लीगच्या देशांतर्गत लीगमध्ये भारत इंग्लंड, जर्मनी, नेदरलँड्स आणि स्पेनविरुद्ध खेळला.

या सात दिवसांच्या शिबिरात दीपिका, मनीषा चौहान, सोनम आणि अन्नूसारख्या खेळाडूंसह काही ज्युनियर खेळाडूंनी भाग घेतला. ताईके याच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या शिबिराचा मुख्य उद्दिष्ट ड्रॅग फ्लिकची अचूकता सुधारण्यासोबतच तांत्रिक कौशल्ये वाढवणे होते.

भारतीय महिला संघाचे मुख्य प्रशिक्षक हरेंद्र सिंग म्हणाले की, हे शिबिर खेळाडूंसाठी खूप फायदेशीर होते आणि ताईके लॉस एंजेलिस गेम्सपर्यंत अल्पकालीन आधारावर संघासोबत काम करत राहतील.

ड्रॅग फ्लिकच्या बाबतीत ताईके हा सर्व काळातील महान दिग्गजांपैकी एक आहे. हरेंद्र सिंग म्हणाले, या क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी मी हॉकी इंडियाला त्याला संघात आणण्याची विनंती केली. तो त्याच्या तंत्रात सुधारणा करण्यासाठी आणि ड्रॅग फ्लिक प्रक्रिया सोपी करण्यासाठी टीमसोबत काम करत आहे.

हरेंद्र म्हणाले, ड्रॅग फ्लिक हे एक अद्वितीय कौशल्य आहे आणि ताईके भविष्यातील शिबिरांमध्ये आमच्यासोबत काम करत राहील. दीपिकाच्या कामगिरीतील सुधारणांबद्दल बोलताना हरेंद्र म्हणाले, आम्हाला दीपिकाच्या खेळात निश्चित प्रगती दिसून आली आहे. ४५ वर्षीय ताईके हा माजी खेळाडू त्याच्या खेळण्याच्या काळात पेनल्टी-कॉर्नर अचूकतेसाठी ओळखला जात असे.

११ वर्षांच्या आंतरराष्ट्रीय कारकीर्दीत ताईके ताकेमा याने नेदरलँड्सच्या पुरुष संघासाठी ९४ सामन्यांमध्ये १७० गोल केले. २००२ आणि २००६ चॅम्पियन्स ट्रॉफी, २००६ विश्वचषक, २००८ ऑलिम्पिक खेळ आणि २०१० एफआयएच विश्वचषक यासह अनेक प्रमुख आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये तो सर्वाधिक गोल करणारा खेळाडू होता.

◀ *(वृत्तसंस्था)*

# उपांत्य फेरीसाठी दक्षिण आफ्रिका मजबूत स्थितीत

◆ **लाहोर, ४ मार्च**

माजी कर्णधार पाँटिंगचे मत



दक्षिण आफ्रिकेकडे न्यूझीलंडपेक्षा थोडे जास्त कौशल्य आहे. त्यामुळे तो संघ चॅम्पियन्स ट्रॉफीच्या उपांत्य फेरीत जिंकण्यासाठी सक्षम ठरतो, असा विश्वास ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पाँटिंगने व्यक्त केला.

जर केन विल्यमसनसारखे खेळाडू धावा करण्यात यशस्वी झाले तर न्यूझीलंडसाठी या जमेच्या बाबी ठरू शकतात. दुबईमध्ये भारताविरुद्ध झालेल्या मोठ्या पराभवानंतर न्यूझीलंड बाद फेरीत प्रवेश करत आहे, तर दक्षिण आफ्रिका गट टप्प्यात इंग्लंडविरुद्ध सात गड्यांनी मोठा विजय मिळवल्यानंतर चांगल्या फॉर्ममध्ये आहे.

पाँटिंग म्हणाला की, भारताप्रमाणेच दक्षिण आफ्रिकेकडे फलंदाजांची मजबूत फळी आहे. जर दोन्ही संघांची तुलना केली तर मला वाटते की दक्षिण आफ्रिकेचा संघ कौशल्याच्या बाबतीत थोडा सरस आहे. त्यांच्याकडे फलंदाजीचा मोठा क्रम आहे आणि मला वाटते की न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात ते विजयाचे प्रबळ दावेदार असतील.

न्यूझीलंडचा सलामीचा फलंदाज विल्यमसनला या सामन्यात महत्त्वाची भूमिका बजावावी लागेल कारण प्रत्येक संघ महत्त्वाच्या सामन्यांमध्ये मार्गदर्शनासाठी त्यांच्या मोठ्या खेळाडूंवर अवलंबून असतो, असे पाँटिंगने सांगितले.

मला वाटतं विल्यमसनला या सामन्यात धावा काढायला हव्यात. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या उपांत्य फेरीपेक्षा मोठे काहीही असू शकत नाही. विल्यमसन हा एक मोठा खेळाडू आहे, तो मैदानावर उतरण्यापूर्वी त्याच्या भूमिकेचे गांभीर्य समजून घेईल, याकडे पाँटिंगने लक्ष वेधले.

विल्यमसन पाकिस्तान (एक) आणि बांगलादेश (पाच) विरुद्ध अपयशी ठरला होता परंतु भारताविरुद्धच्या शेवटच्या गट अ सामन्यात १२० चेंडूत ८१ धावा करून त्याने पुनरागमन केले.

सलामीवीर रायन रिकेल्टन, कर्णधार टेम्बा बावुमा, एडेन मार्कराम, डेव्हिड मिलर आणि हेनरिक क्लासेन हे न्यूझीलंडच्या गोलंदाजांसाठी अडचणी निर्माण करू शकतात, असे मत पाँटिंगने व्यक्त केले.

◀ *(वृत्तसंस्था)*

## महिला हॉकी स्पर्धेत उत्तराखंड, छत्तीसगडचा विजय

**पंचकुला :** उत्तराखंड, छत्तीसगड आणि चंदीगड यांनी मंगळवारी येथे झालेल्या वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत विभाग 'ब'चे आपापले सामने जिंकले. दिवसाच्या पहिल्या सामन्यात उत्तराखंडने तेलंगणाचा १-० असा पराभव केला. उत्तराखंडसाठी सामन्यातील एकमेव गोल वर्तिका रावतने ४५ व्या मिनिटाला केला. छत्तीसगडने एका चुरशीच्या सामन्यात दिल्लीचा २-१ असा पराभव केला. सामन्याच्या आठव्या मिनिटाला सोनालीने दिल्लीला आघाडी मिळवून दिली. ■

# भारत करणार दुसऱ्या आशियाई योगासन स्पर्धेचे आयोजन

## १६ देशांचा सहभाग

◆ **नवी दिल्ली, ४ मार्च**

भारत २९ ते ३१ मार्च दरम्यान इंदिरा गांधी स्टेडियमवर दुसरी आशियाई योग अजिंक्यपद स्पर्धा आयोजित करणार आहे. यामध्ये एकूण १६ देश सहभागी होतील.



क्रीडा मंत्रालय आणि योगासना भारत यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येणाऱ्या या स्पर्धेचे उद्दिष्ट योगासनाचा समृद्ध वारसा आणि सांस्कृतिक महत्त्व स्वीकारणे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याचे प्रदर्शन करणे हे आहे. आशियाई ऑलिम्पिकक परिषद, विश्व योगासन, आशियाई योगासन आणि योगासन इंद्रप्रस्थ यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम ऑलिम्पिकमध्ये योगासनाचा समावेश करण्यासाठी एक आराखडा तयार करण्यास मदत करेल.

क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी येथे जारी केलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, योगाचे जन्मस्थान असलेल्या भारताला दुसऱ्या आशियाई योगासन स्पर्धेचे आयोजन करण्याचा मान मिळाला आहे.

हा कार्यक्रम फक्त एक स्पर्धा नाही. आपल्या प्राचीन ज्ञानाचे आधुनिक स्पर्धात्मक खेळात रूपांतर झाल्याचा हा उत्सव आहे. योगाला जागतिक खेळ बनवण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत, असे ते म्हणाले. ही स्पर्धा त्या ध्येयाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. या कार्यक्रमाद्वारे आपण खेळांच्या संदर्भात योगाची उपयुक्तता समजून घेऊ शकू. योगासनामध्ये शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या जीवन बदलण्याची शक्ती देखील आहे.

आशियाई योगासनाचे अध्यक्ष संजय मालपाणी यांनी या स्पर्धेच्या परिणामावर भर देताना म्हटले की, योगासनाला जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त खेळ म्हणून स्थापित करण्याच्या आमच्या ध्येयातील योगासन चॅम्पियनशिप हा एक निर्णायक क्षण आहे. आम्ही परंपरेचे आधुनिक क्रीडा उत्कृष्टतेशी मिश्रण पाहत आहोत. जागतिक योगासनाचे सरचिटणीस जयदीप आर्य म्हणाले, ही स्पर्धा आशियातील अपवादात्मक खेळाडूंना एकत्र आणून या प्राचीन खेळाची ताकद, लवचीकता आणि शिस्त दाखवेल. योगासन भारतचे अध्यक्ष उदित शेठ म्हणाले की, भारत या प्राचीन खेळाचे भविष्य घडविण्यासाठी वचनबद्ध आहे.

◀ *(वृत्तसंस्था)*

# अमेरिकेत पुन्हा अग्नितांडव





**वॉशिंग्टन :** गेल्या महिन्यात अमेरिकेतील लॉस एंजेलिसमध्ये भीषण आग लागली होती आणि आता पुन्हा एकदा आगीने येथे प्रचंड विनाश घडवून आणला आहे. जंगलातील झाडांवरून ज्वाला उठत आहेत. उत्तर आणि दक्षिण कॅरोलिनामध्ये कोरडे हवामान आणि जोरदार वारे यामुळे जंगलातील आगी भडकल्या असून, अनेक भागातील लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. जारी केला असून, कोरड्या वनस्पती आणि कमी आर्द्रता यामुळे आग वेगाने पसरत आहे. दक्षिण कॅरोलिनाचे गव्हर्नर हेन्री मॅकमास्टर यांनी वणव्याला तोंड देण्यासाठी आणीबाणीची स्थिती जाहीर केली आहे. संपूर्ण राज्यात उघड्यावर जाळण्यास बंदी घालण्यात आली आहे. दक्षिण कॅरोलिना वनीकरण आयोगाचा अंदाज आहे की, आग सुमारे ४.९ चौरस किलोमीटर व्यापते आणि अद्याप ती आटोक्यात आलेली

## पी. टी, उषाकडून मुष्टियुद्ध समितीचा बचाव

◆ **नवी दिल्ली, ४ मार्च**

भारतीय ऑलिम्पिक असोसिएशन (आयओए) च्या अध्यक्ष पी. टी. उषा यांनी बॉक्सिंगसाठी तदर्थ समिती नियुक्त करण्याच्या निर्णयाचे समर्थन केले आहे. गेल्या एका वर्षात भारतीय बॉक्सिंग महासंघ (बीएफआय) त्यांच्या मूलभूत जबाबदाऱ्या पार पाडण्यात अपयशी ठरला आहे आणि सुव्यवस्था पुनर्संचयित करण्यासाठी आणि योग्य प्रशासन सुनिश्चित करण्यासाठी त्यांची कारवाई आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

आयओएचे उपाध्यक्ष गगन नारंग यांनी उषा यांच्यावर मनमानी आदेश जारी करण्याचा आरोप केला होता. गगन नारंग यांनी २८ फेब्रुवारी रोजी लिहिलेल्या पत्राला उत्तर म्हणून उषा यांनी वक्तव्य केले आहे. माजी ऑलिम्पिक कांस्यपदक विजेता गगन नारंगने त्यांच्यावर मनमानी आदेश जारी करण्याचा आणि खेळाडूंच्या हिताला कमी लेखण्याचा आरोप केला होता. ■

# माजी क्रिकेटपटू पद्माकर शिवलकर यांचे निधन



**मुंबई :** माजी अनुभवी क्रिकेटपटू पद्माकर शिवलकर यांचे सोमवारी निधन झाले. त्यांच्या निधनाने क्रिकेट विश्वात शोककळा पसरली. शिवलकर यांनी भारतीय क्रिकेटचा विकास करण्यात मोठे योगदान दिले.

बीसीसीआयने सोशल मीडियावर पोस्ट करून चाहत्यांना त्यांच्या निधनाची माहिती दिली. बीसीसीआयने आपल्या पोस्टमध्ये लिहिले आहे की, भारताच्या सर्वोत्तम फिरकीपटूंपैकी एक पद्माकर शिवलकर यांच्या निधनाबद्दल आम्ही शोक व्यक्त करतो. देशांतर्गत क्रिकेटमधील मुंबईचे स्टार फिरकीपटू पद्माकर शिवलकर यांनी वयाच्या ८४ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. त्यांनी स्थानिक क्रिकेटमध्ये मुंबईसाठी १२४ प्रथम श्रेणी सामने खेळले आणि १९.६९ च्या प्रभावी सरासरीने ५८९ गडी बाद केले. देशांतर्गत क्रिकेटमध्ये प्रभावी कामगिरी करूनही शिवलकर यांना कधीही भारतीय संघात स्थान मिळवता आले नाही.

मुंबईसाठी देशांतर्गत क्रिकेटमधील त्याची आकडेवारी जबरदस्त होती. १२४ सामन्यांमध्ये त्यांनी ४२ वेळा ५ गडी बाद केले आणि १३ वेळा १० गडी बाद केले. या काळात त्यांनी ५१५ धावाही केल्या.

◀ *(वृत्तसंस्था)*



## 'शुद्धोहम् चषक' बुद्धिबळ स्पर्धा

# १९ वर्षाखालील गटात सागर पवार विजेता

**सोलापूर, दि.४ मार्च-२०२५**

शुद्धोहम् ज्वेलर्स व सोलापुर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने आयोजीत केलेल्या 'शुद्धोहम् चषक' बुद्धिबळ स्पर्धेत १९ वर्षाखालील गटात आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त सागर पवार याने सहा पैकी सहा गुण प्राप्त करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. तसेच मानांकित सान्वी गोरे व स्वराली हातवळणे यांनी सुरेख खेळ करत अनुक्रमे द्वितीय व तिसरा क्रमांक पटकाविला.

आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त साईराज घोडके याने सात पैकी साडेसहा गुणांसह व आयुष गवळी याने सहा गुण मिळवीत उत्कृष्ट खेळ करत अनुक्रमे १३ व ११ वर्षाखालील गटाचे जेतेपद प्राप्त केले. नियान कंदीकटला याने नऊ वर्षाखालील गटात आकर्षक खेळ करत सहा पैकी सहा गुण प्राप्त करत तर अर्चित भुतडा याने ७ वर्षाखालील गटात अव्वल स्थान पटकाविले. अथर्व दनाने, यतीराज माने, निरंजन शहा, विराज पाताडे या खेळाडूंना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. शांतीसागर मंगल कार्यालय येथे संपन्न झालेल्या या स्पर्धेचा पारितोषिक वितरण शुद्धोहम् ज्वेलर्सचे संचालक सिद्धांत गांधी यांच्या अध्यक्षतेखाली तसेच युनायटेड फोरम बँक युनियनचे निमंत्रक सुहास मार्डीकर, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अधिकारी किशोर मुनकमपल्ली, शुद्धोहम् ज्वेलर्सच्या संचालिका आदिती गांधी, आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अतुल कुलकर्णी, राष्ट्रीय पंच संतोष पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.विजेत्या खेळाडूंना आकर्षक 'शुद्धोहम् चषक', मेडल्स व रोख पारितोषिके मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. विजेत्या ५५ खेळाडूंना एकूण रु. २० हजारची पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेत मुख्य पंच म्हणून वरिष्ठ राष्ट्रीय पंच उदय वगरे तर त्यांना सहाय्यक म्हणून प्रशांत पिसे, वरिष्ठ राष्ट्रीय पंच वरिष्ठ राष्ट्रीय पंच रोहिणी तुम्मा, जयश्री कोंडा, यश इंगळे यांनी काम पाहिले. विजेत्या खेळाडूंचे सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील, सोलापूर चेस अकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर, संस्थेचे सचिव सुमुख गायकवाड यांनी अभिनंदन केले.

**अंतिम निकाल (अनुक्रमे गुण व बोकोल्स गुणांसह) : ▶ १९ वर्षाखालील गट :** सागर पवार - ६, सान्वी गोरे - ५.५, स्वराली हातवळणे - ५, श्रेयश कुदळे - ४.५ (२२.५), श्रेयश बोबडे - ४.५(१६), रणवीर पवार - ४(२२.५), वेद आगरकर - ४(२०.५), हर्ष हळमल्ली - ४(१९.५), श्रेया संदूपटला- ४(१९), यज्ञेश जाधव - ४(१८.५) **▶ १३ वर्षे :** साईराज घोडके - ६.५, कार्तिक भागवत - ६, ओम निरंजन - ५.५, सिद्धी देशमुख - ५(२८), देवदत्त पटवर्धन - ५(२७), अधिराज म्हेत्रे - ५(२४.५), सुकन्या बिराजदार - ५(२३), आदिती इनानी - ५(२१.५), विहान राठोड - ४.५(३०), आरुष गंदलवार - ४.५(२८.५) **▶ ११ वर्षे :** आयुष गवळी - ६, श्रेयश कंदीकटला - ५.५(२७.५), शशांक जमादार - ५.५(२३.५), श्रेयश इंगळे - ५, शौर्य चंदनशिवे - ४.५, आदित्य सोनी - ४(२८.५), आयुष गायकवाड - ४(२७), जयवीर मोहिते - ४(२७), प्रतीक्षा चाबुकस्वार - ४(२६), श्लोक चौधरी - ४(२५)

**▶ ९ वर्षे :** नियान कंदीकटला - ६, उत्कर्षा लोखंडे - ५(२२), विवेक स्वामी - ५(१५), मयूर स्वामी - ४.५, नैतिक होटकर - ४(२२), हर्ष मुसळे- ४(२१), नमन रंगरेज - ४(२०.५), हिमांशू व्हनगावडे - ४(२०), आरव पवार - ४(१९), शिवराज जाधव - ४(१७) **▶ ७ वर्षे :** अर्चित भुतडा - ३(१६), लखित काबरा - ३(१५.५), ओजस पवार - ३(१४.५), ऋषभ पामनानी - २(१५.५), ऋषभ कोरे- २(१४.५), जीवन गड्डम - १(१३.५), ईशा पटवर्धन - १(१३), विराज शेंडगे.

# किरण स्पोर्टस सोलापूर, छत्रपती मंडळ धाराशिव अंतिम फेरीत

## ● कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे मामा यांच्या जयंतीनिमित्त विभागीय निमंत्रित पुरुष खो-खो स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ मार्च-**

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे मामा यांच्या १२२व्या जयंतीनिमित्त सुरु असलेल्या पुरुष गटाच्या विभागीय निमंत्रित पुरुष खो-खो स्पर्धेत धाराशिवचे छत्रपती व्यायाम प्रसारक मंडळ व सोलापूरच्या किरण स्पोर्टस क्लबने अंतिम फेरीत प्रवेश केला.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व सोलापूर म्युचर खो-खो असोसिएसनच्या मान्यतेने ही स्पर्धा शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कॉलेज ऑफ एज्युकेशनने आयोजित केली आहे. कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या कर्मवीर मैदानावर मंगळवारी सकाळी झालेल्या उपांत्य सामन्यात जितेंद्र वसावे (१.३०, १.४० मिनिटे संरक्षण) व श्याम ढोबळे (५ गुण) यांच्या शानदार खेळीमुळे छत्रपती व्यायाम प्रसारक मंडळाने धाराशिवच्याच तुळजाभवानी क्रीडा मंडळावर २०-१४ असा ६ गुणांनी पराभव केला. तुळजाभवानी मंडळाच्या रमेश वसावेने आक्रमणात ५ गडी बाद करीत १.३० मिनिटे संरक्षण केले. त्याची व विशाल वसावे (१.५० मिनिटे व २ गुण) यांची अष्टपैलू खेळी अपुरी पडली.



### किरण स्पोर्टस्ने वेळापूरला नमविले

उपांत्य फेरीच्या दुसरा सामना सोलापूर जिल्ह्यातील दोन संघात अत्यंत चुरशीचा झाला. वेळापूरच्या अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळाला सोलापुरच्या किरण स्पोर्टस् क्लबने मध्यंतराच्या ८-९ अश्या एका गुणाच्या पिछाडीवरून १७-१६ असे एका गुणानेच नमविले. अक्षय इंगळे (१.०० मिनिटे व ४ गुण), सौरभ चव्हाण (१.३०, २.०० मिनिटे संरक्षण व २ गुण), चेतन चव्हाण (२ मिनिटे व ३ गुण) व रोहन रजपूत (१.१०,१.२० व १गुण) हे त्यांच्या विजयाचे शिल्पकार ठरले. वेळापूरच्या कृष्णा बनसोडे (१.२०, १.२० मिनिटे व १ गुण), प्रणव अडसूळ (१.२० मि. व ३ गुण) व अजित रणदिवे (१.००, १.४० मि. व २ गुण) यांची अष्टपैलू लढत अपुरी पडली.

## कोहलीने रिकी पाँटिंगला मागे टाकले

**दुबई :** चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेतील पहिला सेमी फायनल सामना भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यात दुबईच्या मैदानता रंगला आहे. टीम इंडियाच्या बॅटिंगची आस असणाऱ्या विराट कोहलीनं या सामन्यात रिकी पाँटिंगचा विक्रम मोडीत काढला. विराट कोहली मैदानात उतरला की, तो कोणता ना कोणता रेकॉर्ड करतोच. यावेळी बॅटिंगला येण्याआधी फिल्डिंग करताना त्याने ऑस्ट्रेलियन माजी कॅप्टनला धोबीपछाड दिलीये. एक नजर खास रेकॉर्डवर - विराट कोहली भारताकडून सर्वाधिक झेल घेणारा खेळाडू ठरला आहे. आतापर्यंत त्याने ३०१ सामन्यात १६१ झेल टिपले आहेत. या मॅचमध्ये रवींद्र जडेजाच्या गोलंदाजीवर जोश इंग्लिसचा कॅच घेताच त्याने पाँटिंगच्या विक्रमाची बरोबरी केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# दहावीची परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडावी

**प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या सूचना**

**परीक्षा केंद्रावर गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घ्या**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.४ मार्च -**

इयत्ता दहावीच्या उर्वरित पेपर साठीची परिक्षा अत्यंक कडक आणि शिस्तबध्द घेण्यात याव्यात. तालुक्यात बोर्डाच्या परीक्षेसाठी निश्चित करण्यात आलेल्या केंद्रावर गैरप्रकार होणार नाही दक्षता घेवून दहावीची परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडावी तसेच परिक्षेसाठी कॉपी करणारा आणि कॉपी करण्यासाठी मदत करणाऱ्या शैक्षणिक संस्था आणि पालकांवर देखील कारवाई करण्यात येईल अशा सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.



तालुक्यात कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी शेतकी भवन, पंचायत समिती पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे, नायब तहसिलदार वैभव बुचके यांच्यासह परिक्षा केंद्राचे केंद्रप्रमुख उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे म्हणाले, सध्या दहावी व बारावीची बोर्ड परीक्षा सुरू आहे. उर्वरित पेपरसाठी कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घेवून आवश्यक उपाययोजना कराव्यात. कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्ग करणाऱ्यांवर कडक व वेळप्रसंगी फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे.परिक्षा या कॉपीमुक्त होण्यासाठी भरारी पथक कार्यरत असून त्याव्दारे परिक्षा केंद्रावर निगराणी करण्यात येत आहे. प्रशासनाच्या कॉपीमुक्त अभियानात विद्यार्थी, पालक, शिक्षक यांनी सहभागी होवून हे अभियान यशस्वी करण्यास सहकार्य करण्याचे आवाहनही प्रांताधिकारी श्री. इथापे केले आहे. परीक्षे दरम्यान गोंधळ होऊ नये तसेच परिक्षा केंद्रावर सुरक्षा व्यवस्था चोख राहावी, यासाठी पोलिस प्रशासनाकडून आवश्यक बंदोबस्त ठेवण्यात आल्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले यांनी यांनी सांगितले.

## संक्षिप्त वृत्त



### पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयात गुडघ्याची यशस्वी शस्त्रक्रिया

**पंढरपूर, दि. ४ मार्च-**

येथील उपजिल्हा रुग्णालयात प्रथमच दुर्बिणीद्वारे संदेश कांबळे (पंढरपूर) या रुग्णावर तुटलेल्या गुडघ्यांच्या शिरांची दुर्मिळ आणि गुंतागुंतीची असणारी शस्त्रक्रिया सोलापूरचे सुप्रसिद्ध आर्थ्रोस्कोपी तज्ञ डॉ. विवेक देगावकर यांनी केली असल्याची माहिती उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेशकुमार सुडके यांनी दिली. महात्मा जन आरोग्य योजनेअंतर्गत गुडघ्यांच्या शिरांची मोफत शत्रक्रिया यशस्वी रित्या भूलतज्ञ डॉ. अभिजित पाटील यांच्या सहाय्याने पार पडली. शस्त्रक्रिया जिल्हा शल्याचित्सक डॉ. सुहास माने, डॉ. श्रीकांत कुलकर्णी, डॉ. म हेशकुमार सुडके यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच एमजीपीजे टीम उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर यांच्या प्रयत्नाने यशस्वी झाली.



### डॉ. दिनेश मोळगड्डे यांचा सत्कार

**अणदूर, दि. ४ मार्च-**

तुळजापूर तालुक्यातील खुदावाडी येथील डॉ. दिनेश मोळगडे यांनी कोलकात्ता नॅशनल मेडीकल कॉलेज येथून एम. डी. मेडीसीन जनरल ही पदवी प्रथम श्रेणी मध्ये मिळवली आहे.ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील मुलाने हे यश संपादन केल्याने त्यांचा खडकाळी मॉर्निंग क्लबच्या वतीने सत्कार करण्यात आला. दिनेश यांचे प्राथमिक शिक्षण जि.प.केंद्रीय शाळा अणदूर, माध्यमिक शिक्षण जवाहर विद्यालय,उच्च माध्यमिक राजश्री शाहु महाविद्यालय येथे झाले आहे. एमबीबीएसचे शिक्षण लातुर येथील शासकीय महाविद्यालयात झाले आहे. एम.डीचे शिक्षण पश्चिम बंगाल कोलकत्ता येथे झाले आहे. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्याने खडकाळी मॉर्निंग क्लबच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला आहे. यावेळी डॉ जितेंद्र कानडे, बाळकृष्ण घोडके, अविनाश मोकाशे, सुहास कंदले, आप्पू धमुरे, खंडू मुळे, चंद्रकांत गुड्डू, अजय अणदूरकर, गुणू मुळे, काशिनाथ करपे, डॉ हरिदास मुंडे, डॉ. नागनाथ कुंभार, मल्लिनाथ नरे, प्रसन्न कंदले, गुरुनाथ कबाडे, दिगंबर मोळगड्डु, सचिन ढेपे, सचिन गुड्डू, आबा मोकाशे, संजू मोकाशे, वैजीनाथ कुंभार, बाबू शेख उपस्थित होते.

### अनेक वर्षापासून प्रतीक्षेत असलेल्या जि.प. कर्मचाऱ्यांना पदोन्नती

**सोलापूर, दि. ४ मार्च-**

जिल्हा परिषत प्रशासनाकडून १७ पशुधन पर्यवेक्षकांना सहायक पशुधन विकास अधिकारी व ५८ परीचरांना कनिष्ठ सहायक पदावर पदोन्नती देण्यात आली. अनेक वर्षांपासून पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असलेल्या कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम आणि सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी झाली पदोन्नती दिल्याने मंगळवारी जिल्हा परिषदेमध्ये कर्मचाऱ्यांनी आनंदोत्सव साजरा केला. मंगळवारी सकाळपासूनच जिल्हा परिषदेमध्ये कर्मचार्यांची प्रचंड गर्दी झाले होते. समुपदेशानंतर संबंधित कर्मचाऱ्यांना जागेवरच नियुक्ती आदेश देण्यात आले. त्यामुळे आदेश घेऊन आनंदी होऊन कर्मचारी बाहेर पडत होते . यावेळी त्यांच्या नातेवाईकांनीही मोठी गर्दी केली होती. पदोन्नती झालेल्या परीचर कर्मचाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात महिला कर्मचारी आहेत. त्यामुळे येणाऱ्या आठ मार्च महिला दिनाच्या अगोदरच मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांनी त्यांना मोठे गिफ्ट दिल्याने त्यांचे संपूर्ण जिल्हा परिषदेतील कर्मचारी संघटना आणि कर्मचाऱ्यांमधून प्रशासनाचे कौतुक करण्यात येत आहे.

### गळफास घेऊन तरूणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ४ मार्च -**

घरगुती कारणावरून गळफास घेऊन तरूणाने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पृथ्वीराज भाऊराव देशमुख (वय २१, रा. दिड्डी नगर, सोलापूर) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याचे नाव आहे. ४ मार्च रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास पृथ्वीराज याने राहत्या घरी घरगुती कारणावरून घराच्या लोखंडी अँगलला दोरीच्या सहाय्याने गळफास घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी नातेवाईकांनी पृथ्वीराजला खाली उतरवून बेशुध्दावस्थेत उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### माळशिरस तालुक्यातील पाच परिचारिकांना पदोन्नती

**सदाशिवनगर, दि. ४ मार्च-**

तालुक्यातील ५ परिचारिकांना वर्ग ४ मधून वर्ग ३ कनिष्ठ सहाय्यक पदी पदोन्नती मिळाली आहे. अजय रंगदाळ, वैशाली कानडे, शर्मिला खाडे, सागर बारवे, दिगंबर पोटे या पाच परिचारिकांना पदोन्नती मिळाली असल्याची माहिती गट विकास अधिकारी आबासाहेब पवार यांनी दिली.

## निधन वृत्त...

### स्मिता जोशी



**सोलापूर, दि. ४ मार्च-**

येथील आदित्य नगर मधील राहिवाशी स्मिता सुधीर जोशी (वय ५५) यांचे रविवार, २ मार्च रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. सेवानिवृत्त कृषी पर्यवेक्षक सुधीर जोशी यांच्या त्या पत्नी होत्या. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले असा परिवार आहे. त्याचा दशविधी ११ मार्च रोजी पंढरपूर येथे आहे.

### शोभा गुर्रम



**सोलापूर, दि. ४ मार्च-**

अशोक चौक, जुना वालचंद कॉलेजसमोरील रामचंद्र एम्पायर अपार्टमेंटमधील रहिवासी श्रीमती शोभा किसन गुर्रम (वय ८४) यांचे मंगळवार दि. ४ मार्च रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे व पतवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# राजन पाटील म्हणाले तालुका बेवारस झाला

## भाजपाचे आमदार अभिमन्यू पवार म्हणाले मै हुं ना !

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ४ मार्च-**

काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या औसा मतदारसंघात भाजपाच्या तिकिटावर निवडून सलग दुसऱ्यांदा निवडून येत आमदार अभिमन्यू पवार यांनी आपले कर्तृत्व दाखवून दिले आहे. पक्षावरील निष्ठा आणि माणसं जोडण्याचे काम करत विकास केल्यानेच हे शक्य झाले आहे. आमदार पवार हे मूळचे कुरुलचे सुपुत्र आहेत. आमचा मोहोळ तालुका आता बेवारस झाला आहे. ना धनी ना गोसावी अशी स्थिती झाली असल्याची खंत व्यक्त करत पुढील काळात मोहोळ तालुक्यावर लक्ष ठेवावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे मोहोळचे



माजी आमदार राजन पाटील यांनी केले. दरम्यान आमदार अभिमन्यू पवार यांनी त्यांना उद्देशून बोलताना आमदार तुमचा नसला तर काय झाले, आपले सरकार आहे राज्यात आणि केंद्रात. कसलीच काळजी करू नका. सगळी कामे मार्गी लागतील. पुढल्या वेळी तुम्हाला संधी मिळू शकते अशा शब्दात त्यांनी बळ आणि धीर दिला.

आमदार अभिमन्यू पवार यांचे मूळ गाव कुरुल असून सुमारे ६६ वर्षापूर्वी त्यांचे वडील दत्तात्रय पवार हे नोकरी निमित्त मराठवाड्यात गेले आणि तिथेच स्थायीक झाले. तरीही गावाशी असलेली नाळ त्यांनी तुटू दिली नाही. औसा मतदारसंघात निवडून आल्यानंतर त्यांचा मोहोळ तालुक्यातील कुरुल येथे नागरी सत्कार आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी आमदार राजन पाटील होते. यावेळी जालिंदर लांडे यांनी नवीन गावठाण मध्ये वसलेल्या वसाहतीला संभाजीनगर नावाने स्वतंत्र ग्रामपंचायतची म ागणी केली होती. त्याचा धागा पकडत आमदार पवार यांनी माझी काही हरकत नाही पण कुरुल नगरपंचायतचा प्रस्ताव दिला तर तो आपण नक्की मंजूर करून आणू असे सांगत कुरुल ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनातील कामे मार्गी लावण्याचे काम करू असे आश्वासन यावेळी बोलताना दिले. प्रारंभी ग्रामस्थ, ग्रामपंचायत व पवार परिवार यांच्या वतीने आमदार अभिमन्यू पवार यांचा मानपत्र देऊन यथोचित सन्म ान करण्यात आला.

यावेळी राज्य सहकार परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल माजी आमदार राजन पाटील यांचा तसेच हृदयरोग तज्ञ डॉ. प्रमोद पवार, स्वेरीचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे,डॉ. स्नेहल पवार,जिल्हा नगरपालिका प्रशासन अधिकारी वीणा पवार, कार्यकारी अभियंता ज्योतिर्लिंग पाटकर,डॉ. प्रवीण निकम,डॉ.अमोल लांडे,डॉ. प्रतीक्षा निकम, डॉ. प्रियांका निकम आदिसह स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या गुणवंतांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी ह.भ.प. दत्तात्रय पवार,माजी सभापती जालिंदरभाऊ लांडे, राजशेखर पाटील, सकल मराठा समन्वयक माऊली पवार, कांतीलाल माने, गोविंद काळे, ॲड. श्रीरंग लाळे, श्रीकृष्ण गुरुकुलचे प्रा. प्रमोद आवताडे, हनुमंत निकम,प्राचार्य निवृत्ती पवार,पंडित निकम,चंद्रसेन जाधव, भाजपा उद्योग आघाडी जिल्हाध्यक्ष लिंगदेव निकम,भाजपा युवा म ोर्चाचे अंकुश आवताडे, बाबासाहेब जाधव, प्रमोद जाधव,प्रशांत पाटील,भारत जाधव, राहुल पवार, माणिक पाटील, गहिनीनाथ जाधव आदीसह ग्रामपंचायत सदस्य, विविध संस्थेचे पदाधिकारी, ग्राम स्थ उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य एन. बी. पवार यांनी केले तर आभार प्रा.माऊली जाधव यांनी मानले.

## १०४ शेतकऱ्यांच्या शेततळ्यांचे थकले ७० लाख

**सोलापूर, दि. ४ मार्च-**

'मागेल त्याला शेततळे' ही योजना महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाकडून राबवली जाते. या योजनेअंतर्गत शेततळे घेण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते. यामुळे ऑनलाईन प्रक्रियेतून सोलापूर जिल्ह्यातील २५ हजार ३३१ शेतकऱ्यांनी शेततळे मिळण्याची मागणी केली होती. मात्र यातील १८०१ शेतकऱ्यांनीच कागदपत्रांची योग्य पूर्तता केल्याने त्यांना खोदाईची सोलापूर कृषी विभागाकडून मान्यता देण्यात आली होती. दरम्यान, यातील १ हजार ६८४ शेतकऱ्यांना ११ कोटी ११ लाख रूपयांचे अनुदान शासनाकडून मिळाले असून, अजून १०४ शेतकरी अनुदानाच्या प्रतिक्षेत आहेत.

शेतजमिनीच्या वरील बाजूस पावसाचे वाहून जाणारे पाणी आपत्कालीन वेळी पिकास उपलब्ध होण्याच्या दृष्टीने खोदलेल्या तळ्यास शेततळे असे म्हणतात. 'मागेल त्याला शेततळे' ही योजना कृषि विभागाने पाणलोटाचा उपचार म्हणून राबवली जाते. या योजनेअंतर्गत शेततळे घेण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज करता येतो. या योजनेच्या माध्यमातून शेततळे घेऊन त्यात भूपृष्ठावरून वाहून जाणारे पाणी साठवले जाते. या साठवलेल्या पाण्याचा उपयोग संरक्षित जलसिंचनासाठी केला जातो. या योजनेंतर्गत शेततळे घेऊन आपत्कालीन वेळी पिकास उपलब्ध होणाऱ्या पाण्याची व्यवस्था केली जाते. दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातून अंतिम मंजुरीसाठी १ हजार ७८८ जणांची यादी तयार आहे. यातील १ हजार ६८४ जणांचे पेमेंटही त्यांच्या खात्यावर थेट वर्ग झाले आहे. उर्वरित १०४ शेतकऱ्यांचे आता शासनस्तरावर पेमेंट पेंडिंग आहे.

# भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांचा विविध मागण्यांसाठी एल्गार

## दिवसभर कामबंद आंदोलन करून व्यक्त केला निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

महाराष्ट्र राज्य भूमि अभिलेख कर्मचारी संघटना, पुणे विभाग यांनी भूमि अभिलेख विभागातील कर्मचारी यांचे पदाची कार्यकर्तव्य पार पाडत असताना येणा-या अडीअडचणी बाबत दि. २५/२/२०२५ रोजी उपसंचालक भूमि अभिलेख, पुणे प्रदेश पुणे यांना निवेदन सादर केले होते. त्यानुसार त्यांचेकडून दि. २७/२/२०२५ रोजी कर्मचारी संघटने सोबत मिटींग आयोजित केली होती. सदर मिटींग मध्ये त्यांनी कर्मचारी संघटनेस सोमवार, दि. ०३/०३/२०२५ रोजी लेखी आश्वासन देणेचे म ान्य केले होते. त्यानुसार लेखी आश्वासन मिळाले परंतु संदर्भीय लेखी आश्वासनामध्ये निवेदनातील २७ मुदयांपैकी केवळ परिपत्रकाप्रमाणे १२ म ोजणी प्रकरणे वाटप करणेबाबत (१०० दिवसाचे लक्ष्य पूर्ततेनंतर) भाष्य करणेत आले आहे. परंतु सुधारीत वेतनश्रेणी, या प्रमुख मागणीबाबत कोणतीही टिप्पणी करणेत आली नाही. यामुळे आज आणि उद्या दि. ५ मार्च रोजी कामबंद आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती संघटना पदाधिकाऱ्यांनी दिली. याबाबतचे एक निवेदनही त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयास दिले आहे.

दिलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, भूमी अभिलेख कर्मचारी सादर केलेल्या निवेदनातील इतर मागण्यांवर ठाम आहेत. प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणामुळे कर्मचारी यांनी त्यांचे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या न्यायिक मागणीकडे, प्रशासनाचे लक्ष वेधनेसाठी नाईलाजास्तव अपरिहार्यतेने दि. ०४/०३/२०२५ व ०५/०३/२०२५ रोजी दोन दिवसीय आंदोलन करणेचा निर्णय महाराष्ट्र राज्य भूमि अभिलेख कर्मचारी संघटना, पुणे विभाग संघटनेने घेतला आहे. तसेच प्रशासनाने १४ वर्षे झाले तरी तांत्रीक/ सुधारीत वेतनश्रेणीचा प्रश्नावर अदयाप सकारात्मकरित्या निर्णय घेतलेला नाही. सदरची बाब ही अत्यंत वेळकाढू पणाची आहे. सदर बाबीचा निषेध म्हणून कर्मचारी यांना सदरचे आंदोलन करावे लागत आहे, याची सर्व जबाबदारी प्रशासनावर सोपवून सर्व पुणे विभाग भूमि अभिलेख कर्मचारी संघटना सदर दोन दिवसीय लाक्षणीक सामुहिक रजा कामबंद आंदोलन करत आहे. सदरच्या आंदोलन हे जनतेला वेठीस धरण्यासाठी नसून, कर्मचारी यांच्या अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या सुधारीत वेतनश्रेणी बाबतच्या न्याय मागणीसाठी, तसेच अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे जनतेची प्रलंबित असणारी कामे जलद गतीने, होणेकामी कार्यालयाचे आस्थापनेवर असलेली रिक्त पदे लवकरात लवकर कर्मचारी भरती करणेबाबत प्रशासनाचे लक्ष वेधणेकामी आहे.

अपुऱ्या साधन सामग्री निशी आणि काम ाच्या तुलनेत मिळणारा तुटपुंजे वेतन असताना केवळ अधिकारी यांचे दबावामुळे आणि प्रशासनातील अति कामाचे धोरणामुळे या भूमि अभिलेख विभागातील कर्मचारी हे भूमापनाचे काम अविरतपणे गेली कित्येक वर्ष स्वतः च्या पदर खर्चाने करीत आहेत. यासह इतरही मागण्यांकडे सरकारने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

## जबरदस्तीने अत्याचार करणाऱ्या कापड विक्रेत्यावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च -**

महिलेशी ओळख काढून तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार करणाऱ्या कापड विक्रेत्यावर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल



करण्यात आला आहे. याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन बिलाल निसार शेख (वय २२, रा. जवाहर नगर, बापूजी हौसींग सोसायटी, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीतेशी बिलाल शेख याने कामाच्या बहाण्याने ओळख केली. एप्रिल २०२४ पासून बिलाल शेख याने पिडीतेशी चांगली ओळख झाल्यानंतर तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केला. त्यानंतर बिलाल याने पिडीतेला याप्रकाराची माहिती तिच्या पतीला देतो अशी धमकी देऊन पिडीतेवर वारंवार अत्याचार केला व तिच्या नकळत तिचे फोटो व व्हिडीओ काढले.

बिलाल याने ते फोटो व व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन पिडीतेवर वारंवार अत्याचार केला. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक अतुल बनकर पुढील तपास करीत आहेत.

## अतिवेगाने वाहन चालविल्याप्रकरणी एका चालकाविरुध्द गुन्हा दाखल

**वाहतूक शाखेच्या पोलीसांची कारवाई**

**मंगळवेढा, दि. ४ मार्च-**

मंगळवेढा शहरातील बोराळे नाका येथे महिन्द्रा बोलेरो पिकअप हे वाहन बेदरकारपणे व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे चालविल्या प्रकरणी ग्यानबा करिअप्पा होलीयाक (रा.रायचूर कर्नाटक) याच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुंनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी पोलीस अंम लदार प्रविण जाधव व त्यांचे सहकारी पोलीस हवालदार संभाजी यादव, ज्ञानेश्वर साळुंखे,दत्तात्रय काळेल असे पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली बोराळेनाका परिसरात मोटर वाहनाच्या केसेस करत असताना महिंद्रा बोलेरो पिकअप क्रमांक के.ए.३६ सी.१४५६ ही गाडी मरवडेकडून मंगळवेढ्याच्या दिशेने अतिवेगाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा प्रकारे वाहन चालवित येत असताना पोलीसांना मिळून आला. पोलीसांनी सदर चालकाकडे नाव,पत्ता विचारले असता त्याने ग्यानबा करिअप्पा होलीयाक (रा.रायचूर कर्नाटक) असे सांगितले. त्याच्याकडे परवानाबाबत विचारले असता परवाना आहे असे सांगितले. ही कारवाई १ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता करण्यात आली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

# जबरी चोरीच्या बनावाचे दोन गुन्हे उघडकीस

**स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

जबरी चोरीच्या बनावाचे दोन गुन्हे स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी उघडकीस आणून या दोन्ही गुन्ह्यातील चोरीस गेलेला मुद्देमाल फिर्यादींकडूनच जप्त केला.

२७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी तांबे (ता. माढा) येथील खटके वस्तीजवळ लक्ष्मण आत्माराम सरक (वय ६०, रा. बदलेवाडी, ता. माढा) या शेतकऱ्यास दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी चोरट्यांनी मारहाण करून त्यांच्याजवळील पीक विमा कर्जाची ९० हजार रुपयांची रक्कम जबरदस्तीने लुटून नेल्याचा गुन्ह्या टेंभुर्णी पोलिस ठाण्यात दाखल झाला होता. या गुन्ह्याच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांकडून घटनास्थळाला



भेट देऊन तपासास सुरुवात करण्यात आली. त्यावेळी घटनास्थळाचे सीसीटीव्ही चित्रीकरण तपासल्यानंतर फिर्यादी व घटना यामधील तफावत पोलिसांच्या निदर्शनास आली. त्यामुळे पोलिसांनी फिर्यादी लक्ष्मण सरक यांच्याकडे वेगवेगळ्या प्रकारे चौकशी केली असता सरक यांनी जबरी चोरीचा बनाव केल्याचे निष्पन्न झाले. सरक यांनी गावातील अनेक लोकांकडून हातउसने पैसे घेतले होते. सरक यांच्या बँक खात्यावर पीक विम्याची रक्कम जमा झाली होती. ही बाब गावातील लोकांना माहित झाली होती. त्यामुळे लोकांनी त्यांचे पैसे परत देण्यासाठी सरक यांच्यामागे तगादा लावला होता. त्यामुळे सरक यांनी चोरट्यांनी पैसे लुटल्याचा बनाव केला असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले. पोलिसांनी गुन्ह्यात लुटलेली रक्कम सरक यांच्याकडून हस्तगतकरून टेंभुर्णी पोलिसांच्या ताब्यात दिली आहे.

तर दुसऱ्या घटनेत दारूच्या नशेत दुचाकी कुठे पार्क केली हेच आठवेणा झाल्याने मारहाण करून दुचाकी लुटल्याचा चोरीचा बनाव पोलिसांनी उघडकीस आणला. याप्रकरणात पोलिसांनी शाम रामचंद्र कांबळे (वय २९, रा. कसबे तडवळे, जि. धाराशिव सध्या रा. पुणे) याच्याकडून गुन्ह्यातील दुचाकी जप्त केली आहे. शाम कांबळे हा २२ फेब्रुवारी रोजी रात्री मालकाची दुचाकी घेऊन सासऱ्याच्या कार्याक्रमाकरिता येत होता. त्यावेळी चिखली फाटा ते यावली फाटा या रस्त्यावर एका महिलेस लिफ्ट देऊन पुढे सोलापूरच्या दिशेने जात असताना ४ अनोळखी व्यक्तींनी कांबळेस अडवून मारहाण करून रोख रक्कम व दुचाकी जबरदस्तीने चोरून नेली. म्हणून मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तपासात कांबळे याने जबरी चोरीचा बनाव केल्याचे शोधून काढले. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाआधारे कांबळेकडे चौकशी केल्यानंतर हा बनाव असल्याचे दिसून आले. कांबळे याने शेटफळ येथे दारू पिऊन दुचाकी चालवित मोहोळच्या दिशेने येताना मोहोळ येथे कांबळेचा किरकोळ अपघाता झाला. त्यावेळी कांबळेस दोघां व्यक्तींनी मारहाण केली होती. अपघात झाल्यामुळे गाडी चालत नव्हती, म्हणून त्याने ती गाडी एका ठिकाणी वडवळ येथे पार्क केली. परंतु, दारूची नशा उतरल्यानंतर कांबळेला गाडीच सापडली नाही म्हणून त्याने मोहोळ पोलिस ठाण्यात जबरी चोरीची फिर्याद दाखल केली असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले असून पोलिसांनी दुचाकी जप्त केली आहे.

ही कारवाई पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर अधिक्षक प्रितम यावलकर, पोलिस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक नागनाथ खुणे, पोलिस उपनिरीक्षक खाजा मुजावर, सहायक फौजदार नारायण गोलेकर, हवालदार धनाजी गाडे, मोहन मनसावाले, सागर ढोरे-पाटील, पोलिस शिपाई अक्षय डोंगरे, समीर शेख यांनी केली.

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# जायंट्स ग्रुपतर्फे श्रीशैल पदयात्रा मंडळास अन्नधान्याची मदत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

जायंट्स ग्रुप ऑफ सोलापूरतर्फे श्री मार्कंडेय सोलापूर-श्रीशैल पदयात्रा मंडळास अन्नधान्याची मदत करण्यात आली.

जायंट्स ग्रुप ऑफ सोलापूर तर्फे यंदा ६० किलो तूरडाळ, ५० किलो साखर,१५ लिटरचा तेल डबा व ५ किलो गूळ अशी मदत करण्यात आली आहे. ही मदत जायंट्स ग्रुपचे सदस्य मोहन कट्टा, मोनिका इलेक्ट्रॅनिक्सचे संचालक आनंद येमूल, श्रीनिवास कोंडले, नागनाथ कोंडा व किसन आडम यांच्या अर्थसहाय्यातून करण्यात आली आहे.




मदत देण्याचा कार्यक्रम आंध्र भद्रावती पेठ मारुती मंदिर येथे झाला. याप्रसंगी जायंट्सचे प्रेसिडेंट मेघनाथ येमूल, फेडरेशन २ बी चे डायरेक्टर किसन आडम, ऑफिसर ऑफिसर श्रीनिवास कोंडले, आनंद येमूल, माजी व्हा. प्रेसिडेंट नागनाथ कोंडा, सचिव हरिनिवास सोमा, विवेकानंद महिंद्रकर, मनोहर कोडम, अनिल व्हनमाने व श्री मार्कंडेय पदयात्रा मंडळाचे अध्यक्ष राजय्या मासन, सत्यनारायण गालपल्ली, प्रभाकर गालपल्ली, अनिल यरझल उपस्थित होते.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## क्राई वृत्त...

### हत्तुरमध्ये जनरल स्टोअर्स फोडून ५५ हजारांच्या साहित्याची चोरी

**सोलापूर, दि. ४ मार्च -**

सोलापूर ते विजयपूर महामार्गावरील हत्तुर गावातील अमोगसिध्द जनरल स्टोअर्स नावाचे दुकान फोडून चोरट्याने ५५ हजारांच्या साहित्याची चोरी केली. याबाबत सर्जेराव बिरप्पा बन्ने (वय ३८, रा. हत्तुर, सोमेश्वर मंदीराजवळ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्जेराव बन्ने हे २८ फेब्रुवारी रोजी रात्री दुकानाच्या शटरला कुलूप लावून घरी गेले होते.



त्यावेळी चोरट्याने बन्ने यांच्या दुकानाचे शटरचे कुलूप तोडून दुकानातील विविध कंपनीचे कोल्ड्रींक्स व पाणी बॉटल, बिस्किट असा ५५ हजार रुपये किंमतीचे साहित्य चोरून नेले. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार हार पुढील तपास करीत आहेत.

### पैशाच्या कारणावरून महिलेस मारहाण

**सोलापूर, दि. ४ मार्च -**

बेगमपूर येथील इंदिरा नगरात राहणाऱ्या महिलेस पैशाच्या कारणावरून चौघांनी जबर मारहाण करून जखमी केले. कोमल शंकर माने (वय ४०, इंदिरा नगर, बेगमपूर, ता. मोहोळ) असे जखमी महिलेचे नाव आहे. ४ मार्च रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास राहत्या घराजवळ पैसे देण्याच्या वादातून कोमल यांना नितीन जाधव, गणप्या जाधव इतर दोघांनी मिळून लाथाबुक्क्याने मारहाण केली. यामध्ये कोमल यांच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### कोळीबेट येथे पैशाच्या कारणावरून बापास मारहाण

**सोलापूर, दि. ४ मार्च -**

कोळीबेट (ता. अक्कलकोट) येथे पैशाच्या देवाण-घेवाणीच्या कारणावरून मुलाकडून बापास वीटाने मारहाण करण्यात आली. सोमनाथ लिंबाजी चव्हाण (वय ५५, रा. कोळीबेट) असे जखमीचे नाव आहे. ३ मार्च रोजी रात्री राहत्या घराजवळ पैशाच्या देवाण-घेवाणीच्या कारणावरून भरत सोमनाथ चव्हाण याने सोमनाथ चव्हाण यांना वीटाने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. यामध्ये सोम नाथ यांच्या छातीस जबर मार लागल्याने त्यांना सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



### बेगमपूर येथे महिलेस मारहाण

**सोलापूर, दि. ४ मार्च -**

बेगमपूर (ता. मोहोळ) येथे महिलेस अज्ञात कारणावरून मारहाण करून जखमी करण्यात आले. अनिता नितीन जाधव (वय २८, रा. इंदिरा नगर, बेगमपूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. ४ मार्च रोजी सकाळी साडेसातच्या सुमारा राहत्या घराजवळ अज्ञात कारणावरून शंकर माने, प्रेम जाधव, सागर जाधव यांनी काठीने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. यामध्ये अनिता जाधव यांच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यांना मुलगा गणेश यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हिल पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### विषारी कलर प्राशन करुन महिलेचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ४ मार्च -**

रागाच्या भरात विषारी पिवळा कलर पिऊन महिलेने आत्महत्येचा प्रयत्न केला. अनिता शिवानंद कांबळे (वय ३०, रा. निलम नगर, सोलापूर) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या म हिलेचे नाव आहे. अनिता कांबळे यांनी ४ मार्च रोजी सकाळी आठच्या सुमारास नवऱ्या सोबत झालेल्या तक्रारीचा राग मनात धरून अंगणात सडा मारण्याचा विषारी पिवळा कलर पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यामुळे अनिता यांना त्रास होऊ लागल्याने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# सेस बुडविणाऱ्या 'त्या' बड्या व्यापाऱ्यावर प्रशासकांची कारवाई

## बाजार समितीची पाच वर्षांची थकलेली ३० लाखांची फी केली वसुली

### कारवाईनंतर बाजार समितीचा सेस चुकविणाऱ्या व्यापाऱ्यांचे दणाणले धाबे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ मार्च**

सोलापूर बाजार समितीच्या विविध खर्च आणि कर्मचाऱ्यांचे वेतनापोटी बाजार समिती मधील कार्यरत असणाऱ्या आडत व्यापाऱ्यांकडून दरवर्षी सेस अर्थात बाजार समितीची फी आकारली जाते. व्यापाऱ्यांना दरवर्षी हा सेस भरावा लागतो. परंतु संचालक मंडळाच्या कार्यकाळात काही व्यापाऱ्यांनी आपली ओळख पाळक दाखवून बाजार समितीची फी थकवली होती. सुमारे पाच वर्षांच्या सेसची रक्कम ३० लाखांच्या घरात पोहोचली होती. याची माहिती प्रशासक मोहन निंबाळकर यांना मिळताच, त्यांनी लागलीच संबंधित व्यापारावर कारवाईचा बडगा उगारत बाजार समिती मधील एम.एम. बागवान या बड्या कांदा व्यापाऱ्यांकडे थकलेला जवळपास ३० लाख रूपये सेस एका दणक्यात वसूल केला.

सध्या सोलापूर बाजार समितीमध्ये आडत दुकानदार, व्यापारी, हमाल तोलार यांची परवाना नूतनीकरणाचे काम जोरात सुरू आहे. परंतु गेल्या पाच वर्षापासून प्रलंबित असलेले एम. एम. बागवान या बड्या व्यापाऱ्याकडे बाजार समितीचे जवळपास ३० लाख रुपये थकीत होते. संबधित आडत्यांनी बाजार समितीमध्ये सेसच्या रकमेपोटी धनादेशही दिला होता. परंतु तो धनादेश वटला नाही. त्यामुळे तत्कालीन संचालकांनाही ही याकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे सेस वसुली पाच वर्ष प्रलंबित राहिली, शिवाय संबंधित व्यापाऱ्याला दरवर्षी परवाना नूतनीकरण करून दिला जात होता. ही गंभीर बाब प्रशासकाच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तात्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले. तब्बल पाच वर्षापासून प्रलंबित असलेली वसुली संबधित व्यापाऱ्यांकडून वसुली केली. त्यामुळे जे संचालकाला जमले नाही ते प्रशासकांनी करून दाखविले असल्याचा सूर कर्मचाऱ्यांमधून निघत आहे. दरम्यान सोलापूर बाजार समितीमध्ये कांदा व्यापाऱ्यांनी बऱ्याच शेतकऱ्यांचे पैसे थकविले होते. परंतु प्रशासक म्हणून मोहन निंबाळकर यांनी आल्यापासून जवळपास तीन ते साडेतीन कोटी रुपयांची वसुली करून शेतकऱ्यांना दिले आहे. त्यामुळे आता सध्या सोलापूर बाजार समि तीच्या व्यापाऱ्यांकडे एक रुपयाही शेतकऱ्यांचा राहिला नसल्याची माहिती प्रशासक मोहन निंबाळकर यांनी दिले.



### सेस चुकविणाऱ्या आडत्याचे धाबे दणाणले

सोलापूर बाजार समितीमध्ये काही व्यापारी बाजार समितीचा सेस चुकवितात. परंतु प्रशासक यांनी सेस चुकविणाऱ्या व्यापाऱ्यांकडूनही वसुलीचा धडाका लावल्याने व्यापाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. कारवाईची भीतीने अनेक व्यापाऱ्यांनी सेस चुकविण्याचा विचारही करीत नसल्याचे दिसत आहे.

# ज्ञानप्रबोधिनीच्या डॉ. स्वर्णलताताई भिशीकर अनंतात विलिन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

ज्ञान प्रबोधिनी हराळीच्या प्रमुख विश्वस्त, पुणे 'तरुण भारत'च्या माजी संपादक ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. स्वर्णलताताई भिशीकर (वय ७४) यांचे प्रदीर्घ आजाराने सोलापूर येथे सोमवारी रात्री उशिरा निधन झाले. मंगळवार, ४ मार्च रोजी मोदी स्मशानभूमी येथे त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



पुणे येथील प्रख्यात संपादक कै.चं.प. तथा बापूसाहेब भिशीकर यांच्या डॉ. लताताई या कन्या होत्या. सोलापूर येथील केळकर दांपत्याने बालविकास मंदिर शाळा, ज्ञान प्रबोधिनीकडे हस्तांतरित केल्यानंतर त्या सोलापूरला स्थायिक झाल्या. पुणे ज्ञान प्रबोधिनी संस्थापक कर्मयोगी अप्पासाहेब पेंडसे यांची जीवन मूल्ये त्यांनी तरुण वयात आत्मसात केली होती. पुढे शिक्षण तज्ञ कै. व. सी. तथा अण्णासाहेब ताम्हणकर यांच्या नेतृत्वात त्यांनी ज्ञान प्रबोधिनीचे आजीवन कार्य करण्याचे व्रत निभावले. सोलापूर आणि हराळी येथे भव्य वास्तूंची निर्मिती आणि उत्तम संस्कार संपन्न तरुण पिढी घडविण्यात त्यांचे योगदान अतुलनीय राहिले आहे. शिस्तबद्ध गणेश विसर्जन मिरवणूकीची आदर्श प्रथा त्यांनी सोलापुरात यशस्वी करून दाखवली. सोलापूरला आल्यावर त्यांनी प्रबोधिनीत सत्संग केंद्राची स्थापना केली. स्वरूप संप्रदायाचे स्वामी माधवनाथ यांचा त्यांना अनुग्रह प्राप्त झाला होता. कर्तव्याशी बांधिल राहून खरा परमार्थ कसा करावा याचा आदर्श वस्तुपाठ त्यांनी आचरणात आणला. ज्ञानेश्वरी, दासबोध, पतंजली योगसूत्रे याद्वारे त्या साधकांना नेमके मार्गदर्शन करीत असत. पुण्याचे डॉ माधवराव नगरकर तथा स्वामी माधवानंद यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्संग शिबिरे, गुरू पौर्णिमा उत्सव आयोजित करण्यात लताताईंचा सिंहाचा वाटा होता. त्यांनी लिहिलेली पुस्तके, विविध इंग्रजी पुस्तकांची भाषांतरे त्यांच्या विद्वत्तेचे प्रगल्भ दर्शन घडवतात. दिवंगत श्रेष्ठ संत विमलाजी ठकार यांच्या प्रेरणेने मागील आठ ते दहा वर्षात दोन-तीन वेळा त्यांनी संपूर्ण वर्षभर एकांतात अज्ञात स्थळी राहून मौनव्रत स्वीकारून ध्यान सेवा साधना केली होती. वंदनीय वै. भाऊ थावरे त्यांना योगिनी असे संबोधित असत, अशी त्यांची सिद्धता होती. त्यांच्या जाण्याने आध्यात्मिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे.

# अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे ॲक्शन मोडवर

### अवैधरीत्या गॅस भरणाऱ्या स्थानकावर सलग दुसऱ्यांदा बेधडक कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांच्या कार्यालयात शहरातील विविध ठिकाणी घरगुती गॅसचा वाहनांमध्ये अवैधरित्या वापर होत असल्याबाबतची तक्रार विभागीय जनसंपर्क अधिकारी ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशन यांनी दिली होती. सदर तक्रारीवरून शहरातील काही भागात अवैधरीत्या गॅस भरणाऱ्यांना रंगेहात पकडून त्यांच्यावर भरारी पथकांकडून कारवाई करण्यात आली आहे.

अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांच्या नेतृत्वाखाली या भरारी पथकाची नेमणूक करून सोलापूर शहरातील एसटी स्टँड, रेल्वे स्टेशन परिसर, सैफुल, अमन हॉटेलच्या बोळात, अक्कलकोट रोड लक्ष्मी मंदिर, विनायक नगर, जुना कुंभारी गाळा, नई जिंदगी व शनी मंदिर समोर अक्कलकोट रोड, क्रोमा शोरूमच्या मागे, सितारा चौक, विमानतळ अशा विविध ठिकाणी गॅस सिलेंडर व घरगुती गॅस सिलेंडर वाहनांमध्ये प्रत्यक्षात अवैधरीत्या गॅस भरत असताना आढळून आले. यावेळी भरारी पथकाने अचानकपणे छापा टाकताच अवैद्यरीत्या गॅस भरणाऱ्यांचे धाबे दणाणले. सदर कारवाईत एचपी कंपनीचे तीन सिलेंडर,दोन इलेक्ट्रिक मोटार,दोन इलेक्ट्रिक वजन काटे असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यानुसार जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ नुसार कारवाई करण्यात आलेली आहे. यावेळी परिमंडळ अधिकारी नंदकिशोर डोके, अनिल गवळी, नितीन वाघ, प्रफुल नाईक, पुरवठा निरीक्षक राजेश यमपुरे, सज्जन भोसले तसेच पोलीस शिपाई विशाल चव्हाण पोलीस हवालदार बालाजी चव्हाण यांनी हे कामगिरी पार पाडली. जेलरोड पोलीस स्टेशन येथे सायंकाळी उशिरापर्यंत याबाबत गुन्हा दाखल नोंद करण्याचे कामकाज चालू होते.मागील डिसेंबर महिन्यात अशीच कारवाई झाल्याने सलग दुसऱ्यांदा होणाऱ्या कारवाईमुळे अवैधरित्या गॅस भरणाऱ्यांचे धाबे आता चांगलेच दणाणले आहे.

# खासदार निधीतील कामाचा घोळ; विरोधकांना सुनावले

### खा. प्रणिती शिंदे यांची जिल्हा परीषदेत एंट्री

### अधिकाऱ्यांची गोची होत असल्याने मध्यस्थीचा मार्ग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

खा. प्रणिती शिंदे यांनी मंगळवारी जिल्हा परिषदेमध्ये खासदार निधी आणि जिल्हा नियोजन समितीच्या कामांचा आढावा घेतला. यावेळी खासदार फंडासह इतर कामांना विरोधी पक्षाच्या आमदारांकडून विरोध होत असल्याने खा. प्रणिती शिंदे यांनी जिल्हा परिषदेच्या अधिकार्यांची बैठक घेऊन विकासकामे मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या. तसेच विरोधकांनीही विकासकामांना विरोध न करता सहकार्य करण्याच्या सूचना दिल्या. या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, शहराध्यक्ष चेतन नरोटे यांच्यासह काँग्रेसचे तालुकाध्यक्ष या बैठकीला उपस्थित होते.




बैठकीत खासदार शिंदे यांनी खासदार निधी, घरकुल योजना, जलजीवन पाणीपुरवठा यांसह विविध निधीचा आढावा घेतला. जिल्हा परिषदेतून काम वाटत होत असताना सत्ताधाऱ्यांना ६० टक्के तर विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांना ४० टक्के असे प्रमाण ठेवण्याच्या सूचना दिल्या भाजपाचे आमदार काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची कामे अडवतात त्यात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे. खासदार निधी आणि आमदारांच्या निधीचा काय संबंध असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. काँग्रेस कार्यकर्त्यांची कोणतेही कामे थांबवू नका अन्यथा मला विभागीय चौकशी लावण्याचा इशाराही शिंदे यांनी दिला. बैठकीत अनेक विषयांवर सिद्धाराम म्हेत्रे व सुरेश हसापुरे यांनी प्रश्न उपस्थित करीत त्याची सोडवणूक करण्याची मागणी केली. यावेळी अक्कलकोट तालुक्यातील दर्शनाळ व मंगळवेढा तालुक्यातील मारोळी गावाच्या विकासकामांची चर्चा झाल्याचे कळते. अक्कलकोट, पंढरपूर, मंगळवेढा या तालुक्यात भाजपाच्या आमदारांकडून जिल्हा नियोजन समितीतील विकास कामे थांबवली जात असल्याने खा. शिंदे यांच्यासह काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी चर्चा केली.

### विकासकामांमुळे पदाधिकाऱ्यांमध्ये तू तू मै मै

लोकसभा मतदारसंघातील अक्कलकोट, पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यात भाजपाचे आमदार आहेत. त्यामुळे या तालुक्यात विकासकामे वाटपाबाबत खासदार आणि आमदार यांच्या पदाधिकार्यात तू तू मै मै सुरू असल्याची चर्चा सुरू आहे.

# मागासवर्गीय मुलींच्या वस्तीगृहातील सोईसुविधा गायब

### संस्थाचालकांची उदासीनता

### तक्रारींकडे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. ४ मार्च ,**

सोलापूर जिल्हा समाजकल्याण विभागाकडून जिल्ह्यात २३ अनुदानित मागासवर्गीय मुर्लीची वस्तीगृहे आहेत. यातील काही वस्तीगृहात शासनाकडून अनुदान मिळणार्या बेड, चादर, सतरंजीसह अन्य सुविधा संस्थाकडून पुरवण्याकडे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे . परीणामी या वस्तीगृहातील मुलींना जमिनीवरच झोपावे लागते. शासनाकडून अनुदान मिळूनही वस्तीगृह संस्थाचालक मुलींना सोईसुविधा देण्याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे. अशा वस्तीगृह संस्थाचालकांसह वस्तीगृह अधीक्षकांवर कारवाई करण्याची मागणी पालकवर्गातून होत आहे.

जिल्ह्यात विविध संस्थाकडून अनुसूचित जाती-जमातीतील विद्यार्थीनींसाठी वस्तीगृह चालविली जातात. यातील बऱ्याच संस्थाचालकांकडून शासनाच्या नियमानुसार बेड, दरवर्षी नवीन चादर, सतरंजी, कपडयांसह अंगाचे साबण,डोक्याला लावण्यासाठी तेल आदी सुविधा पुरवणे गरजेचे आहे . मात्र, काही संस्था चालकाकडून बेडही दिले जात नाही. शिवाय अनुदान मिळणार्या अनेक साहीत्य वस्तीगृहात दिसुन येत नाहीत . यामुळे या चिमुकल्या मुलींना जमिनीवर बसून अभ्यास करावे लागत आहे . सध्या दहावी व बारावीच्या परीक्षा सुरू असून अभ्यास करणार्या मुलींना त्रास सहन करावे लागत आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाकडे तक्रार करूनही जिल्हा प्रशासन गांभीर्याने पाहत नाही ? अशी पालकांची तक्रार आहे. प्रति विद्यार्थीनीसाठी राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडून दोन हजार ७०० रुपयांचे अनुदान दिले जाते. शिवाय, भाड्याची जागा असेल तर दोन हजारांच्या आसपास त्याचीही रकम संस्थेला मिळते. तरीपण, संस्थेकडून या मुलींना प्राथमिक सोईसुविधा पुरवली जात नाहीत. याचे आश्चर्य वाटते. मंद्रुप मधील एक संस्था खासगी जागेत वस्तीगृह चालवते, तेथील मुलींसाठी बेड, नवीन चादर, सतरंजी दिली जात नाही. शिवाय या वस्तीगृहाबाबत अनेक तक्रारी असताना प्रशासनाकडून कारवाई होत नसल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.जिल्हा समाजकल्याण अधिकारी पदाचा पदभार हा महिला अधिकार्यांकडे आहे. या अधिकाऱ्यांकडून पालकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. किमान म ुलींच्या वस्तीगृहांना भेटी देऊन तेथील पाहणी करण्याची गरज आहे. यामुळे तेथील असुविधा तरी दिसतील अशी पालकवर्गातुन अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### संस्थांवर कारवाई करणार

जिल्हा समाजकल्याण अधिकारी पदाचा नुकताच पदभार घेतला आहे. मुलींच्या वस्तीगृहासाठी शासनाकडून अनुदान देण्यात येते. त्यानुसार सोईसुविधांची पाहणी केली जाईल. या पाहणीत सुविधांचा कमतरता जाणवल्यास अशा संस्थावर कारवाई करण्यात येईल. संस्थाचालकांनी मुलींनी प्राथमिक सोईसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावे.

**- सुलोचना चव्हाण, समाजकल्याण अधिकारी, जि.प. सोलापूर**

### २३ अनुदानित वसतीगृह

बार्शी ३, करमाळा २, मोहोळ २, मंगळवेढा ४, माळशिरस १, उत्तर सोलापूर ७,पंढरपूर १, सांगोला १, दक्षिण सोलापूर १ आणि अकलकोट १ अशी मुलींची २३ अनुदानित वसतिगृहे आहेत.

# जिल्ह्यातील २१४ प्रस्तावांचे ४ कोटी २६ लाख थकले

### गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा अनुदान मिळेना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

राज्यातील शेतकरी, कष्टकरी सर्वसामान्य जनतेचा आर्थिक आधार बळकट करणे, नैसर्गिक आपत्तीच्या काळात त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे, या बाबीसाठी राज्याच्या २०२३-२४ या अर्थसंकल्पातून शेतकरी आणि कष्टकरी यांच्यासाठी विम्याची भरीव तरतूद केली आहे. शेतकरी कुटुंबातील कर्ता पुरूष अचानक दगावल्यास त्यांच्या कुटुंबियांना शासनाकडून गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा अनुदान योजनेद्वारे २ लाखाचे आर्थिक सहकार्य केले जाते. मात्र सोलापूर जिल्ह्यात तब्बल २१४ जणांचे ४ कोटी २६ लाखाचे अनुदान थकले असल्याने शेतकरी बांधवांतून नाराजीचा सूर निघत आहे.

तशी तर गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबविण्यास दि. १९ एप्रिल, २०२३ च्या शासन निर्णयानुसार मान्यता दिलेली आहे. यामध्ये अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला प्रत्येकी दोन लाखांचे सानुग्रह अनुदान मिळते. शेती व्यवसाय करताना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, विजेचा शॉक बसणे इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांचा मृत्यू होतो किंवा काहींना अपंगत्व येते. घरातील कर्त्या व्यक्तीस झालेल्या अपघातामुळे कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होऊन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघाग्रस्त शेतकऱ्यांस, त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्यासाठी राज्यातील सर्व खातेदार शेतकरी व वहिवाटीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबातील कोणताही एक सदस्य (आई-वडील, शेतकऱ्यांची पती, पत्नी, मुलगा व अविवाहित मुलगी यापैकी कोणतीही एक व्यक्ती) असे १० ते ७५ वर्ष वयोगटातील एकूण २ जणांसाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबविण्यात येत आहे.

जिल्हा कृषी खात्याकडून मिळालेल्या माहितीनुसार सोलापूर जिल्ह्यातून २०२३, २४ आणि २०२५ या कालावधीतील एकूण ३६८ प्रस्ताव शासनाकडे सानुग्रह अनुदान मागणीसाठी पाठविण्यात आले होते. यातील मृत्यू २७३, अपंगत्व ६ असे एकूण २७९ प्रस्ताव शासनाकडून मंजूर झाले होते. २६ जणांचे प्रस्ताव नामंजूर करण्यात आले. ५५ जणांचे कागदपत्राअभावी प्रलंबित आहेत. तर कार्यवाहीत तालुकास्तरीय समितीपुढे मंजुरीस न ठेवलेले प्रस्ताव ८ आहेत. यासाठी ५ कोटी ७३ लाख अनुदानाची मागणी प्रस्तावित होती. त्यासाठी आयुक्तालयाकडून वितरित केलेला निधी १ कोटी २७ लाख इतका होता. यातून प्रत्यक्ष लाभार्थी खाती वर्ग केलेला निधीमध्ये मृत्यू पावलेले ६२, अपंगत्व ३ अशा ६५ जणांना १२७ लाख रूपये वाटप केले आहेत. तर मंजूर प्रस्तावांपैकी निधी अभावी प्रलंबित प्रस्ताव असे आहेत. यामध्ये मृत्यू २११, अपंगत्व ३ असे एकूण २१४ जणांचा समावेश आहे. तर यासाठी अजून ४ कोटी २६ लाख निधीची गरज आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०४७

**आला डोळ्यांसी कवळ । तेणें मळलें उजळ ।।**

एखादी चांगली वस्तू, घटना, बाब समोरच्या सर्वांना चांगलीच दिसेल असे नाही. कांहीना ती वस्तू चांगली असूनही वाईट किंवा अयोग्य दिसू शकते. हे दिसणे ज्याच्या त्याच्या दृष्टीवर अवलंबून आहे. अनेक चांगली, सुस्वभावी माणसंसुध्दा अनेकांच्या नजरेत चांगली दिसत नाहीत. अर्थात, चांगल्यांनाही वाईट नजरेने पाहणारे किंवा नांव ठेवणारे लोक समाजात आहेत. समोरचा चांगला आहे की, वाईट हे बऱ्याचवेळा पाहणाऱ्याच्या नजरेवरुन ठरविले जाते. पाहणाऱ्याची नजरच जर मूळात चांगली नसेल तर समोरचा चांगला असला तरीही तो वाईटच असल्याचे भासविले जाते. सकारात्मक दृष्टी जोपासणे अत्यंत आवश्यक असले तरीही अनेकजण नकारात्मक दृष्टीनेच जगाकडे पाहतात. त्यामुळे चांगल्या गोष्टींनाही नांवे ठेवली जातात. आपल्या दृष्टीवर भरपूर कांही अवलंबून असते. जशी दृष्टी तशी सृष्टी म्हटल्याप्रमाणे आपल्या दृष्टीच्या सकारात्मक, नकारात्मकतेवर बरेच कांही अवलंबून आहे. कावीळ झालेल्या डोळ्यांना सर्व वस्तू पिवळया म्हणजे मळकट दिसू लागतात. पांढऱ्या शुभ्र वस्तूही त्या डोळ्यांना पिवळया दिसतात. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात, आला डोळ्यांसी कवळ । तेणें मळलें उजळ ।। आपली नकारात्मक दृष्टी ही आपल्यासाठी व इतरांसाठीही घातक असते. चांगल्या गोष्टी, घटना, व्यक्तींना प्रेरणा देण्याऐवजी आपण नकारात्मकतेने त्याच्याकडे पाहू लागलो तर अशा घटना, गोष्टी, व्यक्तींना उत्तेजना मिळत नाही. आपल्या नकारात्मक नजरेचा परिणाम अधोगतीकडे होऊ शकतो. आपणाला चांगले पाहता येत नाही तर किमान आपण नकारात्मक तरी पाहू नये. दुसऱ्याला नांव ठेवणे, कमी लेखणे, हे सर्व आपल्या नकारात्मक दृष्टीमुळे घडते, हे विसरु नये. चांगल्यात चांगले पाहिल्याने चांगुलपणात वाढ होते. त्याचबरोबर वाईटात चांगले पाहिल्याने वाईटपणा कमी होऊन त्यातही चांगुलपणाची निर्मिती होऊ लागते. एखाद्याच्या विकासाला चालना द्यायची का अडसर ठरायचा हे बऱ्याचअंशी आपल्या दृष्टीवर अवलंबून आहे. आपले आचार-विचार, भावना, स्वभाव, वृत्तीला बऱ्याच अंशी आपल्या दृष्टीमुळे चालना मिळते. त्यामूळे मूळात आपली दृष्टीच सकारात्मक असेल तर आपले वर्तन, भावना, आचार-विचार सकारात्मक होऊ शकतात. सकारात्मकता हा मानवी जीवनाच्या सुखाचा खरा अधारस्तंभ आहे. आपणच आपल्या भोवती गर-गर फिरलो तर आपल्याला भोंवळ येते. भोंवळ येण्यामुळे घर-दार, वस्तू, झाडे सर्व कांही गर-गर फिरत असल्याचे आपणाला दिसते. खरे म्हणजे सर्व कांही जिथल्या तिथे असते. केवळ आपणाला भोंवळ आल्याने ते फिरल्यासारखे भासते. त्याप्रमाणे आपल्या नकारात्मक दृष्टीमुळे आपणाला जगातील चांगल्या बाबी नकारात्मक दिसू लागतात. प्रत्यक्षात त्या चांगल्याच असतात. आपली दृष्टी सकारात्मक ठेवायची का नकारात्मक हे आपल्यावरच अवलंबून असल्याने आपण ती सकारात्मक ठेवण्याचाच प्रयत्न करावा. आपली नकारात्मक दृष्टी इतरांना जसे आपल्या नजरेतून उतरविते तसे आपणालाही इतरांच्या व स्वत:च्या नजरेतून उतरविण्यास कारणीभूत ठरू शकते.



**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# आनंद कुंभार हे ऋषितुल्य व्यक्तिमत्व

## डॉ. अरुणचंद्र पाठक : शिलालेखांचा पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

सोलापूरशहरात सोमवारी सायंकाळी हिराचंद नेमचंद येथील लोकमान्य टिळक सभागृहात पुस्तकाचे प्रकाशन झाले. त्याप्रसंगी 'शिलालेखांचा शोध घेणारे आनंद कुंभार हे नावलौकिक असणारे प्राध्यापक नव्हते. तर, ते एक ऋषी गणातील महापुरुष होते.' त्यांनी कायम भटकंती करत अनेक शिलालेख शोधले. त्यांचे काम हे समाजाप्रती समर्पण म्हणून कायम लक्षात राहील, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक अरुणचंद्र पाठक यांनी केले.



हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात सोमवार तीन मार्च रोजी कै. आनंद कुंभार लिखित 'शिलालेखांचा अभ्यास या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. अरुणचंद्र पाठक यांच्या हस्ते प्रकाशन झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मंचावर हिराचंद नेमचंद वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत कामतकर, प्रमुख कार्यवाह प्रा. डॉ. नभा काकडे, कार्यवाह दत्ता गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी कै. कुंभार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

### चित्रफितीतून आनंद कुंभार यांच्या कार्यावर प्रकाश

अमोल आणि सीमंतिनी चाफळकर यांनी बनवलेली कुंभार यांच्या कार्यावर सात मिनिटांची चित्रफित दाखवण्यात आली. शिलालेखांचे वाचन कसे करायचे ? हे वाचन करण्याआधी त्या शिलालेखांचे ठसे कसे घ्यायचे? शिलालेख शोधण्यासाठी कै. कुंभार यांनी काय काय प्रयत्न केले? याचे संपूर्ण वर्णन या चित्रफितीत होते.

डॉ. अरुणचंद्र पाठक म्हणाले, कुडल संगम येथील शिलालेख संबंधी आनंद कुंभार यांनी महत्वाचे काम केले. कुडल संगमसह त्यांनी केलेल्या कामाची महती हुबळी धारवाड विद्यापीठाचे डॉ. श्रीनिवास रित्ती यांनी जाणली. सोलापूर जिल्ह्यात यादव, चालुक्य, बहामनी शिलालेख आहेत. ज्यांचे वाचन कुंभार यांनी केले.

आनंद कुंभार हे हाडाचे संशोधक होते. त्यांनी मराठी, इंग्रजी, कन्नड भाषांमध्ये देखील आपल्या शोध लिहून ठेवले. त्यांच्यासारखा संशोधकाचा आपल्या सर्वांना अभिमान वाटायला हवा. यासोबत ज्या गावांमध्ये शिलालेख आले आहेत, त्या ग्रामस्थांनाही त्याचा अभिमान असावा. यासाठी ग्रामस्थांनी प्रयत्न करावे व शासनाने मदत करावी, असे आवाहन पाठक यांनी केले.



# डब्ल्यू.आय.टी. विचार २०२५ चा बक्षीस समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (डब्ल्यू.आय.टी.) हे एक प्रतिष्ठित अभियांत्रिकी शिक्षण संस्था असून, महाराष्ट्रासह देशभरात लौकिक आहे. येथे उपलब्ध असलेल्या शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. आजच्या जागतिक कंपन्यांमध्ये यशस्वी होण्यासाठी तांत्रिक कौशल्ये आणि इंग्रजी भाषेवर प्रभुत्व प्राप्त करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे मार्गदर्शन डब्ल्यू.आय.टी. विचार २०२५ च्या बक्षीस समारंभात मान्यवरांनी विद्यार्थ्यांना केले. पुणे येथील युनिक सोल्युशन प्रा.लि. चे संस्थापक संचालक श्री. आरिफ पूनावाला आणि मुंबई येथील कॅपजेमिनीचे पीएमपी संचालक श्री. हरीश उसुलुमर्ती यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या समारंभात वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त श्री. भूषण शहा, श्री. वैभव गांधी यांच्यासह प्राचार्य डॉ. विजय आठवले आणि विचार २०२५चे सह-समन्वयक डॉ. सतीशकुमार काशीद हे उपस्थित होते. इनोव्हर्स - ग्रुप डी (मेकॅनिकल इंजिनिअरिंग), ऑटोडेस्क चॅलेंज ही स्पर्धा ''ऑटोडेस्क इंडिया'' द्वारे प्रायोजित करण्यात आली. यात एकूण ३०,०००/- रुपयांचे बक्षीस समाविष्ट आहे, तसेच सायटेक (सायन्स अँड टेक्नोलॉजी प्रोजेक्ट कॉम्पिटिशन) ही स्पर्धा आय.एस.टी.ई. नवी दिल्ली या संस्थेच्या वतीने प्रायोजित करण्यात आली. डब्ल्यू.आय.टी. विचार २०२५ च्या विविध स्पर्धेच्या अनुषंगाने लाख रुपयांचे बक्षीस वितरण करण्यात आले. या मध्ये सोलापुरातील विविध इंजिनिअरींग कोलेजच्या विद्यार्थ्यांसह आणि महारष्ट्र, कर्नाटक राज्यातील विद्यार्थ्यांचा समावेश होता.

# स्वामी समर्थांच्या जयघोषात वालचंदनगरीत पालखी सोहळ्याचे आगमन



**तभा वृत्तसेवा,**
**वालचंदनगर, दि. ४ मार्च-**

वालचंदनगर (ता. इंदापूर) येथे श्री स्वामी समर्थांच्या जयघोषात पुणे जिल्ह्यातील वालचंदनगर येथे श्री स्वामी समर्थ पादुका पालखी सोहळ्याचे आगमन झाले. भाविकांनी दारोदारी सडा रांगोळी काढून हातात आरती निरंजनी घेऊन पालखीचे स्वागत करण्यात आले.

वालचंदनगर येथील श्री स्वामी समर्थ सेवा मंडळाच्या वतीने मेन कॉलनी, नवीन बाजारपेठेतून भव्य मिरवणूक काढण्यात आली. सायंकाळी ललिताबाई मंगल कार्यालयात पालखी मुक्कामाला थांबली होती.वालचंदनगरात दरवर्षीप्रमाणे या वर्षी देखील अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ पालखी सोहळ्या चे आगमन झाले.हे पालखी सोहळ्याचे २६ वे वर्षे असून संपूर्ण महाराष्ट्रातील गावोगावच्या स्वामी भक्ताना समर्थांचे दर्शन घेता यावे म्हणून परीक्रमा चालू केली आहे.

वालचंदनगरीत पादुकांचे आगमन झाल्याने परिसरातील स्वामी भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (ट्रस्ट)चे संस्थापक अध्यक्ष श्री जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांचा मंडळाचे अध्यक्ष हनुमंत कुंभार व उत्सव कमिटीने अध्यक्ष विजय कांबळे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट अक्कलकोट संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले याच्या हस्ते प्रदीपसिंग राजपूत सी.बी. आय संचालक, विशेष सहकारी वकील महाराष्ट्र राज्य, अप्पर पोलीस अधीक्षक बारामती गणेश बिराजदार, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट अक्कलकोट संस्थापक उपाध्यक्ष अभय खोबरे, पालखी प्रमुख संतोष भोसले, इंदापूर देशपांडे व्हेज चे मालक उदय देशपांडे, सचिन खुडे बी.डी.ओ इंदापूर, सायक पोलीस निरीक्षक वालचंदनगर राजकुमार डुणगे, प्रताप आबा पाटील माजी जिल्हा परिषद, वैशाली पाटील, वीरसिंग रणसिंग इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठान सचिव, सौदप्पा इंगळे स्वामी नाम प्रसारक अक्कलकोट, हनुमंत काळे स्वामीभक्त, कळंबचे सरपंच विद्या अतुल सावंत यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

# लोकशाही दिनी ३२ तक्रारी प्राप्त

## काही तक्रारींचा जागीच केला निपटारा; आरडीसी कुंभार यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

सोलापूर जिल्हा लोकशाही दिन जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडला. यासाठी जिल्ह्यातून तब्बल ३२ तक्रारी अर्ज दाखल झाले. तक्रारी अर्ज प्राप्त होताच यातील काही तक्रारींचा आम्ही जागीच निपटारा केली असून, इतरही तक्रारी ज्या-त्या विभागप्रमुखांकडे पाठवून त्याचा पाठपुरावा करून सामान्य माणसांना लवकर न्याय मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न राहील, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी आज (दि. ३) दिली.

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी मंत्रालयस्तर तसेच जिल्हाधिकारी/महानगरपालिका आयुक्तस्तर, दुसऱ्या सोमवारी विभागीय आयुक्तस्तर व तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरावर लोकशाही दिन होतो. या दिवशी सर्व विभागप्रमुखांची उपस्थिती असते. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या लोकशाही दिना मध्ये ३२ तक्रार अर्ज प्राप्त झाले असून, त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. सोलापूर ५, पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण २, पोलीस आयुक्त सोलापूर शहर १, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय सोलापूर १ कामगार आयुक्त १, सार्वजनिक बांधकाम विभाग, १, महसूल शाखा २, तहसिलदार बार्शी १, तहसिलदार उत्तर सोलापूर १, महावितरण सोलापूर ३, प्रबंधक जिल्हा अग्रणी बँक सोलापूर १, भूसंपादन शाखा १, उपविभागीय अधिकारी पंढरपूर २, तहसिलदार माळशिरस १, उपविभागीय अधिकारी सोलापूर क्रं.०२- १, भविष्य निर्वाह निधी कायालय सोलापूर २, तहसिलदार पंढरपूर १, प्रबंधक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ सोलापूर १, जिल्हा उपनिबंधक सह संस्था सोलापूर, प्रादेशिक सहसंचालक (साखर) सोलापूर विभाग सोलापूर १, तहसिलदार महसूल १, दुय्यम निबंधक, सोलापूर १ अशा एकूण ३२ तक्रारी आल्या आहेत.

### या अधिकाऱ्यांची होती उपस्थिती

यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त साहेबराव देसाई, कौशल्य विकास कार्यालयाच्या सहाय्यक संचालक संगीता खंदारे, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, जिल्हा कारागृह अधीक्षक सुशील कुंभार, तहसीलदार श्रीकांत पाटील, आरोग्य विभागाचे डॉक्टर विजय वरवटकर, यांच्यासह अन्य संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

# राष्ट्रीय परिषदेत ११० प्राध्यापकांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ''माध्यमिक व उच्च शिक्षणात गुणवत्तेची हमी'' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषद संपन्न झाली. या परिषदेमध्ये माध्यमिक शिक्षणाच्या गुणवत्ता विकासामध्ये शिक्षण संस्था, शासन आणि सध्या कार्यरत असलेले शिक्षक यांची नेमकी भूमिका व जबाबदाऱ्या यासंदर्भात सखोल चिंतन करण्यात आले. या परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे आंतरविद्याशाखीय अभ्यास शाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. राजशेखर हिरेमठ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



डॉ. राजशेखर हिरेमठ यांनी शालेय व महाविद्यालयीन गुणवत्तेची हमी टिकवण्याची प्रमुख जबाबदारी ही शिक्षकांची आहे असे मत मांडले. या परिषदेमध्ये महाराष्ट्रातील ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉ. ह. ना. जगताप यांनी माध्यमिक स्तरावरील गुणवत्तेची हमी या विषयावर व्याख्यान देत असताना शालेय शिक्षणासाठी आलेले याबाबतची सविस्तर माहिती दिली. प्राचार्य डॉ. बी. पी. मरजे यांनी उच्च शिक्षणातील गुणवत्तेची हमी या विषयांतर्गत - २०२० मुळे उच्च शिक्षणात होणारे बदल व उच्च शिक्षणातील गुणवत्ता समृद्धीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. परिषदेचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. या परिषदेत महाराष्ट्रातील सोलापूर, कोल्हापूर, सांगली, नांदेड, धाराशिव व पुणे जिल्ह्यातून ११० प्राध्यापकांनी सहभाग घेतला. तसेच या परिषदेमध्ये फक्त प्राध्यापकच नव्हे तर पीएच. डी. संशोधक व पदव्युत्तर पदवीचे विद्यार्थी हेही सहभागी झाले होते. प्रस्तुत परिषदेमध्ये ६० संशोधकांनी गुणवत्तेची हमी यासंदर्भात आपले संशोधन पेपर सादर केले तसेच आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशितही केले. या उद्घाटन समारंभासाठी सोलापूर विद्यापीठातील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य व प्राध्यापक उपस्थित होते. प्रास्ताविक परिषदेचे समन्वय डॉ. दत्ता वाघमारे यांनी केली. सूत्रसंचालन डॉ. विजयकुमार जोकारे यांनी केले तर आभार या परिषदेच्या सह समन्वयिका डॉ. गीता मासाळ यांनी केले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : बुधवार
दि. ५ मार्च २०२५
विक्रम संवत् २०८०-८१
शके - १९४६
संवत्सर - क्रोधी नाम
मास - फाल्गुन
शु. षष्ठी (१२.५१)
ऋतु - वसंत
नक्षत्र - कृत्तिका (२५.०७)
योग - वैधृति (२३.०६)
करण - गर (२३.४७)

दिनविशेष - चांगला दिवस
संत मुंगसाजी महाराज पु.ति.

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष** : मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. व्यापार चांगला चालेल.

**वृषभ** : आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. प्रवास सुखकारक राहील.

**मिथुन** : आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**कर्क** : मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील.

**सिंह** : कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल.

**कन्या** : मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल.

**तुळ** : चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक** : सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

**धनु** : आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील.

**मकर** : नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कुंभ** : सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन** : आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. कामाची गती अशीच राहू द्या. व्यापारा निमित्ताने केलेला प्रवास सफल होईल. अश्वासन देऊ नका.

# सोलापूर विद्यापीठाचा उद्या नामविस्तार सोहळा

## ग्रंथदिंडी, राष्ट्रीय चर्चासत्र, विविध स्पर्धेचे पारितोषिक वितरण


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा सहावा नामविस्तार दिनाचा सोहळा गुरुवार, दि. ६ मार्च २०२५ रोजी साजरा करण्यात येणार असून यानिमित्त ग्रंथदिंडी, राष्ट्रीय चर्चासत्र तसेच विविध स्पर्धेचे पारितोषिक वितरण होणार असल्याची माहिती पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी दिली.

नामविस्तार सोहळ्यानिमित्त विद्यापीठात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार दि. ६ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता विद्यापीठ कॅम्पसमधून ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात नामविस्तार दिनाचा मुख्य सोहळा व राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन होईल. या कार्यक्रमास मुख्य अतिथी म्हणून डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रा. डॉ. राजनीश कामत हे उपस्थित राहणार आहेत. होळकरशाहीचे लेखक व संपादक देविदास पोटे यांचे यावेळी बीजभाषण होणार आहे. उद्घाटनानंतर पहिल्या सत्रात रामभाऊ लांडे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे मंदिर जीर्णोद्धार व वर्षासने या विषयावर तर विनिता तेलंग यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे धार्मिक व सांस्कृतिक धोरण या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. शिवाजी वाघमोडे हे असणार आहेत. दुसऱ्या सत्रात प्रा. बाबासाहेब दुधभाते यांचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि महेश्वर या विषयावर व्याख्यान होईल. याचबरोबर डॉ. चंद्रकांत चव्हाण हे अहिल्यादेवी होळकर यांचे कल्याणकारी प्रशासन या विषयावर तर वर्षा चौरे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि महिला सबलीकरण या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. गौतम कांबळे हे असणार आहेत. समारोपाचा सत्र लेखक मुरहरी केळे व अधिष्ठाता डॉ. वसंत कोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलक:- (७०) सजगता

एकदा एका शिबिरात गीत गायन सुरू होते. त्याची प्रॅक्टिस करणे चालू होते ते शेवटच्या दिवशीच्या कार्यक्रमात म्हणायचं होतं. गीताचे बोल होते 'तुम करो राष्ट्र आराधन' श्री गुरुजींनी हे ऐकले व गीताच्या ओळीतील तुम शब्दा ऐवजी हम शब्द म्हणायला लावला. नंतर गुरुजी म्हणाले ही आराधना आम्ही सर्वांनी करायची आहे. आम्ही स्वयंसेवक नेहमीच मातृभूमीच्या निर्माणाची, उत्कर्षाची, विकासाची, उत्क्रांतीची आस धरू; तेव्हाच ही आपली भारत माता पुन्हा एकदा जगत जननीचे रूप धारण करेल. आणि मग गीताच्या ओळी झाल्या हम करे राष्ट्र आराधन. जे गीत आता सर्वांना प्रिय झालेले आहे. हे गीत पुढील अलक मध्ये लिहीत आहे.

असेच एकदा बाल शिबिरात दीप बुझाना हा खेळ सुरू होता. गुरुजींनी सांगितले दीप प्रज्वलित करना चाहिए. त्वरित त्या खेळाचे नाव बदलून 'आव्हान' हे नाव ठेवले. आणि मग या खेळात अनेक ज्योती प्रज्वलित झाल्या. गोष्ट साधी पण सजगता खूप.

**- क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# पोलीस निरीक्षक बोरीगिड्डेंचा मुख्यमंत्र्यांकडून सन्मान

## मंगळवेढा पोलीस दलाची मान उंचावली

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. ४ मार्च-**

मंगळवेढा पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांना महाराष्ट्र शासानाचा उत्कृष्ट सेवेचा पुरस्कार मिळाला असून याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. दरम्यान हा पुरस्कार शिरोळ पोलीस स्टेशन येथे कार्यरत असताना केलेल्या विविध कामाबद्दल त्यांना मिळाला आहे.

मंगळवेढ्याचे विद्यमान पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे हे येथे येण्यापुर्वी कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ येथील पोलीस स्टेशनला सन २०२१ ते २०२३ या कालावधीत कार्यरत होते. या दरम्यान पोलीस महासंचालक कार्यालयाकडून आलेल्या सुचनांच्या अनुषंगाने पो.नि. बोरीगिड्डे यांनी त्यांच्या कारकिर्दीत दाखल गुन्हे उघडकीस आणून मोठ्या प्रमाणात




**मंगळवेढ्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांना महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट सेवेचा पुरस्कार प्रदान करताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,पोलीस महासंचालिका रश्मी शुक्ला व अन्य पदाधिकारी.**

मुद्देमाल जप्त केला होता. त्याचबरोबर आरोपींना शिक्षा ही लागल्या होत्या. हे करत असताना त्यांनी पोलीस प्रशासन लोकाभिमुख करुन कामकाज पारदर्शक केले होते. पोलीस स्टेशन व परिसर याकडे वेळोवेळी लक्ष घालून स्वच्छता राखण्यात त्यांनी अधिक भर दिला होता. या कार्याची राज्याच्या पोलीस महासंचालकांने दखल घेवून त्यांना नुकताच ठाणे येथे महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय उत्कृष्ट सेवेचा पुरस्कार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी राज्यातील अन्य चार पोलीस अधिकार्यांनाही हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

विद्यमान कोल्हापूर परीक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांनी त्यांच्या कार्याची दखल घेवून अहवाल पोलीस महासंचालकाला पाठविला होता. ते मुळचे सांगली जिल्ह्यातील असून २००५ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या परीक्षेत ते यशस्वी होवून सेवेत दाखल झाले. आत्तापर्यंत त्यांना शंभरच्या पुढे रिवॉर्ड मिळाल्याचे सांगण्यात आले. राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याने पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अतिरिक्त पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, मंगळवेढ्याचे डीवायएसपी विक्रांत गायकवाड यांनी व कर्मचार्यांनी त्यांचे अभिनंदन केले. मंगळवेढ्याला नुकतेच पोलीस निरीक्षक बोरीगिड्डे हे मागील महिन्यात बदलून आले असून या पुरस्कारामुळे मंगळवेढ्याच्या पोलीस दलाची मान उंचावली आहे. मंगळवेढ्याच्या पोलीस दलात काम करणार्‍या पोलीस अधिकार्‍याला प्रथमच राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याने एक वेगळा ठसा उमटला आहे.

## मंद्रूप येथे मोफत फार्मर आयडी शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि. ४ मार्च-**

युवा क्रांती प्रतिष्ठानच्या वतीने मंद्रूप येथे शेतकर्‍यांसाठी मोफत फार्मर आयडी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात शेतकर्‍यांना फार्मर आयडीचे वाटप करण्यात आले. शेतकर्‍यांनी मोठ्या संख्येने या शिबिराचा लाभ घेतला. फार्मर आयडी द्वारे शेतकर्‍यांना शासकीय योजनांचा लाभ घेण्यास मदत होणार आहे. यावेळी मंद्रूप गावाचे गावकामगार तलाठी आर.व्ही. कोकरे, कृषी सहायक रमेश फरताडे, तंटामुक्त अध्यक्ष रेवणसिद्ध मेंडगुदले, युवा क्रांती प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनमोल केवटे, संघटनेचे जिल्हाध्यक्ष आसिफ शेख, संदीप मेंडगुदले, दयानंद ख्याडे, उमेश कुंभार, लक्ष्मण माने, सुशील बनसोडे, शिव कुंभार, राम गोसावी, अनिल टेळे, ज्योतिबा बोराळे यांची उपस्थिती होती. युवा क्रांती प्रतिष्ठानच्या वतीने भविष्यातही असे शिबिरे आयोजित करण्याचा मानस प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनमोल केवटे यांनी व्यक्त केला.

## संक्षिप्त वृत्त



### लिटील बर्ड स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**करकंब, दि. ४ मार्च-**

करकंब येथील आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लिटल बर्ड इंग्लिश मीडियम स्कूलचे स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी प्रसंगानुरूप विविध वेशभूषा करून आपली कला सादर केली. स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील एक आनंदाचा क्षण असतो. स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा गौरव संबंधित शिक्षण संस्थेकडून केला जातो यामुळे विद्यार्थ्यांमधील नेतृत्व व इतर कलागुणांना वाव मिळतो, असे मत आ. अभिजीत पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अ‍ॅड. दिलावर कडगे, संस्थापक सचिव जमीर कडगे, अ‍ॅड. शरदचंद्र पांढरे, ग्रामसेवक सतीश चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते सतीश देशमुख, निवृत्त पोलीस अधिकारी रघुनाथ जाधव, मुस्ताक बागवान, धनंजय गुळमे, बबीता देशमुख, कल्पना देशमुख, सारिका पुरवत उपस्थित होते.




### महाकिडस् स्कूलमध्ये क्रीडा सप्ताह

**नातेपुते, दि. ४ मार्च-**

महाकिड्स सी.बी.एस.ई स्कूलमध्ये क्रीडा सप्ताहाचे उदघाट्न सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक महारुद्र परजने व शिव प्रसादच्या ऋतुजा मोरे यांच्या हस्ते करण्यात आला. मल्लखांब, योगा, बुद्धिबळ आणि इतर मैदानी खेळासाठी विद्यार्थी घडवण्यात संस्था नेहमी सक्रिय असते. मल्लखांब सारखा धाडशी, चपळतेचा पारंपारीक खेळ संस्थेत शिकवीला जातो याचे कौतुक नातेपुते पोलीस स्टेशनचे सपोनी महारुद्र परजने यांनी केले. इनडोअर आणि आऊटडोअर खेळाचे उदघाट्न यावेळी पार पडले. संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. शिवशंकर पांढरे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन आयेशा मणेरी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उपप्राचार्या अ‍ॅड. अमृता दाते, गौरी ढोपे, कोमल रणदिवे, वैशाली पालवे, कोमल कोडलकर यांनी परिश्रम घेतले.

### जेऊर येथे आजपासून महिला महोत्सव

**करमाळा दि. ४ मार्च-**

जागतिक महिला दिनानिमित्त जेऊर (ता. करमाळा) येथे महिला सन्मान रॅलीसह आजपासून महिला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन महिलांसाठी विविध स्पर्धा घेतल्या जाणार अशी माहिती ज्योती नारायण पाटील यांनी दिली. जेऊर येथे आ. नारायण आबा पाटील मित्रमंडळ व ग्राम पंचायत जेऊर यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. उद्या पासून सुरू होणाऱ्या महिला महोत्सवात दिनांक ४ मार्च रौजी रांगोळी स्पर्धा, उखाणे स्पर्धा



वफनी गेम्स तर दिनांक ५ मार्च रोजी अंताक्षरी, फनी गेम्स व गायन या स्पर्धा होतील. तसेच ६ मार्च रोजी वेशभुषा व अभिनय स्पर्धा तसेच फनी गेम तर या दिवशी महिलांचे फ्रि बी एम आय चेक अप व आहारा विषयक मार्गदर्शन केले जाईल. दिनांक ७ मार्च रोजी पाककला स्पर्धा व वकृत्व स्पर्धा तसेच फनी गेम तर दिनांक ८ मार्च रोजी महिला सन्मान रॅलीसह डान्स स्पर्धा व बक्षीस वितरण समारंभ होणार आहे. या सर्व स्पर्धा सुरज मोती फन्कशन हॉल (शिक्षक कॉलनी) जेऊर येथे होतील. या स्पर्धेसाठी समस्त महिला भगिनी नियोजक म्हणुन जबाबदारी पार पाडणार असुन जेऊर व परिसरातील समस्त महिलांनी या महोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

### पत्नीच्या प्रियकराचा खून प्रकरणातून पतीची निर्दोष मुक्तता

**करकंब, दि.४ मार्च-**

पत्नीच्या प्रियकराचा खून प्रकरणात अटक करण्यात आलेल्या पतीला न्यायालयाने निर्दोष मुक्त केले.बचाव पक्षाचा प्रभावी युक्तिवाद व सबळ पुराव्याअभावी न्यायालयाने पतिवरचा गुन्हा सिद्ध न झाल्याने पतीची निर्दोष मुक्तता केली.हा निर्णय पतीला न्याय मिळवून देणारा ठरला असून त्याच्यावर लावण्यात आलेल्या खोट्या आरोपाचा ठपका साधारणतः ८ वर्षानंतर दूर झाला असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. सदरची घटना २३ मे २०१६ रोजी कोळा सांगोला ता.सांगोला रोडवर हॉटेल आसरासमोर घडली



होती.आरोपीने पत्नीच्या प्रियकराचा खून रागाच्या भरात किंवा सूड घेण्याच्या भावनेने येण्याचा आरोप ठेवून पोलिसांनी पतीला अटक करून त्याच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला होता.सदर आरोपीस सांगोला पोलिसस्टेशन गु.र.नं. ३४२/२०१६ मध्ये दि.२५/५/२०१६ मध्ये आय. पी.सी.कलम ३०२ व ३४ प्रमाणे अटक केली होती.बचाव पक्षाचे वकील एम.बी.शिंदे यांनी युक्तिवाद करताना यात पतीचा या खुनाशी थेट संबंध नाही यावर भर देत बचाव पक्षाने स्पष्ट केली की केवळ संशयावरून एखाद्या व्यक्तीला आरोपी ठरवणे चुकीचे आहे. सदर खुनाबाबत आरोपीचा प्रत्यक्ष सहभाग नाही हे सर्व पुरावे व साक्षीदारांच्या जबाबावरून स्पष्ट होते.यावर सुनावणी करताना पंढरपूर जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश डी.एन. सुरवसे यांनी बचाव पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपी आनंदा गणपत बजबळकर याची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली.याप्रकरणी सरकार पक्षातर्फे सरकारी वकील म्हणून अ‍ॅड. सारंग वांगीकर यांनी तर बचाव पक्षातर्फे अ‍ॅड. एम.बी.शिंदे, अ‍ॅड. एन.बी.शिंदे, ऑड.के.बी.मेटकरी, अ‍ॅड. एम.एस.आटपाडकर यांनी काम पाहिले.

# रुग्णसेवा हीच स्वामी सेवा : प्रथमेश इंगळे

## श्री वटवृक्ष देवस्थान व डॉ. विजयकर होमिओपॅथिक शिबिरात १०७ दिव्यांग मुलांनी घेतला लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ मार्च-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या माध्यमातून धार्मिक सामाजिक उपक्रमासोबतच आरोग्य शिबिरे राबविण्याचे उपक्रमही वारंवार राबविले जातात, याचे कारण असे की रुग्णसेवा हीच स्वामी सेवा समजून या आरोग्य शिबिरांचे उपक्रम राबविले जात असल्याचे मनोगत प्रथमेश इंगळे यांनी व्यक्त केले.

येथील श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संचलीत मैंदर्गी- गाणगापूर रोडवरील श्री. स्वामी समर्थ रुग्णालयात २० वर्षांखालील दिव्यांग रुग्ण मुलांसाठी आयोजित करण्यात आलेले होमिओपॅथिक शिबिर



संपन्न झाले. या होप फॉर होपलेस मोफत होमिओपॅथिक शिबीराचे शुभारंभ मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते डॉ. प्रफुल्ल विजयकर, डॉ. अपर्णा सामळे व वैद्यकीय पथकांच्या उपस्थितीत करण्यात आला. शिबिरात डॉ. प्रफुल्ल विजयकर व वैद्यकीय पथकाच्या वतीने २० वर्षांखालील दिव्यांग मुलांची तपासणी करून औषधोपचार देण्यात आले. वीस वर्षाखालील १०७ दिव्यांग मुलांनी या शिबिराचा लाभ घेतला. याकमी डॉ. प्रफुल्ल विजयकर, डॉ. अपर्णा सामळ यांच्यासह वैद्यकीय पथक व देवस्थानचे सेवेकरी रवी मलवे, श्रीकांत मलवे, भीमा मिनगले आदींनी परिश्रम घेतले. प्रारंभी प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून या आरोग्य शिबिराची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी करमाळा तालुक्यातील पक्षी मित्र कल्याणराव साळुंखे, विशाल स्वामी, मनोज काटगाव यांनी शिबिरास भेट दिली. याप्रसंगी सर्व वैद्यकीय पथकातील डॉक्टरांचा व कल्याणराव साळुंखे, मनोज काटगाव यांचा मंदिर समितीच्या वतीने सन्मान केला. मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रा. शिवशरण अचलेर, श्रीकांत मलवे, रवी मलवे, सुनील नायकोडी, श्रीशैल गवंडी, संजय पाठक उपस्थित होते.

# आता तलावांचे होणार पुनरुज्जीवन

## तलावातला गाळ काढण्यासाठी जैन संघटना व महाराष्ट्र शासन यांच्यात सामाजिक करार

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभूर्णी, दि. ४ मार्च-**

आता प्रत्येक गावातील तलावाची पुनर्जीवन गाळमुक्त शिवार योजना अंतर्गत जैन संघटनेच्या मदतीने करणार अशी भूमिका संघटने घेतली आहे. शासनाची ही योजना गावागावात पोहोचवणे, शेतकर्‍यांना गाळ घेऊन जाण्यासाठी प्रोहोत्सान देणे, जनजागृती करून जनआंदोलन उभे करणे, मागणी अर्ज निर्माण करणे तसेच गाळमुक्त धरण हे टेक्नॉलॉजी पोर्टल तयार करण्यासाठी भारतीय जैन संघटना म्हणजे बीजेएस आणि महाराष्ट्र शासनाच्या मदतीने जलयुक्त शिवार, गाळ मुक्त अभियान राबवण्याचा निर्णय घेतला आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी सरपंचांनी आपल्या गावांचा मागणी अर्ज 'बीजेएस डिमांड अ‍ॅप'वर ऑनलाइन भरावा. बीजेएसने सर्व जिल्ह्यात नेमलेले प्रशिक्षित जिल्हा समन्वयक तसेच महाराष्ट्रातील बीजेएसचे हजारो कार्यकर्ते हे बीजेएसच्या माध्यमातून शेतकर्‍यांना, ग्रामपंचायतींना, तालुका-जिल्हा प्रशासनाला सहयोग करण्यासाठी सज्ज आहेत. या योजनेच्या जनजागृतीसाठी 'सुहाना स्पाइसेस' यांनी बीजेएसला सहकार्य केले आहे. महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने यावर्षी जोरदार तयारी केली आहे. राज्यातील प्रत्येक गावांच्या तलावातील गाळ काढून पुनर्जीवन व खोलीकरण रुंदीकरण करणे. यासाठी 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार नाला खोलीकरण व रुदीकरण' या योजना ताकदीने राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

तलावातील गाळ काढण्याचा संपूर्ण खर्च शासन करणार असून यासाठी पूर्ण राज्यात एक दर निश्चित करण्यात आला आहे. कोणतीही स्वयंसेवी संस्था अथवा ग्रामपंचायतीला या कामांसाठी अर्ज करून जिल्हा प्रशासनाने दिलेल्या पद्धतीनुसार काम करता येईल. तलावातून काढलेला गाळ शेतात टाकण्यासाठी अल्प व अत्यल्पभूधारक शेतकरी, विधवा, अपंग शेतकरी व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाकडून निश्चित दरानुसार अनुदानही दिले जाणार आहे. योजनेची सर्व माहिती 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' या शासनाच्या पोर्टलवर दिली असून त्यासाठी ' .ेिहळुररी.ले' ही वेबसाइट पाहावी. महाराष्ट्रातील जास्तीत जास्त गावांनी तलावातील गाळ काढण्यासाठी, नाला खोलीकरण-रुंदीकरणासाठी त्वरित अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बीजेएसचे महाराष्ट्र अध्यक्ष केतन शहा, राज्य कार्यकारणी सदस्य प्रवीण बलदोटा, मराठवाडा विभागीय अध्यक्ष रवींद्र गांधी, विभागीय सचिव महेश कोकीळ, जिल्हा समन्वयक विशाल मेहता यांनी केले आहे.

## रयत क्रांती संघटनेच्या पक्ष प्रदेशाध्यक्षपदी प्रा. सुहास पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ४ मार्च-**

माजी मंत्री तथा शेतकरी नेते आ. सदाभाऊ खोत प्रणित रयत क्रांती संघटनेच्या प्रदेशाध्यक्षपदी सागर खोत, तर रयत क्रांती संघटनेच्या पक्ष प्रदेशाध्यक्षपदी प्रा. सुहास पाटील यांची निवड करण्यात आली. रयत क्रांती संघटनेची पुणे येथे जाधवर इन्स्टिट्यूटमध्ये विस्तारित राज्य कार्यकारिणीची बैठक माजी मंत्री तथा रयत क्रांती सुहास पाटील संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आ. सदाभाऊ खोत यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. या बैठकीमध्ये संघटना व पक्ष प्रदेशाध्यक्षांच्या निवडी सोबतच विभागीय अध्यक्ष यांच्याही नियुक्ती करण्यात आल्या.



# विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव दिल्यास अनेक वैज्ञानिक निर्माण होतील : शीतल म्हेत्रे



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. ४ मार्च-**

विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या कल्पनाशक्तीला वाव दिल्यास अनेक वैज्ञानिक निर्माण होऊ शकतात, असे प्रतिपादन इंडीयन मॉडेल स्कूलच्या सचिवा तथा कॉंग्रेसचे युवा नेत्या शीतल म्हेत्रे यांनी केले.

जागतिक विज्ञान दिनानिमित्त इंडीयन मॉडेल स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन आयोजीत करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेच्या सचिवा शीतल म्हेत्रे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी सलोनी शहा, प्राचि जोजन, मृणाली करजगीकर, स्नेहा वेळापुरकर, बिलकीस अनसारी, बी.एड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणपती वाघमोडे, मुख्याध्यापिका गौरी दातार उपस्थित होत्या.या प्रदर्शनात शाळेतील पहिली ते आठवी विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. २०० पेक्षा जास्त प्रतिकृती, कृतीयुक्त देखावा, विद्यार्थ्यांनी प्रदर्शनात मांडले होते. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देण्यासाठी त्यांची सर्जनशीलता जागृत करण्यासाठी अशा प्रकारचे अनेक उपक्रम शाळेत राबविले जातात. इंडीयन मॉडेल स्कूलच्या मुख्याध्यापिका गौरी दातार यांच्या प्रेरणेतून व विज्ञान शिक्षक, पालक विद्यार्थ्यांनी यांच्या सहकार्याने उत्साहात सहभाग नोंदविला. प्रदर्शन, रसायनशास्त्र, जीवशास्त्र भौतिकशास्त्र या विविध विषया संदर्भातील हे प्रदर्शन अविस्मरणीय ठरले. या प्रदर्शनास पालकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शाळेचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, संस्थेचे उपाध्यक्ष अमोल जोशी, सायली जोशी, ममता बसवंती यांनी प्रदर्शनास शुभेच्छा दिल्या. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी, विज्ञान विभागातील अंजली पडवळकर, धनश्री देगावकर, सुरेखा यकंची, फिरदोस शेख आदिंनी परीश्रम घेतले.



# डॉ. सारिका सुळे यांना तेजस्विनी महाराष्ट्राचा पुरस्कार

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि ४ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथील डॉकटर सारिका शंकर सुळे यांनी प्रतिकुल परिस्थितीवर मात करीत कोरोना काळात शहरातुन आपल्या गावाकडे येत अनेक संकटांना तोंड देत पशुवैद्यकीय सेवा देत आपल्या कामाचा ठसा उमटविला याचीच दखल घेत माणसुकी मल्टीपर्पज फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य यांनी सारीका सुळे यांच्या कामाची दखल घेत त्यांना तेजस्विनी महाराष्ट्राची राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार २ मार्च रोजी बिघा मलकापूर (जि.बुलढाणा) येथे त्यांना प्रदान करण्यात आला.

माणुसकी मल्टीपर्पज फाऊंडेशनच्या वतीने हा पुरस्कार त्यांना मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना प्रदान करण्यात आला. सारीका सुळे यांना सदरचा हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन केले.

# लक्ष्मीनगर जि.प. शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. ४ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लक्ष्मीनगरचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

यावेळी प्रथम सावित्रीबाई फुले व स्व. ज्ञानेश्वर पाटील यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी केंद्र प्रमुख राजकुमार फासे, केंद्र प्रमुख राजेंद्र सुरवसे व राजू गोरवे तसेच माजी पंचायत समिती सदस्या शोभा मदने, तुषार लवटे, माजी उपसरपंच स्वाती मदने, चेअरमन धनाजी मदने, अध्यक्ष शशिकांत घडयाळे, उपाध्यक्ष स्वाती गारुळे व सर्व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, मुख्याध्यापक सुहास कोल्हे, ग्रामपंचायत सदस्य शहाजी लेंगरे, माळशिरस तालुका शिक्षक पतसंस्थेचे संचालक सचिन गाटे व अमोल नष्टे, माजी उपसरपंच संजय पाटील या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक सुहास कोल्हे



यांनी प्रास्ताविक केले तर सचिन गाटे, केंद्रप्रमुख राजकुमार फासे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रात दैदीप्यमान कामगिरी करणाऱ्या कुसमोड येथील सर्वच विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करणयात आला. तसेच डॉ. स्नेहा भाळे हिने डाक्टर पदवी प्राप्त केल्याबद्दल तसेच मुख्याध्यापक सुहास कोल्हे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल तर संजय पाटील यांना आदर्श ग्रंथमित्र पुरस्कार मिळाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. अंगणवाडी तसेच जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी नृत्य करीत मान्यवरांची मने जिंकली.

यावेळी माजी सरपंच अरुण मदने, जितेंद्र पाटील, डॉ. शंकर भाळे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी सहशिक्षक सुनिल डुरे, अंगणवाडी सेविका सरगर यांनी परीश्रम घेतले. मुलांना डान्सचे प्रशिक्षण प्रजीत रजपुत यांनी दिले. यावेळी मुलांनी २५ वेगवेगळ्या मराठी, हिंदी गाणयावर बहारदार नृत्य केले. सूत्रसंचालन झाडे, चौरे, औटी यांनी केले तर आभार मुख्याध्यापक सुहास कोल्हे यांनी मानले.

# पांगरीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पांगरी, दि. ४ मार्च-**

पांगरीतील विहारा समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभा करण्याची बहुजन हक्क संघटनेची मागणी होत आहे. पांगरी बार्शी तालुक्यातील लातूर मुंबई हायवेवर असणाऱ्या पांगरी गावांमध्ये बुद्धविहाराच्या समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पूर्णकृती पुतळा बसवण्याची मागणी बहुजन हक्क अभियान तालुका अध्यक्ष सचिन पालके यांनी केली आहे.



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या बार्शी तालुक्यातील तीन गावाचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो. त्यामध्ये बार्शी, पांगरी, कसबे तडवळे ही गावे आहेत.त्यातील कसबे तडवळ हे धाराशिव जिल्ह्यात आहे. बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या तीन गावच्या भावी पिढीला स्मरण व्हावे या उद्देशाने डॉ. बाबासाहेब यांनी बार्शीत देशांतर, धर्मांतर, नामांतर ही उद्घोषणा केली होती. त्याचप्रमाणे कसबे तडवळे येथे पहिली मांग महार परिषद घेतली होती. मांग महार परिषदेला कसबे तडवळ्याला जात असताना बाबासाहेब पांगरी येथे थांबले होते. या परिसरातील बौद्ध बांधवांनी त्यांचा सत्कारही केला होता. लवकरात लवकर पांगरी परिसरातून पुतळा कमिटी स्थापन करणार आहोत, असे तालुका अध्यक्ष सचिन पालके यांचा मानस आहे. महाराष्ट्रामध्ये बार्शी कोर्टाच्या समोर बाबासाहेब तर पांगरीत पोलीस स्टेशनच्या समोर बाबासाहेब असा प्रसंग यातून साकारला जाणार आहे.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बलकरच्या धडकेत शाळकरी मुलगा ठार

▸ बहिण राधिका गंभीर जखमी; पंढरपूर-सातारा रस्त्यावर जैनवाडी येथे अपघात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ मार्च-**

पंढरपुर सातारा राज्य महामार्गावर जैनवाडी धोंडेवाडी पाटी जवळ सिमेंट वाहतूक करणाऱ्या बल्करने पाठीमागून येऊन शाळेत जात असलेल्या बहीण भावास जोरदार धडक दिल्याने इयत्ता पाचवी मध्ये शिकत असलेल्या ११ वर्षाच्या चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. अपघाताची ही घटना मंगळवारी सकाळी घडली. या अपघाताची समजलेली माहिती अशी की, धनाजी देठे यांचा मुलगा चैतन्य व मुलगी राधिका हे मंगळवारी सकाळी ७ वाजता सयाजीराव




काळे विद्यालय या शाळेत जात असताना पाठीमागून भरगाव वेगाने येणाऱ्या सिमेंट बल्करने क्र.एम एच ०४, एम पी ०२४३) जोरदार धडक दिली. या धडकेत चैतन्य याचा गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यू झाला तर बहीण राधिका जखमी झाल्याने मिरज येथे उपचारासाठी तिला दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर बल्कर चालक सागर बजरंग धुमाळ हा गाडी घेऊन पळून गेला. मात्र वाखरी येथे त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.राज्य महामार्ग चौपदरी व गुळगुळीत झाल्याने अनेक चारचाकी वाहने सुसाट वेगाने धावत असतात. यामुळे रोड अपघातात वाढ होत आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### पालवी संस्थेस बाल स्नेही पुरस्कार

**पंढरपूर, दि. ४ मार्च-**

प्रभा हिरा प्रतिष्ठान पंढरपूर संचलित पालवी संस्थेस महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्यावतीने 'बाल स्नेही' पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहामध्ये सोमवारी (ता.३) पार पडलेल्या सन्मान सोहळ्यामध्ये बाल संरक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पालवी संस्थेच्या डिंपल घाडगे व त्यांच्या सहकाऱ्यांना स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले. याप्रसंगी राज्याच्या महिला व बाल विकास कॅबिनेट मंत्री अदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, राज्यमंत्री पंकज भोयर, मनिषा कांयदे, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा ॲड. सुसीबेन शहा, सदस्य ॲड. निलिमा चव्हाण, ॲड. प्रज्ञा खोसरे, ॲड. जयश्री पालवे, सायली पालखेडकर, चैतन्य पुरंदरे तथा ॲड. संजय सेंगर आदी मान्यवर उपस्थित होते.



### जिल्ह्यात बोगस खते, औषधे बनविणारे विक्री करणाऱ्यांचा बंदोबस्त करावा

**टेंभूर्णी, दि. ४ मार्च-**

सोलापूर जिल्ह्यात विविध खते विक्रेत्यांच्या माध्यमातून बोगस खते व औषधे विक्री होत असून शेतकऱ्यांची दिवसाढवळ्या फसवणूक होत आहे. सोलापूर जिल्ह्यात ठिक-ठिकाणी अवैधरित्या कंपन्या काढून खते, औषधे बनविले जात असून कोणत्याही प्रकारची प्रतवारी नसून बनावट प्रतीच्या औषधे व खतांची चढ्या दराने खुलेआमपणे विक्री होत असल्याने या औषधे/खतांमुळे शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे आतोनात नुकसान होत आहे. . तरी अशा ठिकठिकाणी सुरू असलेल्या कंपन्यावरती व दुकानदारांवरती धडक पद्धतीने तात्काळ कारवाई व्हावी अन्यथा संभाजी ब्रिगेडच्या वतीने कृषी मंत्री यांचे घरासमोर आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी याचे निवेदन कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना सोलापूर जिल्हा कृषी अधीक्षक यांच्याकडे देताना सचिन जगताप, अविनाश जगताप उपस्थित होते.

### राज्यस्तरीय बुधभूषण पुरस्कार जाहीर

**करमाळा, दि. ४ मार्च-**

करमाळा तालुका साहित्य मंडळ यांचे कडून दरवर्षी देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय बुधभूषण साहित्य पुरस्काराची नुकतीच घोषणा करण्यात आलेली असून उत्कृष्ट कविता संग्रहासाठी दिला जाणारा पुरस्कार हा कवी इंद्रजित पाटील (बार्शी) यांच्या कळ पोटी आली ओठी या काव्यसंग्रहास तर उत्कृष्ट गझल संग्रहासाठी दिला जाणारा हा मारोती मानेमोड यांच्या निर्गुण निराकार या गजल संग्रहास घोषित करण्यात आला आहे. राज्यभरातून मागवून घेतलेल्या काव्य संग्रह व गझल संग्रहातून या दोन पुस्तकांची निवड करण्यात आलेली आहे. याप्रसंगी मंडळाचे मार्गदर्शक हभप. ॲड. डॉ. बाबूराव हिरडे, मंडळाचे अध्यक्ष कवी प्रकाश लावंड, उपाध्यक्ष प्राचार्य नागेश माने, सचिव डॉ. सुनिता दोशी, खजिनदार गझलकार नवनाथ खरात तसेच कवी दीपक लांडगे, कवी खलील शेख, बाळासाहेब गोरे, नाथाजीराव शिंदे, मोरेश्वर पवार, दिग्विजय देशमुख, कवी नारायण सोरटे, प्रा. हनुमंत जाधव, डॉ. राजेशकुमार जाधव, कवी दादासाहेब पिसे, अंगद बिडवे, कवयित्री प्रणिता काटुळे, कवयित्री स्वाती माने,कवी संतोष कांबळे, प्रा. अश्विनी निकत, कवी डॉ. शैलेश देवकर,कवयित्री प्राची सरवदे, कवी तेजस धेंडे, कवयित्री ऋतुजा वीर, कवयित्री ऋतुजा सरतापे, कवयित्री मुक्ता काळे, कवयित्री गौरी खरात यांच्यासह या पत्रकार परिषदे वेळी मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते.लवकरच या पुरस्काराचे वितरण करमाळा येथे करण्यात येईल.

### सांगोला नगर परिषदेमार्फत महिला दिनानिमित्त विविध स्पर्धा

**सांगोला, दि. ४ मार्च-**

'स्वच्छ सर्वेक्षण २०२५' व 'माझी वसुंधरा ५.०' अभियानांतर्गत दरवर्षीप्रमाणे ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सांगोला नगर परिषदेमार्फत विविध स्पर्धा, कार्यशाळा व प्रशिक्षण तसेच 'होममिनिस्टर-खेळ पैठणीचा' यासारख्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी दिली. दि. ६ मार्च रोजी स.११ वा. महिलांच्या कलागुणांना वाव देण्याकरिता पाककला स्पर्धा तसेच दु.२ वा. रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. वरील दोन्ही स्पर्धेतील प्रत्येकी पहिल्या तीन क्रमांकांना रक्कम रुपये ५ हजार, ३ हजार, २ हजार व उत्तेजनार्थ बक्षीसही दिले जाणार आहेत. दि.७ रोजी स.११ वा. महिलांसाठी 'केमिकल फ्री फ्रुट पल्प प्रिझर्वेशन व फ्लोरल ड्रिंक' (फुलांचे सरबत) या विषयावरती प्रशिक्षण व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ८ मार्च रोजी 'होम मिनिस्टर-खेळ पैठणीचा', लकी ड्रॉ व बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. वरील सर्व कार्यक्रम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृह (टाऊन हॉल) येथे होणार आहेत. तरी सर्व महिलांनी उत्स्फूर्तपणे भाग घेऊन सहभाग नोंदवावा, असे आवाहन डॉ. सुधीर गवळी यांनी केले आहे.




# राजकीय अस्तित्वासाठी परिचारक समर्थकांचा पोटशूळ

परिचारक समर्थक साईडहिरोंची उगाचच टिवटिव; समाजात मात्र या साईड हिरोंना झिरो किंमत; तर आम्हीही जशास तसे उत्तर देवू-विठ्ठल परिवाराचा इशारा



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.४ मार्च -**

पंढरपुर येथे तब्बल आठ वर्षानंतर पार पडलेल्या आमसभेवरून समाज माध्यमांवरून आमसभेच्या अध्यक्षाविरोधात आणि उपस्थित आमदारांविरोधात परिचारक समर्थकांकडून आक्षेप नोंदवण्यात आले होते. यानंतर सोमवारी माजी आमदार प्रशांत परिचारक समर्थकांनी पत्रकार परिषद घेऊन आमसभेचा निषेध करत आ. अभिजीत पाटील, आ राजू खरे यांच्यावर केलेल्या आरोपानंतर मंगळवारी आमदार अभिजीत पाटील समर्थकांनी पत्रकार परिषद घेऊन परिचारक समर्थकांचा चांगला समाचार घेतला.

आमदार अभिजीत पाटील समर्थकांच्या पार पडलेल्या पत्रकार परिषदेत मागील अनेक वर्षांपासून सामान्य नागरिकांना प्रश्न मांडण्यासाठी आमसभा घेण्यात आली नाही. आठ वर्षानंतर आमसभा घेऊन आमदार अभिजीत पाटील यांनी सर्वसामान्य नागरिकांना प्रश्न मांडण्याची संधी दिली.सदर आमसभा जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने आमसभेचा अध्यक्ष निवडून नियमानुसार घेण्यात आली. आमसभेसाठी ४० हुन अधिक खात्याचे अधिकारी उपस्थित होते. यामध्ये सर्वसामान्य नागरिकांचे अनेक प्रश्न मार्गी लागल्यामुळे आमसभेने चारही आमदारांचा अभिनंदनचा ठराव मांडला. मात्र परिचारक समर्थकांनी आपले अस्तित्व संपत चालल्याने आमसभेचा निषेध करून आपले राजकीय अस्तित्वाला धोका निर्माण होत असल्याने पोटशूळ उठला असल्याचे दाखवून दिले आहे. आधी त्यांनी मागील पंचवीस वर्षात काय काम केले ते सांगावे. त्यांनी संस्थांची वाट लावली असल्याची टीका आमदार अभिजीत पाटील समर्थकांनी केली.या पत्रकार परिषदेस माजी नगराध्यक्ष सुभाष भोसले, किरणराज घाडगे, संदीप मांडवे, नागेश गंगेकर, अनिता पवार, अमर सूर्यवंशी, प्रशांत शिंदे, तुकाराम मस्के, महादेव तळेकर,गणेश ननवरे, विशाल आर्वे आदी विठ्ठल परिवारातील पदाधिकारी तसेच नेते मंडळी उपस्थित होते.

### ▸▸ पालिकेवर २५ वर्षे सत्ता असताना परिचारकांनी काय केले

यावेळी माजी बोलताना माजी नगराध्यक्ष सुभाष भोसले म्हणाले की आठ वर्षानंतर शासकीय नियमानुसार आमसभा पार पडली. यामध्ये ग्रामीण आणि शहरातील प्रश्न मांडण्यात आले. जास्तीत जास्त ग्रामीण भागातील नागरिकांना प्रश्न मांडण्याची संधी दिली गेली. महिलांनाही प्रश्न मांडण्याची संधी मिळाली. यामुळे अनेक प्रश्न मार्गी लागले. शहरात लवकरच नगरपालिकेचे दवाखाने, सर्व शाळा सुरू होतील. पाण्यावर अधिकचा टॅक्स लागणार नाही. या आमसभेत शहरातील सुरू असलेल्या ११ रस्त्यांबाबत प्रश्न उपस्थित केल्याने आणि आपले राजकीय अस्तित्वाला धोका निर्माण होऊ लागल्याने परिचारक समर्थकांनी अधिकाऱ्यांना पाठीशी घालत आमसभेचा निषेध केला आहे असा आरोप करत मागील अनेक वर्षांपासून नगरपालिकेवर प्रशासक असल्याने त्यांना बोलण्याचा अधिकार नाही असा सवाल उपस्थित करत त्यांनी १८० कोटी नगरपालिकेचे वार्षिक बजेट असताना यावर नागरिकांनी बोलू नये का? शहरातील नागरिक कर भरत आहेत. मात्र अनेक वर्षांपासून शहरातील नगरपालिकेचे दवाखाने बंद,बागा बंद, क्रीडांगण नाहीत. रस्त्याची दुरावस्था झाली आहे, शहरात धुळीचे साम्राज्य पसरले आहे. नगरपालिकेवर २५ वर्ष परिचारक पार्टीची सत्ता असताना काय केले ते सांगा असा प्रतिसावाल केला.

### ▸▸ आमदार आवताडेंनी आमसभा घेवून दाखवावी

यावेळी बोलताना किरण घाडगे यांनी नागरिकांना दूषित पाणी पुरवठा होत आहे. शहरात सुरू असलेल्या कामांमध्ये कमिशन जास्त घेतले जात असल्याने निकृष्ट दर्जाचे काम होत आहेत. एकाच ठेकेदाराला वारंवार काम दिले जात आहे. असा आरोप करत. यावर बोलण्याचा अधिकार नाही का? असा सवाल उपस्थित केला. याबाबत शहरातील नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी धाडस दाखवून आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर शहरात आमसभा घ्यावी अशी मागणी केली.

### ▸▸ मालकशाही उध्दवस्त करण्यासाठी नव्हे तर जनतेच्या प्रश्नासाठी आमसभा

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे पदाधिकारी संदीप मांडवे म्हणाले की मालकशाही उध्वस्त करण्याच्या उद्देशाने आणि नगरपालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून आमसभा घेण्यात आली नव्हती तर ती जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी होती. मात्र विरोधक काहीही बोलत आहेत. एक महिन्यांपूर्वी आमसभा घेण्याचे आदेश अधिकाऱ्यांना आले होते.तरी देखील नागरिकांच्या प्रश्नांवर त्यांना उत्तर देता आले नाही. काही अधिकारी गैरहजर होते. याचा निषेध विरोधकांनी केला पाहिजे होता. मात्र ते अधिकाऱ्यांना पाठीशी घालत आहेत. आ.अभिजीत पाटील यांनी पंढरपूर तालुक्याशी संबंधित चारही आमदारांना एकत्र आणल्याने त्यांना दुःख झाले असेल अशी मार्मिक टीका करत आम्ही कोणालाही टार्गेट करत नाही परंतु आमच्या नेत्यांवर खालच्या भाषेत टीका केली तर जशास तसे उत्तर देऊ असा इशारा दिला.

### ▸▸ मालकप्रेमी साईडहिरोंना, समाजात मात्र किंमत झिरो

यावेळी विठ्ठलचे संचालक तुकाराम मस्के म्हणाले की ऊस दरावर प्रश्न विचारण्यात आले, आमसभेचा निषेध करण्यात आला, मात्र विरोधकांना माहीत नाही की आ.अभिजीत पाटील यांनी जिल्ह्यात सर्वात जास्त आत्तापर्यंत गळीत हंगामाचे २ हजार ८०३ रुपये पहिल्या हप्त्यापोटी सर्व शेतकऱ्यांना देण्याचे काम केले आहे. पुढील काळात सर्व जाहीर केलेला दर मिळेल. मात्र परिचारकांच्या भोवती साईडहिरोची भूमिका बजावणारे उगाच टीवटीव करीत आहेत. खरेतर मालकप्रेमी या साईडहिरोना समाजात मात्र किंमत झिरो असल्याची टिका यावेळी त्यांनी केली.

## गोयेगाव ते आगोती पुलासाठी अर्थसंकल्पात निधीची तरतूद करा

दिग्विजय बागल यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या भेटी दरम्यान केली मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि. ४ मार्च-**

इंदापूर व करमाळा तालुक्यातील दळणवळण व्यवस्था मजबूत करण्यासाठी गोयेगाव (ता. करमाळा) ते आगोती (ता इंदापूर) दरम्यान उजनी जलाशयात पूल करण्यासाठी अर्थसंकल्पात निधीची तरतूद करावी, अशी मागणी शिवसेना नेते दिग्विजय बागल यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सह्याद्री अतिथीगृह मुंबई येथे निवेदनाद्वारे केली आहे.

करमाळा व इंदापूर तालुयातील नागरीकांना हाकेच्या अंतरावरील गावात जाण्यासाठी भिगवण टेंभुर्णी मार्गे ९० ते १०० किमी प्रवास करावा लागतो. त्यामुळे पैसे व वेळेची बचतीसाठी होडीतून जीवघेणा प्रवास करावा लागतो.परिनामी ५०हून अधिक जनांना यामध्ये जलसमाधी मिळाली आहे. उजनी धरणाच्या निर्मितीनंतर या भागात केळी, डाळींब, ऊस व इतर फळबागांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे हा परिसर फृट व शुगर बेल्ट म्हणून ओळखला जातो. उजनी जलाशयावर देशी विदेशी पक्षी हजेरी



लावत असल्याने पक्षीप्रेमी मोठ्या प्रमाणात या परिसरात येत असतात कृषि पर्यटन, मासेमारी,साखर उद्योग, वनस्पती अभ्यास,नौकाविहार, जलपर्यटन यांना चालना देण्यासाठी गोयेगाव ते आगोती दरम्यान भीमा नदीवर पूल बांधण्याची गरज आहे.आगोती ते गोयेगाव भीमा नदीचे अंतर कमी असून दोन्ही किनाऱ्या पर्यंत रस्ते उपलब्ध आहेत.त्यामुळे जमीन संपादनाची आवश्यकता नाही. दोन्ही बाजुकडुन तीनशे तीनशे मीटर पर्यंतचे भराव आणि मुख्य नदी पात्रात पूल झाल्यास येथील विकासाला निश्चित चालना मिळेल असे दिलेल्या निवेदनात नमुद केले आहे



## आर्या महाविद्यालयात सृजनोत्सवाचा जल्लोष

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ४ मार्च-**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न आणि विठ्ठल प्रतिष्ठान (टें) संचलित आर्या कृषी महाविद्यालयात दिनांक २४ ते २६ फेब्रुवारी दरम्यान सृजनोत्सव २०२५ उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने सांस्कृतिक, क्रीडा आणि कला अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. महोत्सवाच्या उद्घाटन समरंभात महाविद्यालयाचे प्रा.डॉ. नितीन उबाळे अध्यक्षस्थानी होते.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या शालेय जीवनात कलागुणांना वाव देण्याचे आणि आत्मविश्वास वाढवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. पहिल्या दिवशी सांस्कृतिक दिन साजरा करण्यात आला, जिथे विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून नृत्य, गायन आणि विविध कलागुणांचे सादरीकरण केले. भारताच्या समृद्ध संस्कृतीचे दर्शन घडवत विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. दुसऱ्या दिवशी क्रीडा दिन पार पडला. यामध्ये क्रिकेट, बॅडमिंटन, रस्सीखेच ई. विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत उत्कृष्ट प्रदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या खेळाडूवृत्तीला चालना देत, प्राचार्यांनी निरोगी जीवनशैली अंगीकारण्याचा संदेश दिला. महोत्सवाच्या समारोप सोहळ्यात मराठी आणि हिंदी सिनेसृष्टीवरील विविध कार्यक्रम, अंताक्षरी आणि शेले पागोटे यांसारख्या मनोरंजक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

विजेते संघ व उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील प्रा. संदीप मुरूमकर, प्रा. तुषार नामदे, प्रा. डॉ. तृप्ती राठोड, प्रा. खंडेराव वाघे, प्रा. ज्ञानेश्वरी झोळ, प्रा. अमोल माळी, प्रा. हनुमंत निगुडे तसेच कुमार शिंदे व रोहित घळके उपस्थित होते.

### भरधाव बुलेटच्या अपघातात एकाचा मृत्यू, एक जखमी

**बार्शी, दि. ४ मार्च-**

बार्शी तालुक्यातील देवगाव शिवारात २४ फेब्रुवारी रोजी सकाळी झालेल्या मोटारसायकल अपघातात अक्षय बापू बोराडे (वय ३२, रा. अंतरगाव, ता. परंडा, जि. धाराशिव) याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर पोपट रोहिदास सातव (वय ४०, रा. डोणगाव, ता. जामखेड, जि. अहमदनगर) जखमी झाला आहे.

अपघात हा बार्शी-भूम रोडवरील चांदणी नदीच्या पुलावर झाला. अक्षय बोराडे हा त्याच्या ताब्यातील बुलेट मोटारसायकल (MH 25/R 5181) भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालवत असताना त्याचे नियंत्रण सुटले. त्यामुळे तो राँग साइडला जाऊन समोरून येणाऱ्या मोटारसायकलला (MH 14/CT 0184) धडकला. या अपघातात अक्षय बोराडे गंभीर जखमी झाला आणि उपचारासाठी भगवंत हॉस्पिटल, बार्शी येथे दाखल असताना २५ फेब्रुवारी रोजी दुपारी ४.११ वाजता त्याचा मृत्यू झाला. तसेच, पोपट सातव हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरु आहेत. या अपघातात दोन्ही मोटारसायकलींचे मिळून अंदाजे १५,००० रुपयांचे नुकसान झाले असल्याचे फिर्यादी पो.हे कॉन्टेबल आर.

## बार्शीत धनंजय मुंडे यांच्या प्रतिमेस जोडेमारो आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ४ मार्च,**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या झाली होती. आता या हत्येचे फोटो समाज माध्यमात व्हायरल झाले. समाजात आरोपीविरुद्ध संताप व्यक्त होत आहे. यातील प्रमुख आरोपी हे आ. धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय आहेत. त्यामुळे आ. धनंजय मुंडे यांच्याबद्दलही समाजातून टीका व संताप व्यक्त होत आहे. अखंड मराठा समाज वैराग-बार्शी शहर व तालुका यांच्यावतीने मंगळवारी दुपारी तहसील कार्यालयासमोर धनंजय मुंडे यांचा निषेध करत प्रतिमेला जोडे मारण्यात आले.




मुंडे यांचाच आरोपींना वरदहस्त होता, असा आरोप करत चौकशी होवून कारवाई व्हावी. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचा खून खटला फास्ट ट्रॅकमध्ये चालवावा. जेणेकरुन या खटल्याचा निकाल लवकरात लवकर लागेल. सरपंच संतोष देशमुख व त्यांच्या कुटुंबियांना न्याय मिळेल. त्याचबरोबर कायद्याचा धाक महाराष्ट्रातील सर्व गुंड प्रवृत्तीच्या लोकांना बसेल. सरपंच संतोष देशमुख, सोमनाथ सूर्यवंशी, स्वारगेट बस स्थानकामधील बलात्कार प्रकरण यामुळे राज्याची कायदा व सुव्यवस्था प्रचंड ढासळलेली आहे. ही सर्व परिस्थिती कायद्याचा व गृह विभागाचा धाक राहिला नसल्यामुळे झाली आहे. त्यामुळे राज्याचे गृहमंत्री व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारुन गृहमंत्री या पदाचा राजीनामा द्यावा, अशा आशयाची मागणी यावेळी अखंड मराठा समाज वैराग-बार्शी शहर व तालुका यांच्यावतीने करण्यात आली. यावेळी आनंद काशीद, बालाजी डोईफोडे यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते. नायब तहसीलदार संजीवन मुंडे यांनी निवेदन स्वीकारले.



## माण नदीवरील सर्व बंधारे भरून द्यावेत

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटलांचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ४ मार्च-**

सध्या टेंभूचे आवर्तन सुरू असून पिण्याच्या पाण्यासाठी, पशुधनासाठी टेंभू योजनेतून माण नदीवरील सर्व बंधारे त्वरित भरून द्यावेत असे आदेश जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रशासनाला दिले असल्याची माहिती आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी दिली.

टेंभू योजनेच्या उन्हाळी आवर्तनाचे नियोजन करण्यासाठी मुंबई येथे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या समवेत मंगळवार दि.४ मार्च रोजी बैठक पार पडली. यावेळी आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्यासह प्रशासनाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. खवासपूर ते मेथवडेपर्यंतचे सर्व बंधारे पुरेशा पाण्याने भरून द्यावेत. टेंभूच्या आवर्तनाचे पाणी सर्व गावांना व्यवस्थित देऊन माण नदीवरील सर्व बंधारे त्वरित भरून द्यावेत. त्याचप्रमाणे पाणी आवर्तनात होणारी पाणीगळती टाळण्याच्या दृष्टीनेही जलसंपदा विभागाने उपायोजना कराव्यात, अशा सूचना राज्याचे जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांनी दिल्या असल्याची माहिती आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी दिली.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## संतोष देशमुख हत्या प्रकरण : शिवसेनेचे परंड्यात आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.४ मार्च -**

मस्साजोगचे सरपंच स्व . संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना व टोळीचा प्रमुख वाल्मीक कराड याला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे या मागणीसाठी परंडा येथे दि.४ मार्च रोजी करमाळा रोड बावची चौक या ठिकाणी शिवसेना पक्षाच्या वतीने वाल्मीक कराड यांच्या प्रतिमेस जोडो



मारो आंदोलन करण्यात आले.

सर्व आरोपींना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे अशा घोषणा यावेळी शिवसेना पक्षाच्या वतीने देण्यात आल्या. यावेळी शिवसेना पक्षाचे जिल्हाप्रमुख दत्ता साळुंके, शिवसेना नेते धनंजय सावंत, संपर्कप्रमुख प्रा. गौतम लटके, अण्णासाहेब जाधव, जाकिर सौदागर, राहुल डोके, सुभाषसिंह सद्दिवाल, बालाजी नेटके, पोपट चोबे, गुलाब शिंदे, बाळासाहेब गायकवाड, दत्ता रणभोर आदिसह शिवसेना पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


## संक्षिप्त वृत्त...



### बारुळ फेस्टीवलची सांगता

**तुळजापूर, दि.४ मार्च -**

तालुक्यातील बारूळ येथे महाशिवरात्रीचे औचित्य साधून ग्रामदैवत श्री बाळेश्वराच्या यात्रेनिमित्त राज्यस्तरीय नृत्य स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत गोवा, मुंबई, पुणे, अकलुज, बीड, लातुर, नाशिक, सातारा सह धाराशिव जिल्ह्यातील नृत्य कलाकारांनी समुह नृत्य, लावणी, सह युगल नृत्य सादर करून कार्यक्रमास बहार आणली होती. प्रथम प्रमुख पाहुण्याच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा बसवेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सतिश दंडनाईक, सचिन पाटील, आनंद कंदले, गुरूनाथ बडूरे, किरण खपले, रोहीत पडवळ, अभिषेक कोरे, धनंजय पवार, शेट्टीबाबा नारायणकर, सुभाश पाटील, बाबुराव यावलकर, राजकुमार मधुकर वट्टे, दत्ता वट्टे यांच्या हस्ते झाले. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातुन आलेल्या कलाकारांनी एक से बढकर एक अशी नृत्ये सादर करून प्रेक्षकांचीं मने जिंकली.

### ॲड. मैना वडणे यांची निवड

**मंगरूळ, दि.४ मार्च -**



तुळजापूर तालुक्यातील बाभळगाव येथील संत तुकाराम सामाजिक संस्थेच्या वतीने दिला जाणारा २०२५ चा जिल्हा स्तरीय आदर्श नारी जीवन गौरव पुरस्कार कुंभारी (ता. तुळजापूर) येथील ॲड. मैना वडणे यांना जाहीर झाला आहे. ॲड. मैना वडणे या गेल्या तीन वर्षांपासून बालकल्याण समितीच्या माध्यमातून अनाथ, एकल, बेघर बालकांच्या काळजी व संरक्षणाची गरज ओळखून कार्य करीत आहेत. हा पुरस्कार सोहळा तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येथील आपलं घर बालगृह येथे संपन्न होणार आहे.

### ११ वर्षीय चिमुकलीने केला रोजा

**इटकळ, दि.४ मार्च -**



तुळजापुर तालुक्यातील इटकळ येथील इयत्ता पाचवी मध्ये शिकत असलेली हुमेरा हुसेन मकानदार या अकरा वर्षीय चिमुकलीने केला पहिलाच रोजा उपवास केला. रमजान महिन्यास रविवार दि.२ मार्च रोजी प्रारंभ झाला. या महिन्यात तमाम मुस्लिम बांधव उत्साहाने व धार्मिक परंपरा जपत हा एक महिन्याचा रोजा उपवास करतात. पहाटे सहेरी केल्या नंतर दिवसभर न खाता पाणी ही न पिता हा उपहास करून सायंकाळी नमाज अदा करून उपहास सोडतात. इटकळ येथील इयत्ता पाचवीमध्ये शिकत असलेली अकरा वर्षीय लहान चिमुकली हुमेरा हुसेन मकानदार हिने पहिला रोजा धरल्याचे तिची सर्वत्र कौतुक होत आहे.

## मंगरूळ येथील संत गाडगेबाबा आश्रम शाळा समस्यांचे माहेरघर...

# वेतन बिलांपासून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेपर्यंत गंभीर प्रश्न; शिक्षक, कर्मचाऱ्यांत संताप

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथील संत गाडगेबाबा आश्रम शाळा सध्या विविध समस्यांमुळे चर्चेत आली आहे. मुख्याध्यापकांच्या कार्यशैलीमुळे शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून, वेतन रोखल्याचा मुद्दा अधिक तीव्र झाला आहे. मुख्याध्यापकाने कायदेशीर अधिकार नसतानाही वेतन बिलांची सादरीकरण प्रक्रिया पार पाडल्याचा आरोप आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन मिळत नसून त्यांना आंदोलन करण्यास प्रवृत्त केले जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

शाळेतील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे वेतन गेल्या काही महिन्यांपासून रखडले आहे. ही प्रक्रिया योग्य अधिकाऱ्याच्या सहीने केली जाते, मात्र, मुख्याध्यापकाने अधिकार नसतानाही वेतन बिलांची सादरीकरण प्रक्रिया पार पाडल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे समाजकल्याण विभागाने या बिलांवर आक्षेप घेतला आणि वेतन प्रक्रिया थांबवली.

परिणामी, कर्मचारी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या शाळेत विद्यार्थ्यांना मारहाणीच्या घटनाही घडल्याचे समोर आले होते. काही दिवसांपूर्वीच शाळेतील काही विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षा देण्यात आल्याची तक्रार पालकांनी केली होती. काही पालकांनी तर थेट प्रशासनाकडे जाऊन मुख्याध्यापकांविरोधात तक्रार दाखल करण्याची मागणी केली आहे. या संपूर्ण प्रकारामुळे शाळेतील वातावरण अधिकच तापले आहे. शाळेतील कर्मचारी आणि शिक्षकांनी वेतन त्वरित मिळावे, वेतन प्रक्रिया नियमीत करावी आणि विद्यार्थ्यांवरील अन्याय थांबावा, अशी मागणी केली आहे. प्रशासनाने या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

समाजकल्याण विभागाने या संपूर्ण प्रकरणाची दखल घेतली असून, वेतन प्रक्रियेत अनियमितता झाली का, याचा तपास सुरू केला आहे. तसेच, विद्यार्थ्यांवरील शारीरिक शिक्षेच्या तक्रारींचीही चौकशी केली जात आहे.

शाळा ही शिक्षणाचे मंदिर असते, मात्र मंगरूळ येथील संत गाडगेबाबा आश्रम शाळा विविध समस्यांमुळे चर्चेत आली आहे. शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी हे सगळेच अडचणीत असून, प्रशासनाने त्वरित योग्य पावले उचलण्याची गरज आहे. अन्यथा हा वाद आणखी चिघळण्याची शक्यता आहे.

> शाळेकडून मुख्याध्यापकाची नेमणूक नसल्याने संवितरण अधिकारी ठरविणे योग्य होत नाही. संस्थेतील अंतर्गत वाद असल्याने वेतन बीलावर निर्णय घेणे कायदेशीर बाबीत बसत नाही. तसेच ही आर्थिक बाब असल्याने शासनाची फसवणूक होवू नये यासाठी खबरदारी घेतली जात आहे. संस्थेने अंतर्गत वाद मिटवून कायदेशीर संवितरण अधिकारी नेमावा. वेतन त्वरीत काढण्यात येईल.
>
> **- सुनील खमितकर,** समाज कल्याण अधिकारी

### मुख्याध्यापकाचे पत्र अन् कर्मचाऱ्यांना त्रास?

अधिकाऱ्यांनी वेतन रोखल्याने शिक्षक आणि कर्मचाऱ्यांमध्ये रोष निर्माण झाला आहे. मात्र, सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे हा प्रश्न मार्गी लागू नये म्हणून मुख्याध्यापकानेच कर्मचाऱ्यांना आंदोलन करण्यास प्रवृत्त केल्याचा आरोप आहे. या प्रकरणामुळे शिक्षकांमध्ये संभ्रम आणि संताप दिसून येत आहे. तसेच हे वेतन करु नये असे पत्रच समाजकल्याण अधिकाऱ्यांना मुख्याध्यापकाने दिल्याचे एका कर्मचाऱ्याने सांगितले.

## वर्ग दोनच्या जमीनीसाठी एकदाच नजराना भरण्यास अखेर शासनाचे आदेश

### आ. कैलास पाटील यांची मागणीला यश...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मार्च**

भोगवाटादार वर्ग-दोनचे रुपांतर वर्ग-एक मध्ये हस्तांतरण करताना संबंधीताकडुन शर्तभंगचा नजराणा फक्त एकाच वेळी भरण्याची मागणी हिवाळी अधिवेशनावेळी आमदार कैलास पाटील यांनी सभागृहात केली होती. त्याची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत स्पष्ट निर्णय दिला. या निर्णयानंतर सोमवारी त्याचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आल्याने आमदार कैलास पाटील यांनी त्याचे स्वागत केले आहे.

इनाम जमिनीच्या मदतमाश या प्रकारातील भोगवाटदार वर्ग-दोन जमीनीचे रुपांतर वर्ग-एक मध्ये करण्यासाठी शर्तभंग नजराणा पाच टक्के इतका घेण्याबाबतचे विधेयक १७ डिसेंबर २०२४ रोजी विधानसभेत मांडण्यात आले. या विधेयकावर चर्चा करताना आमदार पाटील यांनी त्यात सुधारणा सुचवली होती. एकाच जमीनीचे हस्तांतर अनेकवेळा झालेले असल्यास अध्यादेशामधील संदिग्धतेचा आधार घेऊन अधिकारी जेवढ्या वेळेस शर्तभंग झाला असेल तेवढया वेळेस नजराणा रक्कम भरावी लागेल असे संबंधीतांना सांगत आहेत. त्यामुळे जमीनीचे हस्तांतर कितीही वेळा झाले.

तरी शर्तभंगाची नजराणा रक्कम एकाच वेळी भरुन घ्यावी अशी मागणी त्यांनी केली होती. यावर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्वतः सभागृहाला आश्वासीत केले होते की शर्तभंग कितीही वेळा झाला असता तरी एकाच वेळी पाच टक्के नजराना रक्कम भरुन ही जमीन वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्यात येईल.दिलेल्या अश्वासनानुसार उशीरा का होईना महसुल विभागाकडुन शासन आदेश निर्गमित केला आहे.

## उपजिल्हा रुग्णालयात आयसीओ सुविधा उपलब्ध देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ मार्च**

श्री क्षेत्र तुळजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये जास्तीत जास्त आयसीओ व्यवस्था खास बाब म्हणुन मंजुरी मिळण्याची मागणी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे शिवसेनेचे (उद्धव ठाकरे गट) उपजिल्हाप्रमुख शाम पवार यांनी केली आहे. येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये आयसीओ व्यवस्था खास बाब म्हणुन मंजुरी देण्याची मागणी केली आहे.

## महिला दिनानिमित्त छावा चित्रपट मोफत शोचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ मार्च**

शहरातील पुजारी नगर फाऊंडेशनच्या वतीने यंदा प्रथमच आयोजन जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विविध उपक्रमासह विशेष छावा चित्रपट शोचे आयोजन करण्यात आले आहे.

पूजारी नगर फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी यांच्या सौभाग्यवती शुभांगी पुजारी नेतृत्वात जागतिक महिला दिन विशेष उपक्रम आयोजित



करण्यात आले आहेत. शहरातील कर्तृत्ववान महिलांसह पुजारी नगर सोसायटी परिसरातील नौकरदार महिलांचा सन्मान करण्यात येणार आहे. अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या संघर्षमय जिवनपटावर निर्मिती झालेल्या शूरवीरगाथा छावा या चित्रपटाचा विशेष शोचे मोफत आयोजन रविवार ९ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता श्रीनाथ लॉन्स नळदुर्ग रोड येथे करण्यात आले आहे.

तरी जास्तीत जास्त महिलांनी उपस्थित राहून छावा चित्रपट पहावा, असे अवाहन शुभांगी पुजारी यांनी केले आहे.

## आ. तानाजी सावंतांवर बिनबुडाचे आरोप करु नये : दत्ता साळुंके

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.४ मार्च -**

परंडा मतदारसंघाचे आमदार तथा शिवसेना नेते माजी आरोग्यमंत्री प्रा.डॉ. तानाजी सावंत यांच्यावर जे विरोधकांनी बेछुटपणाने आरोप करून त्यांना वेगवेगळ्या गोष्टीने टारगेट करणे त्यांना जास्तीत जास्त त्रास कसा होईल या दृष्टिकोनातून विरोधकांचे जे प्रयत्न चालू आहेत. त्या अनुषंगाने विरोधकांना उत्तर देण्यासाठी आज दि.४ मार्च रोजी शिवसेना पक्षाच्यावतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

पत्रकार परिषदेत बोलताना दत्ता अण्णा साळुंखे म्हणाले महाराष्ट्र शासनामध्ये ज्यावेळी आरोग्य मंत्री तानाजी सावंत हे आरोग्य मंत्री म्हणून कामकाज पाहायला लागले. त्यावेळी त्यांनी अशा काही संकल्पना आणल्या सर्वसामान्य लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीने फार महत्त्वाच्या आहेत. सावंत यांच्या बत्तीस हजार कोटीच्या कामावर कुठली स्थगिती नाही अशी माहिती देत दत्ता साळुंखे यांनी विरोधकावर व रोहित पवारावर जोरदार टीका केली असून त्यांनी



सावंतांवर बिनबुडाचे आरोप करणे बंद करावे नसता जशास तसे उत्तर देऊ व विरोधक उबाठा पक्ष आणि रोहित पवार यांना रस्त्यावर फिरू देणार नाही, असा इशारा पत्रकार परिषदेमधून दिला आहे.

यावेळी प्रा. गौतम लटके, जाकीर सौदागर, अण्णासाहेब जाधव, सुभाषसिंह सद्दीवाल, राहुल डोके, बालाजी नेटके, पोपट चोबे, गुलाब शिंदे, बाळासाहेब गायकवाड, दत्ता रणभोर आदिसह शिवसेना पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

### सलग दुसऱ्या वर्षी मुलींसाठी उत्कृष्ट कार्याचा गौरवशाली सन्मान...

## तुळजाई प्रतिष्ठानला राज्य शासनाचा 'बालस्नेही पुरस्कार'




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मार्च -**

माणुसकीची सावली बनून निराधार मुलींचे जीवन उजळवणाऱ्या तुळजाई प्रतिष्ठान बहुउद्देशीय संस्था, पानगाव (ता. कळंब), या संस्थेचा सलग दुसऱ्या वर्षी राज्य शासनाच्या बालस्नेही पुरस्कार २०२४ ने सन्मान करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या वतीने दिला जाणारा हा मानाचा पुरस्कार उत्कृष्ट विशेषगृह या नामांकन प्रकारात छत्रपती संभाजी नगर विभागातून तुळजाई प्रतिष्ठानला महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्य मंत्री, महिला व बालविकास मेघना बोर्डीकर, राज्यमंत्री, गृहनिर्माण ना.डॉ. पंकज भोयर, आ. मनिषा कायंदे, डॉ. प्रशांत नारनवरे, आ. संजय केळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. ३ मार्च रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये पुरस्काराने प्रतिष्ठानचा गौरव करण्यात आला.

समाजातील दुर्लक्षित, मानसिकदृष्ट्या अस्थिर आणि बेवारस स्थितीत सापडलेल्या १२१ अनाथ मुलींच्या संगोपन, शिक्षण आणि पुनर्वसनासाठी अहोरात्र समर्पित असलेल्या या संस्थेचे कार्य खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आहे.

यावेळी पुरस्कार स्वीकारताना संस्था सचिव शहाजी चव्हाण, मुख्याध्यापक गुरूनाथ थोडसरे, रेणुका कुदळे, सोनाली मिटकरी व व्यंकट देवकर हे उपस्थित होते. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल तुळजाई प्रतिष्ठानचे कौतुक होत आहे.

## अंकुरम विद्यामंदिरचा वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम अंकुरोत्सव २०२५ उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.४ मार्च**

शिवाजी ज्ञानविहार शिक्षण मंडळ, वाशी संचालित अंकुरम विद्या मंदिरचे वार्षिक स्नेहसंमेलन आणि सांस्कृतिक कार्यक्रम अंकोरोत्सवमध्ये नर्सरी ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या नृत्य, नाट्य आदींच्या सादरीकरणाने उपस्थितांची भरभरून दाद मिळविली. विद्यार्थ्यांसह शिक्षकांत मोठा उत्साह होता. तो त्यांनी सादर केलेल्या विविध गुण दर्शनातून व्यक्त झाला. या वेळी चिमुरड्यांनी सादर केलेल्या विविध नृत्य, नाट्य व गाण्यांना उपस्थितांकडून प्रतिसाद मिळाला.

प्रमुख पाहुणे निवृत्त पोलिस उपअधीक्षक गोविंदराव पवार, गटशिक्षणाधिकारी सोमनाथ घोलप, केंद्र प्रमूख कैलास चौधरी उपस्थिती होते. प्रमुख पाहुणे गोविंद पवार यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांपुढे अनेक आव्हाने आहे. त्यात टिकून राहण्यासाठी त्यांना मानसिकदृष्ट्या खंबीर बनविण्यासाठी संवादाची गरज आहे. आज अनेक माध्यमे असूनही दुर्दैवाने पालक व मुले संवादापासून दूर असल्याची खंत व्यक्त केली. शिवाजी ज्ञानविहार शिक्षण मंडळचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विनोद पवार यांनी शिक्षण ही केवळ परिक्षांपुरती मर्यादित गोष्ट नाही, तर ती जीवनातील प्रत्येक क्षेत्रात यश मिळवण्याचा एक मार्ग आहे. आपल्या शाळेतील विद्यार्थी केवळ अभ्यासातच नव्हे, तर संस्कार, सामाजिक जबाबदारी आणि स्वावलंबन यांचा अवलंब करत आहेत, त्याच बरोबर विद्यार्थ्यांमध्ये २१ व्या शतकातील जीवन कौशल्य विकसित करण्यासाठी शाळा आणि शिक्षक प्रयत्न करत असल्याची माहिती दिली.

कार्यक्रमास संस्थेच्या उपाध्यक्ष केशर पवार, सचिव रोहिणी पवार, विकास पवार, विनोद माने, सविता माने, प्राचार्य संतोष चाको, पूजा सावंत यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नळदुर्ग-अक्कलकोट रस्त्याच्या कामाला मिळणार पुन्हा गती

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ मार्च**

आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नामुळे सुरु झालेल्या नळदुर्ग-अक्कलकोट रस्त्याच्या दुरुस्तीचे काम अंतीम टप्प्यात आले असुन या कामामुळे या रस्त्यावरील १० पेक्षा जास्त गावांतील नागरीकांचा खराब रस्त्यामुळे सुरु असलेला वनवास संपणार आहे. हे काम पुर्ण झाल्यानंतर पुन्हा एकदा पुर्वीसारखी नळदुर्ग-अक्कलकोट वाहतुक जोमात सुरु होणार आहे.

गेल्या अनेक वर्षांपासुन नळदुर्ग-अक्कलकोट रस्त्याचे काम शेतकरी आणि प्रशासन यांच्या वादात रखडत पडले होते. शेतकऱ्यांनी आपल्या शेतजमिनीचा मावेजा मिळावा यासाठी या कामाला विरोध करुन याप्रकरणी न्यायालयात याचिकाही दाखल केली आहे. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासुन या रस्त्याचे काम बंद पडले होते. त्याचबरोबर या रस्त्यावरील येडोळा, वागदरी, गुजनुर, शहापुर, दहिटना, गुळहळ्ळी, निलेगाव, पाटील तांडा, खुदावाडी आणि देवसिंगा (नळ) या गावांतील नागरीकांनाही या खराब रस्त्याचा कमालीचा त्रास होत होता. आ. पाटील यांनी नळदुर्ग-अक्कलकोट रस्ता सध्या अस्तित्वात व वापरात असलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम व्हावे यासाठी प्रयत्न केले आणि त्यांच्या प्रयत्नाला यश आले.

## लाईनमन दिनानिमित्त कर्मचाऱ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ मार्च -**

नळदुर्ग येथील माजी नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते विनायक अहंकारी यांनी आज लाईनमन दिनाच्या निमित्ताने नळदुर्ग महावितरणच्या सर्व कर्मचाऱ्यांचा सत्कार करून त्यांचा गौरव केला.

दि.४ मार्च रोजी सर्वत्र लाईनमन दिवस साजरा करण्यात आला नळदुर्ग येथेही विनायक अहंकारी यांच्या संकल्पनेतुन लाईनमन दिनानिमित्त पहिल्यांदा वीज वितरण कंपनी कार्यालयातील लाईनमनचा सत्कार करण्यात आला.

यावेळी महावितरणचे कर्मचारी आर.एम. सोळंके, किशोर शिंदे, प्रसन्ना कदम, अजितकुमार कानडे, आंबादास काळे, सागर कौरव, विनोद चौधरी, सतीश घोडके, अमोल डोंगरे, महेश जाधव, रवी चव्हाण, आकाश डुकरे, तुषार गायकवाड, श्रीराम जाधव, योगेश सुरवसे, प्रशिक बनसोडे, कुणाल पवार, रीतेश सोनकांबळे, उदभाळे मारुती या कर्मचाऱ्यांचा अहंकारी व सर्व मान्यवर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## बोगस डॉक्टरकडून रुग्णांची फसवणूक; नळदुर्ग पोलिसांकडून कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मार्च**

कोणत्याही वैद्यकीय पदवी अथवा मान्यता नसतानाही रुग्णांवर उपचार करत पैसे उकळणाऱ्या एका बोगस डॉक्टरविरुद्ध नळदुर्ग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डॉ. निरापद अनिल बानर्जी (वय ६०, (रा. बोली, जि. सवाई माधोपुर, राजस्थान, सध्या ह.मु. उमरगा, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) असे आरोपीचे नाव असून, तो मागील पाच महिन्यांपासून अवैधपणे वैद्यकीय व्यवसाय करत असल्याचे उघडकीस आले आहे

तालुका आरोग्य अधिकारी डॉ.म.र. फीकोद्दीन म. कबीरोद्दीन अन्सारी (वय ५२, रा. धाराशिव) यांनी यासंदर्भात फिर्याद दिली. त्यानुसार, डॉ. बानर्जी यांनी कोणतीही अधिकृत वैद्यकीय पदवी नसताना, स्वतः ला डॉक्टर असल्याचे भासवून रुग्णांवर उपचार केले. तसेच, रुग्णांकडून उपचारांच्या नावाखाली पैसे घेत त्यांची फसवणूक केली. हा प्रकार जनतेच्या आरोग्यास व जिवीतास धोका निर्माण करणारा असल्याने प्रशासनाने



तातडीने कारवाई केली. डॉ. बानर्जी यांच्यावर भारतीय दंड संहिता कलम ३१९(२), ३१८(४), तसेच इंडियन मेडिकल कौन्सिल कायदा १९५८ च्या कलम १५ आणि महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टीसेस कायदा १९६१ च्या कलम ३३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोग्य विभाग व पोलिस प्रशासनाच्या संयुक्त तपासात, बानर्जी यांच्याकडे कोणत्याही अधिकृत संस्थेची वैद्यकीय पदवी नसल्याचे स्पष्ट झाले. तसेच, त्यांनी अनेक रुग्णांवर उपचार करून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात पैसे घेतले असल्याचे आढळले. या कारवाईमुळे परिसरातील बोगस डॉक्टरांविरोधात कडक कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

याप्रकरणी अधिक तपास नळदुर्ग पोलीस करत असून, नागरिकांनी अशा फसवणूक करणाऱ्या व्यक्तींच्या जाळ्यात न अडकता अधिकृत वैद्यकीय तज्ज्ञांकडूनच उपचार घ्यावेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.




नांदेड- शहरातील वाहतुक समस्या सोडविण्यासाठी पोलीसांसह महापालिकेने अतिक्रमण धारकांवर कारवाई करत अतिक्रमण हटवीले. जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाशकुमार, अप्पर पोलीस अधिक्षक सुरज गुरव, वाहतुक शाखेचे पोलीस निरिक्षक साहेबराव गुट्टे व महापालिकेच्या अतिक्रमण हटाव पंथकाने ही संयुक्त कारवाई केली.

## भावंडांनी ठेवला आयुष्यातला पहिला रोजा

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. ०४ मार्च**

अत्यंत पवित्र मानल्या जाणाऱ्या इस्लाम धर्मात महत्त्व प्राप्त असणाऱ्या रमजान महिन्यास प्रारंभ झाला असून तामसा रोडवर स्थायिक असलेले शेख.उबेद व शेख नवेद या दोन्ही भावांनी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा (उपवास) ठेवला असून एवढ्या रखरखत्या उन्हात एकीकडे अंगाची लाही - लाही होत असताना तब्बल तेरा तासच्या वरचा रोजा ठेवला असून त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रमंडळी, तसेच आजी - आजोबा जे की, सौदी अरेबिया येथे उमराहासाठी गेले आहेत त्यांच्याकडून पण शुभेच्छा व कौतुकाचा वर्षाव होत आहे. पत्रकार शेख जुनेद यांचे ते मुलं आहेत. २ मार्चपासून पवित्र रमजान महिन्याला सुरुवात झाली असून दिव्य कुराण याच महिन्यात



अवतरीत झाल्याने मुस्लिम बांधव या महिन्यात रोजा ठेवून अल्लाह प्रति आपली कृतज्ञता व्यक्त करत असतात. या महिन्यात मोठ्या भाव भक्तीने उपवास व नमाज अदा केली जाते तसेच दान ही मोठ्या प्रमाणावर होत असते. काही वर्षांपासून रमजान हे महिना भर उन्हाळ्यात येत आहे. सूर्योदय ते सूर्यास्त पर्यंत तब्बल १३ तासाचा उपवास असतो त्यातच शेख उबेद व शेख नवेद यांनी उपवास ठेवल्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### रेल्वे व्यवस्थापकांकडून पुन्हा आश्वासनाची खैरात...!

**उमरी**-हैदराबाद रेल्वे विभागाचे जनरल मॅनेजर अरुणकुमार जैन आणि डिविजनल रेल्वे मॅनेजर लोकेश वैष्णवी यांच्यासह रेल्वे विभागातील असंख्य अधिकाऱ्यांनी नुकतीच उमरीत येऊन रेल्वेस्थानकाची पाहणी केली. रेल्वे संदर्भात त्यांचे अधिकारी व संबंधितांना योग्य त्या सूचना दिल्या. रेल्वे प्रवाशांच्या समस्या जाणून घेतल्या. उमरीकरांनी दिलेले निवेदन घेतले. नवीन रेल्वे येथे थांबण्यासंदर्भात पुन्हा एकदा आश्वासनाची खैरात वाटली आणि निघून गेले. गेल्या अनेक वर्षापासून रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी येतात आणि निवेदन घेऊन जातात. मात्र आतापर्यंत उमरी रेल्वे स्थानकावर एकाही नवीन रेल्वे गाड्यांना थांबा मिळाला नसल्याने प्रवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. दरवेळी प्रमाणे यावेळी देखील अधिकाऱ्यांनी निवेदन घेतले आणि निघून गेल्याने नवीन रेल्वे गाड्यांना आता तरी थांबा मिळेल काय ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. रेल्वे संदर्भात समष्या सोडविण्यासाठी समितीवर गेलेले सदस्य देखील काहीच काम करीत नाहीत. मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्यात उमरी तालुक्याचा मोठा इतिहास आहे. क्रांतीवीरांचे गाव म्हणून उमरीची ओळख आहे. गोरठा येथील संतकवी दासगणू महाराज, उमरीतील संत सदानंद बाबा महाराज, ईकळीमाळ येथील संत श्री पर्वता महाराज यांचे संजीवन समाधीस्थळ या भागात आहे. या संदर्भात तसा फलक उमरी रेल्वेस्थानकावर लावण्यात आला आहे. केवळ फलक लावण्यात आला. मात्र गेल्या अनेक वर्षापासून उमरी रेल्वेस्थानकावर एकाही नवीन रेल्वे गाड्यांना थांबा देण्यात आला नाही. हे मात्र विशेष नगरसोल नरसापुर, अमरावती तिरुपती, विशाखापट्टणम, अजमेर, यासह अन्य नवीन रेल्वे गाड्यांना थांबा मिळावा अशी गेल्या अनेक वर्षापासूनची मागणी आहे. परंतु दरवेळी आलेल्या रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निवेदन घेऊन जाण्याशिवाय काहीच केले नाही. आतापर्यंत दिलेल्या निवेदनाचा काहीच उपयोग झाला नाही. आतातरी काय होईल..? निजामाबाद ते नांदेड आणि नांदेड ते निजामाबाद धावणाऱ्या सवारी रेल्वे गाडीतील समस्या अद्यापही कायम आहे. निजामाबाद पंढरपुर आणि पंढरपूर ते निजामाबाद ही रेल्वे दुर्लक्षित आहे. तिरुपती ते निजामाबाद धावणारी रॉयलसीमा एक्सप्रेस नांदेडला कधी येणार आहे. नवीन रेल्वे गाड्यांना उमरीत कधी थांबा मिळणार आदी प्रश्न कायमच राहिले आहेत. हे प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत. अशी मागणी होत आहे. प्रारंभी उमरीकरांच्या वतीने वरिष्ठ अधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर निवेदन देण्यात आले. निवेदन घेतले आणि आधिकारी निघून गेले.

### अडचणी सोडवण्यासाठी प्रशासन आजपासून थेट प्रत्येक गावात : सुरेखा स्वामी

**धर्माबाद**-ग्रामीण भागातील गावकऱ्यांचा व शेतकऱ्याचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न असलेला पांदण रस्त्याचे प्रलंबित प्रश्न शेतकऱ्यांना



शेतमाल ने आण करण्यासाठी होणारी अडचण लक्षात घेता महसूल विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या मार्फत मुख्यमंत्री महोदयाच्या शंभर दिवसाचा कृती कार्यक्रमांतर्गत प्रत्येक गावातील स्मशानभूमी पाहणी आणि पांदण रस्ते पाहणी करून अडचणी उद्भवल्यास त्या तात्काळ त्या ठिकाणी सोडवण्यासाठी नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी तसेच भूमी अभिलेख विभागाच्या कर्मचारी यांचे पथक गठित करून मार्च महिन्यात उद्यापासून धर्माबाद तालुक्यातील प्रत्येक गाव खेड्यामध्ये हे पथक जाणार आहे . गावकऱ्यांना नम्र निवेदन आहे की त्यांनी या पथकाला भेटून आपल्या अडचणी सांगाव्यात. जास्तीत जास्त रस्ते लोकसहभागातून मोकळे झालेले रस्ते मजबुती करण्यासाठी देखील प्रस्तावित करावेत असे आव्हान धर्माबाद तालुक्याचे तहसीलदार सुरेखा स्वामी यांनी केले आहे. गाव तिथे स्मशानभूमी आणि पक्के रस्ते यासाठी हे शासन कटिबद्ध असून मुख्यमंत्र्यांचा शंभर दिवसाचा कालावधी पूर्ण होत असतानाच महाराष्ट्रातल्या प्रत्येक गाव खेड्यामध्ये ही योजना राबविण्यात येणार आहे. यामधून शेतकऱ्यांचा सर्वात मोठा प्रश्न असलेला शेतीकडे जाणारा पांदण रस्ता अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना स्वतःचा माल ने आण करण्यासाठी गाव नकाशावर नोंदी नसलेले अनेक रस्ते आहेत परंतु शेतकऱ्यातील आपापसात तंटे निर्माण होऊन या ठिकाणी शेतकऱ्यांच्या शेताकडे जाणारा रस्ता उपलब्ध नाही. त्यामुळे सर्व संमतीने प्रत्यक्ष शेतकऱ्यांनी यासाठी सहकार्य करणे गरजेचे आहे. कारण मजबूत रस्ते झाले तर विविध पीक घेऊन शेतकरी समृद्ध होऊ शकतो असेही मत तहसीलदार सुरेखा स्वामी यांनी व्यक्त केले आहे. सदरील पथकामध्ये धर्माबाद तालुक्यातील नायब तहसीलदार गावंडे, पंडित राठोड, शिवाजी जाकापुरे, कृष्णा सातपुते, मंडळ अधिकारी तेजस कुलकर्णी, वर्षा कुलकर्णी, अनिल लोहटे, अनिता गोपीनवार व भुमिअभिलेख विभागाचे सचिन आढाव, ईंदू गजभारे, आदबसिंग सिंग जारवाल,शिल्पा पैडीवार, यांचा समावेश असलेले महसूल विभागाचे पथक असल्याची माहिती तहसीलदार श्रीमती सुरेखा स्वामी यांनी दिली आहे उद्यापासून हे पथक तालुक्यातील सर्व गावांमध्ये दिलेल्या नियोजनानुसार पोहोचणार आहे.

### सायलू मुक्केरवार यांचे निधन

**कुंडलवाडी**-शहरातील नरागल्ली येथील रहिवाशी सायलू गंगाधर



मुक्केरवार (५५) यांचा दि.४ मार्च रोजी सकाळी ७ वाजताच्या दरम्यान स्वतःच्या शेतातील तंबाखूच्या भट्टीतून निघणाऱ्या धुराने श्वास कोंडून मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले,एक मुलगी, सून, नातू असा परिवार असुन त्यांच्या मृत्युने शहरात सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. सायलू हे कुंडलवाडी येथील म. रा. विद्युत वितरण कंपनीचे अभियंता सुरेश गड्डवार यांचे मामा होते.

## पीओपीच्या मुर्तिवर बंदी घातल्याने मुर्तिकारागिरांवर उपासमारीची वेळ

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०४ मार्च**

पिओपीच्या मुर्ती कारागीरवर उपासमारीची वेळ, पिओपिच्या गौरी,गणपती मुर्तीवर शासनाने बंदी घातली या निर्णयाने अनेक मुर्तीकारागीर व मुर्तीमजूरावर उपासमारीची वेळ येण्याचे नाकारता येत नाही शासनाने तात्काळ निर्णय रद्द करावा अशी मागणी लोहा येथील गौरी गणपती मुर्ती कारागीर संघटना पदाधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आली होती पिओपिवरील बंदी रद्द करण्यात यावी असा बैठकीत निर्णय घेण्यात आला.

सर्वोच्च नायलायने घातलेल्या पीओपी(प्लास्टर ऑफ पॅरिस) च्या मूर्तीवर बंदी घातली आहे.



या बंदीमुळे देशात सर्वच ठिकाणी मूर्तीकारागीरात असंतोष पसरला आहे. मूर्तिकार व मुर्ती मजूरावर आगामी काळात उपासमारीची वेळ येण्याची शकेता. या निर्णयाच्या अटी रद्द कराव्यात या साठी लोहा शहरातील तुळजाई मंगलकार्यालय येथे कुंभार समाजाच्या वतीने व शहरातील मूर्तिकार यांच्या संयुक्त विद्यमाने नगरपरिषद माजी नगरसेवक दत्तात्रय कांबळे(पेन्टर), प्रसिध्द मूर्तिकार आनंद पलये यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये ५६ मूर्तिकार संचालक या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीमध्ये गेल्या महिन्यामध्ये नाययालयाने दिलेल्या पीओपीच्या मुर्त्यावर बंदी घातली असल्याने मूर्तिकार मात्र या निर्णयावर नाराज असल्याचे मुर्तीकारातुन बोलले जाते यावेळी पिराजी जोरुळे, अंकुश जोरुळे,गंगाराम पलये,ईश्वर जोरुळे,भगवान सळवने, सोनाजी सळवने, कल्याण बंगरुळे, ज्ञानेश्वर जोरुळे, सचिन जोरुळे, बंटी जोरुळे, रवि बंगरुळे, बाळा प्रसाद पारडे, रामकिशन सळवणे, विठ्ठल जोरुळे, बंडु वडजे, तानाजी जोरूळे, अकाश जोरूळे, गोविंद जोरुळे, देविचद पिसोळे, जोरूळे कृष्ण, व्यकटेश जोरुळे, दिपक जोरुळे आदींची उपस्थित होती.

## बुद्धगया येथील आंदोलनाला नालंदा चॅरिटेबल ट्रस्ट मुदखेडचा पाठिंबा

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ०४ मार्च**



संपूर्ण देशातील बौद्ध समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या बुद्धगया बौद्ध विहार हे गेल्या ७५ वर्षापासून ब्राह्मणाच्या अधिपत्याखाली असून यासाठी बुद्धगया येथे अनेक दिवसापासून आंदोलन चालू आहे याच आंदोलनाला पाठिंबा म्हणून अनेक देशासह जिल्ह्यातील बौद्ध समाजाच्या वतीने शासनाचा निषेध करत बुद्धगया ब्राह्मण मुक्तीसाठी दि. ३ मार्च रोजी नालंदा चारी चॅरिटेबल ट्रस्ट व मुदखेड येथील बौद्ध उपासक उपासिका यांच्यावतीने तहसीलदार तहसील कार्यालयाच्या मार्फत शासनाला निवेदन देण्यात आले. यावेळी डॉ. खेम धम्मो महाथेरो मूळावा, डॉ. सत्यपाल महाथेरो संभाजीनगर, पययानंद थेरो लातूर, डॉ. इंदवंश महाथेरो औरंगाबाद, भिकुनी चारुशीला थेरी नांदेड, शीलरत्न थेरो नांदेड, पयारतन थेरो, महाकाशप थेरो, भिख्खू गगनबोधी मुदखेड, यांच्यासह बौद्ध उपासक उपासिका यांची उपस्थिती होती.

## कत्तलीसाठी गोवंश विक्री करणाऱ्या एकास अटक

**तभा वृत्तसेवा**
**कुंडलवाडी,दि. ०४ मार्च**

गोवंश जातीच्या जनावराची कत्तल करून त्याची अवैध विक्री होत असल्याची माहिती मिळाल्या वरून येथील पोलिसांनी एकास ताब्यात घेतले असून दुसरा आरोपी फरार झाला आहे .

याबाबत अधिक माहिती अशी की, येथील कुरेशी गल्लीत मुनवर मशिद शेजारी असलेल्या शाहिद इब्राहिम कुरेशी (२६) आणि इब्राहिम करीम कुरेशी हे राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागू असतांनाही आपल्या रहात्या घरासमोरील ओसरीवर गोवंश जातीचे मांस विक्री करतांना आढळुन आले. पोलीस आल्याचे पहाताच यातील आरोपी इब्राहिम करीम कुरेशी हा पळुन गेल्याची माहिती आहे. तर घटनास्थळी असलेल्या आरोपी शाहिद इब्राहिम कुरेशी यास पोलिसांनी ताब्यात घेतले व त्याच्या कडील मुद्देमाल जप्त केला आहे. पो.हे .कॉ. शंकर लालु चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे घटनास्थळी स.पो. नि. ज्ञानेश्वर शिंदे यांनी भेट दिली अधिक तपास पो. हे.कॉ.अ. गफुर हे करीत आहेत.

## वनपरीक्षेत्राधीकाऱ्याच्या उदासीनतेमुळे इस्लापूरचा जंगल सफारी प्रकल्प तीन वर्षापासून रखडला

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ०४ मार्च**

तालुक्यातील इस्लापूर (सहस्रकुंड) वनपरिक्षेत्र कार्यालया अंतर्गत प्रसिद्ध हरीण खराब आहे. यामध्ये हजारोच्या संख्येने मुक्त संचार करणारे वन्य प्राण्यांच्या संरक्षणार्थ प्रस्तावित बहुचर्चित सफारी प्रकल्पाला २०२२ मध्ये मंजुरी मिळाली असताना सध्या वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या नाकर्तेपणामुळे प्रकल्पाचे काम बंद असल्याने वन्य प्राण्यांना शिकाऱ्यांच्या भक्षस्थानी पडावे लागत असून अशा गैर जवाबदार अधिकाऱ्यांवर कार्यवाहीची मागणी वन्यप्रेमी व पर्यावरण प्रेमी करत आहेत.

किनवट पासून ४५ किमी अंतरावर असणारे इस्लापूर (सहस्रकुंड) धबधबा आणि हरीण खरबा मुळे प्रसिद्ध आहे. शेकडो एकर मध्ये पसरलेल्या हरीण



खरबा मध्ये हरीण, काळविटे, निलगाय, कोल्हे असे कितीतरी वन्य प्राणी मुक्त संचार करत असतात तर उन्हाळ्यामध्ये पाण्यासाठी आणि चाऱ्यासाठी भटकंती करत रस्त्यावरही दिसतात हे पर्यटक व प्रवाशांकरीता अत्यंत दर्शनीय आहे. परंतु अपघात आणि होणाऱ्या अवैध शिकारी मुळे प्राण्यांची संख्या कमी होत असल्याने २०२२ मध्ये तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी प्रकाश शिंदे यांनी सदर खरब क्षेत्रात जंगल सफारी पार्क बनवण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला त्यामध्ये इलेक्ट्रिकल व्हेईकल पाथवे, शेड, चार्जिंग स्टेशन, उपहारगृह, वॉच टॉवर्स, स्वच्छतागृह, मुख्य प्रवेशद्वार, मजबूत रस्ते पाळीव प्राणी पाहण्यासाठी विविध देखावे यासह अनेक सुविधा करिता कोट्यावधी रुपयांचा निधीच्या प्रकल्पाला मंजुरी मिळाली कामाला सुरुवातही झाली. परंतु दुर्दैवाने वनपरिक्षेत्र अधिकारी प्रकाश शिंदे यांची प्रशासकीय बदली झाली. परंतु त्यानंतर कार्यभार स्वीकारणाऱ्या सध्याच्या वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी प्रकल्पा बाबत उदासीनता दाखवत बगल दिल्याने काम बंद पडले. वन्यप्रेमी नागरिकांनी पाठपुरावा करूनही परिक्षेत्र अधिकारी यांना प्रतिसाद देत नसल्याने व्यतीत होऊन त्यांनी प्रसार माध्यमांकडे धाव घेतली. याबाबत अधिक माहिती करिता वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन धनगे यांना संपर्क साधला असता सुरुवातीला त्यांनी बोलण्याचे टाळले त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यम प्रतिनिधींचा फोन ब्लॉक केला त्यावरून त्यांची कर्तव्य दक्षता लक्षात तर येथेच उलट त्यांच्या निष्क्रिय कारकिर्दीमुळे परिक्षेत्रामध्ये अवैध वृक्षतोड, शिकारी, तस्करी यांना उत आला आहे. अवैध धंदेवाल्यांशी त्यांची अर्थपूर्ण मैत्री असल्याचा आरोपही होत आहे. परंतु वनपरिक्षेत्र अधिकारी कोणालाही जुमानत नसल्याने इस्लापूर वनपरिक्षेत्रामध्ये साहेब प्रतिसरकार तर चालवत नाही ना असा प्रश्न उभा टाकत आहे. अशा निष्क्रिय व कर्तव्य शून्य अधिकाऱ्यांमुळे प्रशासनाची घडी पूर्णता विस्कटली आहे. त्यामुळे या अधिकाऱ्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची मागणी वन्यप्रेमी व पर्यावरण प्रेमी नागरिकांतून होत आहे.

## वाडी, वस्ती, तांड्यावर पाणी देता का..? पाणी... : विशाल पवार

### बेंबरा तांडा येथे गेल्या २२ दिवसापासून पाणीपूरवठा बंद

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. ०४ मार्च**

सद्या उन्हाळी महिना चालू असल्यामुळे सुर्य आग ओगत असताना देगलूर तालुक्यातील बेंबरा ग्रामपंचायत आंतर्गत बेंबरा तांडा येथील नागरिकांना पाण्यासाठी भर उन्हात पायपीट करावे लागत असल्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून याकडे लोकप्रतिनिधी व ग्रामसेवक तसेच प्रतिनिधींचा अक्षम्य दुर्लक्ष होत असून गावातील पाणीटंचाईच्या झळा नागरिकांना सोसाविया लागत असून त्या गावातील नागरिकांचा स्थानिक लोकप्रतिनिधी सह तालुका स्तरीय लोकप्रतिनिधी विषयी



तीव्र संताप व्यक्त करताना चे चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यानच्या काळात गेल्या अनेक वर्षा पासून ग्रामपंचायत ताबा असलेल्या एका विहिरीतून पाणी पुरवठा केला जातं होता या गावात गेल्या २० ते २२ दिवसापासून पाणी टंचाई झळयाचे चित्र नेहमीच पाहवयास मिळत आहे. पाण्या अभावी नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असून करुन जवळच असलेल्या घुळा तांडा (तेलंगणा) येथून २-३ किलोमीटर अंतरावर पाणी घेऊन यावा लागत आहे.तसेच येथुन सायकल,दुचाकी,आटो,पीक अप, एवढं च नव्हे तर चक्क महिलांना दोन - दोन घागरी डोक्यावर पाणी आणत आहेत.सदरील पाणी पुरवठा तात्काळ दूर कराव असे निवेदन उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी यांना गावाकऱ्याच्या वतीने देण्यात आले आहे.

> तेलगाणा सीमेवरील बेंबरा तांडा येथे गेल्या बावीस दिवसापासून होत आसलेल्या पाणी टंचाई ची प्रशासने,लोकप्रतिनिधी ने तात्काळ दखल घेऊन पाण्याची सोय करून द्यावी अन्यथा पाण्यासाठी संविधानिक पद्धतीने जनआंदोलन उभा करण्यात येईल.

## प्रलंबित ई-चलन भरणा करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०४ मार्च**

प्रादेशिक परिवहन कार्यालयातून वाहन धारकांना देण्यात आलेले प्रतिवेदन हे मोठया प्रमाणात प्रलंबित आहे. प्रलंबित प्रतिवेदन, ई-चलन हे तीन महिण्यानंतर कोर्टात पाठविणे आवश्यक आहे. त्यानुसार या कार्यालयाकडून प्रलंबित प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यात आले. न्यायालयाकडून वाहनमालक, चालक यांना या संदर्भात जामीनपात्र व अजामीनपात्र वॉरंट जारी करण्यात येणार आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दोघे जागीच ठार

### किनवट राष्ट्रीय महामार्गावरील घटना

**तभा वृत्तसेवा**
**माहूर ,दि. ०४ मार्च**

तालुक्यातील पानोळा येथील काही जण दि.०३ मार्च रोजी दर्शनासाठी विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी तालुक्यातील पांगरी येथील महादेव मंदिरावर गेले होते.माहूर तालुक्यातील वडसामार्गे दुचाकीवरून परतीच्या प्रवासात निघालेल्या यातील दोघांना रात्री अंदाजे १० वाजताच्या सुमारास किनवट रोड,राष्ट्रीय महामार्गावरील उमरा ते आसोली फाटा दरम्यान अज्ञात वाहनाने जोरदार धडक देऊन चिरडल्याने एकाचे मुंडके धडावेगळे तर तर दुसऱ्याच्या शरीराचा एक भाग अक्षरशः चेंदामेंदा झाल्याने दोघांचाही जागेवरच मृत्यू झाल्याची अतिशय



धक्कादायक अशी अपघाताची घटना घडली.मन सुन्न करणाऱ्या या दुर्घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

माहूर तालुक्यातील पानोळा येथील काही जण विदर्भातील पांगरी येथे महादेवाच्या दर्शनासाठी गेले होते. यातील प्रकाश परसराम जाधव वय ५२ वर्षे व भारत धनसिंग राठोड वय ५५ वर्षे हे दोघे रात्री दुचाकी क्रमांक एम. एच. २९ एफ १२४२ वरुन परतीच्या प्रवासाला निघाले होते.रात्री १० वाजताच्या सुमारास माहूर किनवट राष्ट्रीय महामार्गावरील उमरा ते आसोली फाटा दरम्यान त्यांच्या दुचाकीला कोणत्यातरी अज्ञात वाहनाने जोरदार धडक देऊन उडवून देत अक्षरशः चिरडून टाकले.धडक इतकी जबर होती कि, दुचाकीवरील प्रकाश जाधव यांचे शीर धडापासून वेगळे झाले व त्यांचा जागीच मृत्यू झाला. भारत राठोड यांचे अर्ध्या शरीराचा अक्षरशः चेंदामेंदा झाल्याने ते गंभीर जखमी झाल्याने अत्यवस्थ अवस्थेत खाली पडले. रुग्णवाहिकेतून माहुर येथिल ग्रामीण रुग्णालय दाखल केले असता तेथे डॉ. अक्षय सांगळे आणि आष्टा येथील डॉ.संदेश राठोड यांनी तपासणीनंतर दोघांनाही मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच माहूरचे प्रभारी पोलिस निरीक्षक शिवप्रकाश मुळे आणि सिंदखेड पोलिस ठाण्याचे सपोनि. रमेश जाधवर यांनी घटनास्थळी धाव घेतली.

## मांजरम येथे घराला आग शेती उपयोगी अवजार जळून खाक

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,दि. ०४ मार्च**

तालुक्यातील मांजरम येथील भरवस्तीत असलेल्या घराला पहाटेच्या वेळी अचानक आग लागून घरातील साठवून ठेवलेली शेती उपयोगी अवजारे आगी त जळून पुर्ण खाक झाले आहे.

दि.२५ फेब्रुवारी पहाटेच्या सुमारास संपुर्ण गांव साखर झोपेत असतांना अचानक पणे घराला आग लागली होती. याच वेळी घरा शेजारी आसलेल्या नागरिकांनी पाणी टाकून आग आटो क्यात आणण्याचा खूप प्रयत्न केले. परंतु घरातील साठ वून ठेवलेले प्लास्टिकचे, रबरी व लाकडी साहित्यामुळे आगीने तात्काळ रौद्ररूप धारण केल्याने आग



आटोक्या त येवू शकली नाही. या वेळी या घटनेची माहिती त्यांचे पुत्र गिरीश नारायण पांडे यांनी नायगांव तहसील कार्या लयात दिली असून. तात्काळ तलाठ्याने सदरील घटनेचा पंचनामा केला. या आगीत जवळपास दोन ते अडीच लाख रूपयांचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे.

# आखाडा बाळापूरात धनंजय मुंडेंच्या फोटोला जोडेमारो आंदोलन

## संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा द्या



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मार्च**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी तसेच आ. धनंजय मुंडे यांना आमदार पदावरून बडतर्फ करून त्यांना सहआरोपी करण्याची मागणी करीत दि ४ मार्च रोजी आखाडा बाळापूर येथे आ. धनंजय मुंडे यांच्या फोटोला जोडेमारो आंदोलन केले.

स्व. संतोष देशमुख हत्या प्रकरणाची चार्जशीट दाखल झाल्यानंतर सरपंच संतोष देशमुख यांच्या खूनाचे व्हिडीओ आणि छायाचित्र व्हायरल झाले. या घटनेचा राज्यभरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर येथेही नागरिकांनी स्व. संतोष देशमुख यांची अतिशय क्रुरपणे मारहाण करून हत्या करण्यात आली या घटनेचे तीव्र पडसाद कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर येथेही उमटले. सदरील घटना ही माणुसकीला काळीमा फासणारी आहे. या घटनेचे व्हिडीओ आणि छायाचित्र उपलब्ध असतांना या प्रकरणात वाल्मिक कराड व इतर आरोपींना कारागृहात व्हीआयपी वागणूक दिली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच या प्रकरणात परळीचे आ. धनंजय मुंडे यांना आमदार पदावरून बडतर्फ करून त्यांना सहआरोपी करावे अशी मागणी आंदोलकांनी केली तसेच या प्रकरणातील सर्व आरोपींना फाशीची शिक्षा देऊन सरपंच स्व संतोष देशमुख व त्यांच्या कुटुंबियांना न्याय द्यावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. मागण्या तत्काळ मान्य न केल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलनाचा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी जकी कुरेशी, सोपान बोंढारे, डॉ संतोष बोंढारे, विजय बोंढारे, सुशील बोंढारे, सचिन देशमुख, श्रीकांत पाटील, ऋषीकेश बोंढारे, प्रमोद बोंढारे, संतोष बाभूळकर, संदीप सावंत, अजय बोंढारे, सुरज हेंद्रे, डॉ अरूण सुर्यवंशी यांच्यासह परिसरातील गावकऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी धनंजय मुंडे यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.



**हिंगोली– स्व. ओमप्रकाश देवडा यांच्या पुण्यतिथीनिमित्त मोफत कर्करोग तपासणी व उपचार शिबीराचे उद्घाटन करण्यात आले होते. या शिबीरात १२३ रूग्णांची तपासणी करण्यात आली तसेच २५ जणांनी अवयव दान साठी नोंदणी केले. यावेळी बँकेचे अध्यक्ष प्रकाशंचद सोनी, उपाध्यक्ष सुनील देवडा, राजु मुदीराज, एम एम बुद्रुक, डॉ सचिन बगडीया, विठ्ठलदास मुंदडा आदींची उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर**

# पोलिस दलाच्यावतीने तक्रार अर्ज निर्गती मेळाव्यांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मार्च**

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील नागरिकांच्या तक्रारी तत्काळ संबंधीत पोलिस ठाण्याला वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये सोडविण्यासाठी दर शनिवारी हिंगोली पोलिस घटकाच्यावतीने हिंगोली शहर, औंढा नागनाथ पोलिस ठाणे, वसमत शहर पोलिस ठाणे येथे तसेच जिल्ह्यातील इतर पोलीस ठाण्यांमध्ये दि ८ मार्च रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नियुक्त्याही करण्यात आल्या आहेत.

हिंगोली शहर पोलिस ठाणे येथे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे हे स्वत: उपस्थित राहणार आहेत. पोलिस ठाणे बासंबा, पोलिस ठाणे कळमनुरी हद्दीतील तक्रारदार नागरिकांनी दि ८ मार्च रोजी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात हजर राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सतेच वसमत शहर पोलिस ठाणे येथे अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील उपस्थित राहणार असून वसमत शहर, वसमत ग्रामीण, कुरूंदा, आखाडा बाळापूर, हट्टा या पाच पोलिस ठाणे हद्दीतील तक्रारदारांनी दि ८ मार्च रोजी उपस्थित राहण्याचे तसेच पोलिस ठाणे औंढा नागनाथ येथे उपविभागीय पोलिस अधिकारी सुरेश दळवे यांची उपस्थिती असणार असून औंढा नागनाथ, हिंगोली ग्रामीण, नर्सी नामदेव, सेनगाव, गोरेगाव या पाच पोलिस ठाण्याहद्दीतील तक्रारदारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदलीचे वेळापत्रक जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मार्च**

राज्यातील जिल्हा परिषदेअंतर्गत शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीचे वेळापत्रक जाहीर झाले असून दि १० मार्चपर्यंत शिक्षकांची अद्ययावत माहीती ऑनलाईन भरावी लागणार आहे. त्यानंतरच या बदल्या होणार असून नवीन शैक्षणिक वर्षात बदली झालेले शिक्षक आपापल्या जिल्ह्यातील शाळांवर रूजू होणार आहेत. त्यामुळे शिक्षकांमधून बदलीच्या तयारीला वेग आला आहे.

राज्यात ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीचे धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार ऑनलाईन बदल्या केल्या जात असून विन्सीस आयटी सर्व्हिसेस पुणे यांच्या मार्फत बदल्या केल्या जाणार आहेत. त्यामध्ये संवर्ग एकमध्ये दिव्यांग, विधवा, परितक्त्या यांचा समावेश असून संवर्ग दोनमध्ये पतीपत्नी एकत्रीकरण तर संवर्ग तीनमध्ये सर्वसाधारण शिक्षकांचा समावेश आहे. या बदल्यांसाठी शिक्षकांनी ऑनलाईन माहीती भरल्यानंतर त्या जिल्ह्यात त्या संवर्गातील जागा रिक्त असल्यानंतरच बदली होणार असल्याचे सुत्रांनी सांगितले आहे. त्यासाठी ग्रामविकास विभागाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना पत्र पाठवले आहे. यामध्ये १० मार्चपर्यंत शिक्षकांची अद्ययावत माहीती पोर्टलवर भरली जाणार आहे. त्यानंतर ११ मार्च ते १३ मार्च या कालावधीत जिल्हा परिषदांना बिंदू नामावली तपासून घेऊन रिक्तपदांची माहीती अपलोड करावी लागणार आहे. त्यानंतर दि १४ मार्च ते २० मार्च या कालावधीत शिक्षकांना पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा दिली जाणार आहे. दि २१ मार्च ते २५ मार्च या कालावधीत पात्र अर्जांची पडताळणी केली जाणार आहे. यासोबतच न्यायालयीन प्रकरणे, विभागीय आयुक्तांकडे अपील दाखल केलेल्या प्रकरणात बदली बाबतचे स्पष्ट आदेश असल्यासया प्रकरणी प्रथमत: तपासून प्राधान्य देण्यासाठी दि २६ मार्च ते २७मार्च या दोन दिवसांचा कालावधी असणार आहे. दि २८ मार्च ते ६ एप्रिल पर्यंत आंतरजिल्हा बदलीची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. दि ६ एप्रिलपर्यंत बदली प्रक्रिया पूर्ण होऊन शिक्षकांना त्यांनी मागितलेल्या जिल्ह्यात बदली होणार असल्याने नवीन शैक्षणिक वर्षात नवीन शिक्षक शाळांवर रूजू होणार आहेत.



**हिंगोली– शहरातील तहसील कार्यालयाजवळील रेल्वे उड्डाणपूलाचे काम लवकरच सुरू करण्यात येणार असून या बांधकामाचे साहीत्याची जुळवाजुळव करतांना दिसत आहे. सध्या अस्तित्वात असलेला रेल्वे उड्डाणपूल अतिशय अरूंद असल्यामुळे याठिकाणी नेहमीच अपघात आणि वाहतुकीची कोंडी होत असते. नवीन रेल्वे उड्डाणपूलामुळे या समस्या निर्माण होणार नाहीत. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### सा. बां. विभागाच्या पतसंस्थेची कार्यकारणी



हिंगोली– सार्वजनिक बांधकाम मंडळ कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित नांदेड सन २०२५-२०३० या कालावधीची संचालक मंडळ निवडणूक अविरोध पार पडली. यावेळी सर्व अधिकारी, कर्मचारी सन्माननीय सभासद बंधू व भगिनी उपस्थित होते. पतसंस्थेच्या अध्यक्षपदी माधव सूर्याजीराव देशमुख, उपाध्यक्ष विश्वंभर दिगंबरराव ढगे, सचिव सतीश रामराव पवार, संचालकपदी सुनील गुंडेराव मोरे, किशोर विश्वनाथ वावरे, सुरेश विठ्ठलराव बोन्लावार, संतोष विठ्ठलराव पगारे, अशोक विठ्ठलराव नाईक, धनंजय श्रीकृष्णराव साले, वर्षा बबनआप्पा घेवारे, शकुंतला पंडितराव टाकरस यांची निवड करण्यात आली. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

### रमजान ईदनिमित्त पोलिस अधीक्षकांच्या भेटी



हिंगोली– मुस्लीम धर्मीयांचा पवित्र रमजान ईद सणानिमित्त पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी शहरातील मेहराज चौक, पेन्शनपूरा, तलाब कट्टा, पलटण, रिसाला बाजार, आजम कॉलनी येथील सर्व मस्जिद तसेच नागरिकांना भेटी दिल्या. यावेळी मुस्लीम बांधवांना रमजान ईदनिमित्त हार्दीक शुभेच्छा दिल्या. यावेळी आजम कॉलनी येथे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचा मुस्लीम बांधवांकडून सत्कार करण्यात आला. यावेळी जुबेर नवयुवक मंडळाचे शेख जुबेर, शेख सज्जाद, शेख एजाज, शेख अल्मास आदींची उपस्थिती होती.

### १३ वाहन चालकांवर कारवाई

हिंगोली– वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तसेच अवैधपणे वाहतुक करणाऱ्या १३ वाहन चालकांविरूध्द हिंगोली पोलिसांच्यावतीने कारवाई करण्यात आली असून सदरील वाहन चालकांकडून १० हजार ७०० दंड वसूल करण्यात आले.

# सांदीपनीच्या बालवैज्ञानिकांनी विज्ञान दिनी सादर केले प्रात्यक्षिक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मार्च**

सांदिपनी पब्लिक स्कूल, सुनिल नगर तरोडा (बु.), नांदेड येथे राष्ट्रीय विज्ञान दिवसाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी यांनी सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून केली.

बालवैज्ञानिकांनी आजच्या काळात विज्ञानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी मनोगत व्यक्त केले. यात अनया गाडगीळे, तन्वी मिश्रा, रेवंत खंदारे, आरव सुंधाळे, अक्षरा केळगंद्रे, हरजुगतसिंग विष्णुपुरीकर, मनंत कौर, प्रज्ञा वाघमारे, आर्यन देशमुख, समृध्दी मुळे, स्वराली चिंचोळकर, सर्वज्ञ पौवळे, तन्वी जटाळे, रुपाली बोथीकर, तन्वी सुगांवकर, परी वानखेडे, अनंदी राठोड, श्रद्धा गाडगीळे, वेदिका पवार या विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यानंतर विज्ञान शिक्षक काळेश्वर पावडे यांनी विज्ञानाच्या विविध प्रयोगातून राष्ट्र उभारणीत विज्ञानाचे महत्त्व दाखवले. त्यांनी प्रत्यक्ष सादरीकरणातून मुलांच्या मनात विज्ञानाची आवड निर्माण केली. शाळेच्या भव्य मैदानात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी नवनवीन प्रकल्पांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाला शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, विपुल राठोड, सौ. रेश्मा विपुल राठोड, सौ. माहेश्वरी मुकुल राठोड, मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मखाले, विज्ञान विषयाचे सहशिक्षक चंद्रकांत लुंगारे, सौ. दिपा लामतुरे, सौ. गितांजली राहेगांवकर व शाळेतील सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन खंडेराव जोगदंड यांनी केले.

# सोनारावर दरोडा टाकून लुटलेले सोने पोलिसांकडून सोनारास केले परत

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, ४ मार्च**



दि.२५ डिसेंबर २०२४ रोजी सोन्या चांदीचे व्यापारी संतोष शिवकुमार सराफ रा. हिंगाली हे मौजे जांबगव्हाण येथे दिवसभर व्यापार करून सायंकाळी ०७.०० वाजण्याचे सुमारास पत्नीसह स्वतः च्या मोटारसायकलवर हिंगोलीकडे घरी येत असताना अज्ञात सहा दरोडेखारांनी फिर्यादी संतोष सराफ यांच्या डोक्यात लाठी मारून चालत्या मोटारसायकल वरून खाली पाडले व त्यांच्या जवळील ७४ ग्रॅम सोन्याचे दागिने व मोबाईल असलेली बॅग जबरीने घेवुन पळुन गेले होते. त्याअनुषंगाने पोलीस स्टेशन औंढा नागनाथ येथे गुन्हा दाखल होता. सदरचा गुन्हा हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि श्री. विकास पाटील, सपोनि घेवारे यांनी उघड करून पाच आरोपीस ताव्यात घेवुन गुन्हयात गेलेला संपुर्ण मुद्देमाल हस्तगत केला होता. तसेच सदर गुन्हयाचा तपास औंढा ना. पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री गणेश राहीरे, सपोनि श्री अरूण नागरे यांनी करीत आहेत.

मुद्देमाल वापसी बावत कायदेशीर प्रकीया पुर्ण झाल्यानंतर पोलीस स्टेशन औंढा चे गणेश राहीरे यांनी सदर गुन्हयातील फिर्यादी नामे संतोष शिवकुमार सराफ रा. हिंगाली यांना पोलीस स्टेशनला बोलावुन घेवुन चोरी गेलेला संपुर्ण मुद्देमाल किंमती अदांजे ६ लाख रूपयांचा जसाच्या तसा फिर्यादीस परत केला आहे. चोरी गेलेला संपुर्ण मुद्देमाल अगदी कमी कालावधीत जसाच्या तसा परत मिळाल्यामुळे व्यापारी वर्गात समाधानाचे वातावरण आहे.

# इस्कॉनच्या मूल्यशिक्षण संवर्धन स्पर्धेत एक हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मार्चे**




श्री श्री राधा गोपीनाथ मंदिर, इस्कॉन चौपाटी येथून इस्कॉन द्वारे हिंगोली शाखेच्यावतीने भगवत गीतेवर आधारित मूल्य शिक्षण संवर्धन परीक्षेत ४ थी ते १० वी इयत्तेतील जिल्ह्यातील एकूण १००० विज्ञार्थ्यांनी सहभाग घेवून चारित्र्यवान उज्ज्वल भविष्याचा संकल्प केला.

हिंगोली इस्कॉन शाखेच्यावतीने परीक्षेत जिल्हा स्तरावर एकूण प्रथम ५ विद्यार्थ्यांनी मेरिटमध्ये यश मिळवले. शालेय स्तरावर एकूण १५ जणांना मेरिटनुसार यशवंत ठरवण्यात आले. त्यावेळेस बक्षीस वितरण प्रसंगी बलदेव प्रभुजी बोलत होते. देश भरात हा उपक्रम सुरू असून चारित्र्यवान पिढी निर्माण साठी इस्कॉन सेवारत आहे असही ते म्हणाले. बक्षीस वितरण समारंभा प्रसंगी, केंद्र शासन कडून आदर्श युवा पुरस्काराने सन्मानित पत्रकार डॉ.विजय निलावार, डॉ.प्रकाश अंभोरे, प्रा.कपिल जमदाडे, प्रा. प्रणव पवार, बालरोग तज्ञ डॉ.नितेश चौधरी, इस्कॉन चौपाटी येथील मूल्य शिक्षण संवर्धन स्पर्धा परीक्षा समिती सदस्य व परीक्षक अभय गोपालदास प्रभुजी आदी उपस्थित होते.

मंचावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यशवंत स्पर्धकांना सायकल घड्याळ, बॅग्स आदींचे वाटप करून सत्कार करण्यात आला. प्रथम बक्षीस सायकल हे भारतीय विद्या मंदिरचा विद्यार्थी हनुमान गजानन जाधव पटकावले. द्वितीय बक्षीस लेनोवो टॅब हे वैष्णवी सोहनकुमार पुरोहित यांना मिळाले. तृतीय बक्षीस बोट डिजिटल वॉच दिव्यांश पियुष अग्रवाल, तृतीय बक्षीस आदित्य बबन राठोड, चतुर्थ बक्षीस, स्नेहल गंगाधर गंजवे आणि पाचवे बक्षीस साईश अभयकुमार भरतीया यांनी पटकावले. डॉ नितेश चौधरी, अभय भारतीया, सोहन पुरोहित, परीक्षक अभय गोपालदास प्रभूजी मंचावर उपस्थित मान्यवरांनी यशवंतांच कौतुक केले. हनुमान जाधव, वैष्णवी पुरोहित, सृष्टी लेकुले, कृष्णाली कोटे यांनी परीक्षेमुळे आमच्यात अध्यात्मिक शक्ती सह नवचैतन्य निर्माण झाल्याचे उदगार काढले. १००० विद्यार्थ्यापर्यंत भगवतगीता संदेश पोचल्याने भारतीय संस्कृती, कार्यक्षमता वृध्दी, चारित्र्य संपन्नता यांचा सुरेल संगम साधला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना ध्यान धारणा, करुणा, विनम्रता, सत्यनिष्ठा, आत्मसंयमनन आदींची प्राप्ती झाल्याचे पालकांनी प्रतिक्रियातून सांगितले.

याप्रसंगी पियूष अग्रवाल व प्रा.सुनील गुंडेवार, अभय गोपालदास यांच्या कार्य गौरवार्थ मंचांवरील मान्यवरांनी सत्कार केला. इस्कॉन हिंगोली शाखेने निती मूल्य संवर्धन आणि भगवद्गीताच महत्व अनन्य साधारण असल्याचं या उपक्रमातून अधोरेखित केलं हे यापुढेही निरंतर सुरू ठेवावं अशी अपेक्षा ज्येष्ठ पत्रकार डॉ.विजय निलावार यांनी व्यक्त केली. संचालन सौ. स्मिता देडे, स्वागतपर प्रास्ताविक पियूष अग्रवाल आभार प्रदर्शन प्रीती झुनझूनवाला यांनी मानले. कार्यक्रम स्थळ व्यवस्थापन सुनील गुंडेवार यांनी केले. हिंगोली इस्कॉन शाखेच्या सर्व बंधू, भगिनी, बालगोपाल यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

लातूर
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## कस्तुराबाई व मातृभूमी नर्सिंग स्कूलमधून दर्जेदार नर्सिंग प्रशिक्षण : डॉ. पाटील

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.४ मार्च -**

कस्तुराबाई नर्सिंग स्कूल व मातृभूमी नर्सिंग स्कूल मधून नर्सिंगचे दर्जेदार प्रशिक्षणातून उत्कृष्ट विद्यार्थी घडवले जात असल्याचे प्रतिपादन डॉ. रवींद्र पाटील यांनी केले. ते मातृभूमी व कस्तुराबाई नर्सिंग स्कूलच्या वतीने आयोजित मॉडेल बनविणे व सादरीकरण कार्यक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी बोलत होते.

यावेळी मातृभूमी प्रतिष्ठान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सतीश उस्तुरे, प्राचार्या उषा कुलकर्णी यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. पाटील म्हणाले अभ्यासातील मूळ संकल्पना समजण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी मॉडेल्स बनवणे व त्याचे सादरीकरण करणे हा उपक्रम महत्त्वाचा असून विद्यार्थ्यांनी बनवलेल्या मॉडेलचे व सादरिकरणाचे डॉ. पाटील यांनी कौतुक केले. यावेळी मॉडेल्स बनवणे व सादरीकरण करण्याच्या स्पर्धेतील विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी हृदय, मानवी शरीरातील हाडे, यकृत दात, जीभ, पचनक्रिया आदींच्या प्रतिकृती बनवत सादरीकरण केले होते.

यावेळी सतिश उस्तुरे, सुरेश पाटील, धनंजय गुडसुरकर, सचीन शिवशेट्टे यांच्या हस्ते उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल विद्यार्थ्यां पारीतोषिके देण्यात आली.

### संक्षिप्त वृत्त...



## धाराशिवात रांगोळी स्पर्धा संपन्न

**धाराशिव, दि.४ मार्च -**

निक्षय आठवड्यानिमित्त शासकीय परिचर्या म हाविद्यालय, धाराशिव येथे ३ मार्च रोजी क्षयरोग जनजागृतीसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरीदास आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा क्षयरोग अधिकारी आणि महाविद्यालय प्राचार्य एस.बी. मुजावर यांच्या नेतृत्वाखाली ही स्पर्धा संपन्न झाली. स्पर्धेमध्ये जीएनएमम आणि एएनएम अभ्यासक्रमाच्या प्रथम ते तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. निशा दळवी, स्नेहल चिंचोली स्नेहल माने प्रज्ञा, वैष्णवी घोडके, आशा वाडकर, तनुजा जाधव, रुकसार पठाण, कविता राठोड, समीक्षा भालेराव, आकांक्षा पवार, निकिता जगदाळे, श्रुती माळी, सुप्रिया शिंदे, नाझिया मुंडे, मानसी भोरे, शिवानी जाधव, अंजली गाडे, रुकसार पठाण, अनुष्का ढोबळे, हर्षदा सौंदळे, प्रणिता लांडगे, सुहानी लंगडे, शहनाज सय्यद, रुद्राक्षी माळी यांसह अनेक विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.



## जिल्हास्तरीय लोकशाही दिनात ३८ अर्ज प्राप्त

**धाराशिव, दि.४ मार्च -**


शासनाच्या विविध विभागाशी संबंधित नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक व्हावी, यासाठी दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. ३ मार्च २०२५ रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आला. संबंधित विभागांनी नागरिकांच्या प्राप्त अर्जावर तातडीने कार्यवाही करून नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी उपस्थित संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. जिल्हास्तरीय लोकशाही दिनाच्या या कार्यक्रमाला जिल्हास्तरीय यंत्रणांचे प्रमुख अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रशासन गुत्तेदारावर मेहरबान ? नणंद आरोग्य उपकेंद्राचे बांधकाम निकृष्ट

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.४ मार्च -**

प्राथमिक आरोग्य उपकेंद्र नणंद येथील इमारतीस जवळपास ६० लाख रुपये खर्च करून बांधण्यात आलेली आहे. हे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले असून नवीन इमारतीचा ताबा घेण्यापूर्वीच आरोग्य विभागाला या बांधकामात अनेक त्रुटी दिसून आल्या आहेत.







या संदर्भात गटविकास अधिकारी यांना युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रा. अण्णासाहेब मिरगाळे यांनी निवेदन दिले असता गटविकास अधिकारी यांनी तात्काळ याबाबत बांधकाम विभागाला कळवले आहे. आरोग्य विभागाने या बांधकामातील जवळपास दहा त्रुटी काढलेल्या आहेत. व त्या त्रुटी संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र दिले आहे.

ग्रामपंचायतने ना हरकत प्रम ाणपत्र दिले नसताना व आरोग्य विभागाने चार दिवसापूर्वी ताबा पावती दिली आहे ती ताबा पावती देत असताना इमारती मधील दहा त्रुटी काढण्यात आलेल्या आहेत. त्यात पेवर ब्लॉक पूर्णपणे फुटलेले आहेत. इमारतीला कंपाउंड वॉल नाही. इमारतीच्या भिंतीवर ग्रील लावलेल्या नाहीत.

गिलावा हा निकृष्ट केलेला आहे. छताला गिलावाच केलेला नाही.

सेफ्टी टँक बांधला नसून त्यावर झाकण सुद्धा घातले गेले नाही. त्यात एखादे लहान मूल किंवा व्यक्ती पडून त्याचा जीव जाऊ शकतो.

खिडकी व भिंत यामध्ये गॅप दिसून येत आहे. कॉलममधून सळ्या बाहेर आलेल्या आहेत. एक पाण्याची टाकी बसवण्यात आलेले नाही. एक ही दरवाजा व्यवस्थित बसवलेला गेलेला नाही. दरवाजा बसवण्यासाठी दोरी बांधण्यात आलेली आहे.

एवढ्या त्रुटी असून देखील संबंधित बांधकाम विभागाच्या इंजिनियरने अशा निकृष्ट कामाला संमती कशी दिली. यामध्ये गुत्तेदार व इंजिनिअरचे लागेबांधे आहेत का? हा एक सामान्य माणसाला प्रश्न पडणे साहजिक आहे.

तरी लातूर जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विनंती आहे की त्यांनी तात्काळ संबंधित गुत्तेदाराचे लायसन्स कॅन्सल करावे व संबंधित इंजिनिअरला तात्काळ निलंबित करावे अन्यथा युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रा. अण्णासाहेब मि रगाळे यांनी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा प्रशासना दिला आहे.

## अभ्यासात सातत्य ठेवल्यानंतर यश प्राप्त होते : प्रणिता होळसंबरे



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.४ मार्च -**

स्पर्धा परीक्षेला सामोरे जायचे असेल तर सुरुवातीपासून वाचनाकडे लक्ष दिले पाहिजे. कठीण मेहनत केली पाहिजे. अभ्यासामध्ये सातत्य ठेवले तर नक्कीच यश प्राप्त होईल असे उद्गार प्रणिती तुकाराम होळसंबरे यांनी काढले. ते छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालय, स्पर्धा परीक्षा व व्यवसाय मार्गदर्शन केंद्र यांच्या वतीने विशेष व्याख्यान व सत्काराचे आयोजन केलेले होते. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामकिशन मांजरे, स्पर्धा परीक्षेचे समन्वयक डॉ.व्ही.डी. गायकवाड, आयक्यूएसी चे समन्वयक डॉ. विष्णू पवार यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना होळसंबरे म्हणाल्या, बारावीनंतर विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा कडे वळले पाहिजे. नियमित वर्तमानपत्राचे वाचन करावे. अनेक परीक्षा देत राहाव्यात तेव्हाच आपल्याला यश मिळते. अध्यक्षीय समारोपप्रसंगी प्राचार्य डॉ. मांजरे म्हणाले, आमचे महाविद्यालय स्पर्धा परीक्षा केंद्र अतिशय चांगल्या पद्धतीने चालवते. होळसंबरे यांची वर्ग एक पदी निवड झाली ही महाविद्यालयासाठी अभिमानाची गोष्ट आहे असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सम न्वयक डॉ.व्ही.डी. गायकवाड यांनी केले तर आभार डॉ. विष्णू पवार यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ढोकीतील संशयित बर्ड फ्लू रुग्णाचा अहवाल नकारात्मक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मार्च -**

धाराशिव तालुक्यातील ढोकी येथील संशयित बर्ड फ्लू रुग्णाच्या घशातील व नाकातील स्रावाचे नमुने पुण्यातील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजी (NIV) येथे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. आरोग्य विभाग, धाराशिव यांना ४ मार्च २०२५ रोजी प्राप्त झालेल्या चाचणी अहवालानुसार रुग्णाचा बर्ड फ्लू अहवाल नकारात्मक आला आहे.

आरोग्य विभागाने ढोकी व आसपासच्या १० किलोमीटर परिसरातील २२ गावांमध्ये फ्लू सदृश आजाराचे सर्वेक्षण (SRI/Influenza Like Illness - ILI) पूर्ण केले असून, सध्या कोणताही नवीन संशयित रुग्ण आढळलेला नाही. याशिवाय,आरोग्य विभाग, पशुसंवर्धन विभाग व ग्राम पंचायत विभागाच्या संयुक्त प्रयत्नांतून जिल्ह्यात सर्व आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाच्या सूचना व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास यांनी केले आहे.

## संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ निलंग्यात आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.४ मार्च -**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच स्व. संतोष देशमुख यांची क्रूरपणे हत्या करण्यात आली. त्या क्रूर हत्या करणाऱ्या आरोपींना तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी, तसेच धनंजय मुंडे यांची आमदारकी रद्द करून त्यांना या घटनेत सहआरोपी करण्यात यावे या मागणीसाठी निलंगा येथे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सकल मराठा समाजाच्या वतीने सरकारचा तीव्र निषेध करून उपमुख्यमंत्री अजित पवार, धनंजय मुंडे व आरोपी वाल्मिक कराड यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले. तसेच स्व. संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणातील सर्वपुरावे व फोटो व्हिडिओ हे संपूर्ण महाराष्ट्रासमोर आले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रभर संतापाची लाट उसळली आहे. त्या प्रकरणातील एक आरोपी आजही फरार आहे.

या प्रकरणातील सर्व प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या सहभागी असलेल्या आरोपींना तात्काळ अटक करून कार्यवाही करण्यात यावी. भगवान गडाचे महंत नामदेव सानप यांची ईडी चौकशी करावी, धनंजय मुंडे व त्यांच्या सहकाऱ्यांचीही चौकशी करून या प्रकरणातील सर्वांची सिडीआर तपासून कठोर कार्यवाही करण्यात यावी.

अन्यथा संपुर्ण महाराष्ट्र भर यापेक्षाही तीव्र आंदोलन करण्यात येईल अशा मागणीचे निवेदन संबंधित प्रशासनाला देण्यात आले.

### अर्धा तास वाहतूक ठप्प...

स्व. देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकल मराठा समाजाच्या वतीने आरोपींचे प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करून निषेध करण्यात आले. यावेळी चौकातील चारही बाजूने येणारे जाणारे वाहने अडवण्यात आल्यामुळे तब्बल अर्धा तास शहरातील वाहतूक ठप्प झाली होती.

## शिवसेना पथकाने बस स्थानक व आगाराची केली पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.४ मार्च -**

पुणे स्वारगेट प्रकरणा पासून राज्यातील राज्य परिवहन महामंडळ सतर्क झाले असून अहमदपुर येथे शिवसैनिकांनी अचानक अहमदपूर बस स्थानक व आगारास भेट देत पाहणी केली.

परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक हे शिवसेनेचे असल्याने येथील शिवसेना महिला आघाडीच्या वतीने राज्य परिवहन मंडळाच्या आगारांमध्ये उपलब्ध असलेल्या सोई सुविधांचा आढावा घेण्यात आला. सदर भेटीत सोई-सुविधांची पडताळणी करण्यात आली. यात महिला प्रवाश्यांकरिता करिता स्वच्छ व सुरक्षित स्वच्छतागृह, स्तनदा म ातांकरिता हिरकणी कक्ष असल्यास संख्या, विकलांग प्रवाश्यांकरिता सहज-सुलभ प्रवेश व प्रतीक्षा-विश्रामाची जागा, महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांकरिता स्वच्छ व सुरक्षित स्वच्छतागृह व विश्राम ाची जागा, महिला अधिकारी, कर्मचाऱ्यांकरिता विशाखा समि तीची स्थापना व समितीतील संबंधितांची संपर्कासह दर्शनी भागात माहिती, स्वच्छ पिण्याचे पाणी व नीटनेटके खानपान गृह ची पाहणी केली.

या भेटीत वरील उपलब्ध सुविधांची पाहणी केली. आगार प्रमुख अमर पाटील यांची भेट घेत महिला सुरक्षा व सुविधा प्रवाशाच्या समस्या सविस्तर तपशील घेतला. मागील काही दिवसांपासून राज्य परिवहन आगारांमध्ये खासकरून महिलांना प्रचंड गैरसोईचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे. राज्य परिवहन मंडळाच्या आगारांमध्ये उपलब्ध असलेल्या सोई सुविधांचा आढावा घेण्याची बाब विचारात होती असे शहर प्रमुख लक्षुमन अलगुले यांनी सांगितले.



विद्यमान महायुतीच्या सरकारमध्ये शिवसेनेकडेच परिवहन विभाग असल्याने महिला व प्रवासी तक्रारी व सुचनांवर तातडीने प्रशासकीय कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही माहिती देण्यात आली.

अहमदपूर आगारात भंगार बसेस ठेवण्यात येत नसल्याचे आगार प्रमुख महेश पाटील यांनी स्पष्ट केले.

या पथकात महिला संपर्कप्रमुख रंजन कुलकर्णी यांच्या सूचनेनुसार महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख प्रिती कोळी, सुवर्णा रोकडे, पूजा जाधव, रेश्मा होळकर, महिला आघाडीच्या सर्व महिला पदाधिकारी, गणेश पांचाळ, गोपीनाथ जायभाये, लक्ष्मण अलगुले आदी शिवसैनिक यावेळी उपस्थित होते.

## अनसरवाडा येथे क्रिकेट स्पर्धेचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.४ मार्च -**

भाजपाचे युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांचा ९ मार्च रोजी वाढदिवस आहे. या वाढदिवसाचे औचित्य साधून गेल्या दहा वर्षापासून निलंगा, देवणी, शिरूर अनंतपाळ तालुक्यात भाजप युवा मोर्चाच्या वतीने विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. त्याचाच भाग म्हणून निलंगा तालुक्यातील अनसरवाडा येथे संकल्प फाऊंडेशनचे नयन माने यांच्या नियोजनाखाली भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या क्रिकेट स्पर्धेचे उदघाटन हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी म हाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून भाजपा जिल्हा उपाध्यक्ष शेषेराव ममाळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी युवा मोर्चा पदाधिकारी व स्पर्धेचे संयोजक नयन माने, युवा मोर्चा शहराध्यक्ष तम्मा माडीबोने, नरसिंग झरे, संजय सुरवंशी, मनोज पवार, जाधव अजित, प्रकाश पाटील, गजानन देशमुख, मोहन माने, अभिजीत साळुंखे, मारुती शिंदे, अमोल झरे, आदी प्रमुख उपस्थित होते.

या स्पर्धेत प्रथम येणाऱ्या संघास ५१ हजार रुपये चे पारितोषिक व मानचिन्ह, द्वितीय येणाऱ्या संघास ३१ हजार रुपये मानचिन्ह व तृतीय येणाऱ्या संघास २१ हजाराचे पारितोषिक, मानचिन्ह देण्यात येणार आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागाम ध्ये क्रिकेट विषयी आवड निर्माण व्हावी यासाठी इतर अनुक्रमे चार पाच सहा सात क्रमांकावर असलेल्या संघास देखील उत्तेजनार्थ ११ हजार रूपयाचे पारितोषिक व मानचिन्ह देण्यात येणार आहे.

## समाजसेवेचे आदर्श उदाहरण : मंत्र्यांचे स्वीयसहाय्यक जाधव यांनी केली अपघातग्रस्तांना मदत

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.४ मार्च -**

लातूर-नादेड राष्ट्रीय महामार्गावर नांदगावपाटी (ता. चाकूर) येथे सोमवार दि.३ मार्च रोजी एक भीषण अपघात घडला. मोटारसायकलस्वाराला वाचवण्याचा प्रयत्न करत असताना एक बस दुभाजकाला धडकली आणि बसमधील प्रवासी जखमी झाले.



याचवेळी, मा.ना. बाबसाहेब पाटील यांच्या स्वीयसाह्यायक धनंजय जाधव हे लातूरकडे जात होते. त्यांनी त्वरित थांबून जखमींना मदतीचा हात दिला. त्यांच्यामुळे अपघातस्थळी त्वरित यंत्रणा कार्यरत झाली आणि अँब्युलन्सच्या माध्यमातून जखमी प्रवाश्यांना लातूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

दुरदैवाने घडलेल्या या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी अनेक जखमी प्रवाश्यांना तत्परतेने उपचार देण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचा प्रयत्न धनंजय जाधव यांनी केला.

### शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांचे वर्चस्व कायम...

## औसा खरेदी-विक्री संघाची निवडणूक बिनविरोध

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.४ मार्च -**

होवू घातलेल्या औसा तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाच्या पंचवार्षिक निवडणूकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटच्या दिवशी संचालक पदाच्या १५ जागेसाठी उध्दव ठाकरे शिवसेना गटाचेच उमेदवारी अर्ज झाले. व मंगळवार दि.४ रोजी वैध ठरले आहेत. यामुळे निवडणूक प्रक्रीया बिनविरोध पुर्ण झाली असून औसा तालुका खरेदी विक्री संघाचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांचे या संघावर पुन्हा वर्चस्व कायम राहिले आहे.



औसा तालुका खरेदी विक्री संघाची निवडणूक जाहीर झाली होती. सोमवारी दि.३ रोजी उम ेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख होती. यामध्ये विद्यमान सभापती तथा शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या नेतृत्वाखाली १५ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. विरोधकांकडून एकही आर्ज दाखल झाला नाही. यामुळे निवडणूक बिनविरोध झाली आहे.

या निवडणुकीमध्ये संस्था म तदारसंघातून संतोष ज्ञानोबा सोम वंशी, शिवाजी माधवराव हांडे, मारुती गोरखनाथ मगर, नंदकुमार नानासाहेब साळुंके, गणेश प्रल्हाद जाधव तर वैयक्तिक शेतकरी मतदारसंघातून शेखर प्रल्हाद चव्हाण, महादेव शामराव पाटील, केशव तात्याराव डांगे, श्रीधर मनोहर साळुंके, बालाजी सुग्रीव धुमाळ यांचे उमेदवारी अर्ज दाखल झाले. अनुसूचित जाती जमाती म तदारसंघातून राजीव केशव कसबे, इतर मागासवर्गीय मतदार संघातून सत्यभामा गणपतराव माळी, महिला मतदारसंघातून सविता अरविंद जाधव, मायाबाई राजेंद्र साळुंके, भटक्या जाती जमाती मतदारसंघातून नवनाथ व्यंकट लवटे आदी उमेदवाराचे दाखल झाले होते.

सर्व उमेदवारी अर्ज छाननीम ध्ये वैध ठरले. यामुळे निवडणुक बिनविरोध झाली असल्याचे निवडणुक निर्णय अधिकारी रमेश सगर यांनी जाहीर केले.